
# माणूस

एक समग्र साप्ताहिक




## रिपब्लिकन पक्षाचा आत्मघात

२७ ऑगस्ट १९६६ • चाळीस पैसे

ाहाराष्ट्रीय कलोपासक,
ुणे
ा नाटचसंस्थेने नुकतीच
ापली
# ३०
ार्षांची वाटचाल पूर्ण केली.

ाहारुद्राभिषेक, होमहवन,
ाटराजपूजा वगैरे धार्मिक विधी
ा त्रिशब्दर्षोत्सवानिमित्त
करण्यात आले.
ुण्याहवाचन विधी चालू असताना–
सौ. भुपटकर, प्रा. प्र. रा. भुपटकर
व श्री. भगवान पंडित...

**ुख्य समारंभात....**
ु. ल. देशपांडे
ा. रा. भुपटकर
राजाभाऊ नातू

केशवराव दाते
म. म. दत्तो वामन पोतदार
ना. राजारामबापू पाटील



**क था ही क लो पा स कां ची–**

*सचित्र लेख पा*





## एक समग्र साप्ताहिक

वर्ष — सहावे
अंक : आठवा
किंमत : चाळीस पैसे
वार्षिक वर्गणी : वीस रुपये

**संपादक**
श्री. ग. माजगावकर

**संपादक मंडळ**
अ. मा. साधू
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**व्यवस्था विभाग**
अ. वा. गंधे
अ. वि. गणपत्ये

पत्ता — ४९१ नारायण, पुणे २.

दूरध्वनी — ५७३५१


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# प्रतिसाद

सोलापूरहून ख्यातनाम मराठी कवी डॉ. वि. म. कुलकर्णी लिहितात, 'आपल्या 'माणूस'-चा मी प्रथमपासूनचा आस्थेवाईक वाचक आहे. मला 'माणूस'चे अंक वैशिष्ट्यपूर्ण वाटतात. साप्ताहिक रूपातील पहिला अंकही सुरेख आहे. विशेषत: श्री. सुधीर फडके यांनी लिहिलेली श्री. मोहन रानडे यांची चरित्रगाथा चित्त थरारून सोडणारी आहे.'...

सुधीर फडके ही फक्त संगीतातील व्यक्ती अशी आजपर्यंत सर्वांचीच समजूत. पण आवाजाप्रमाणे त्यांच्या लेखणीलाही उत्कटतेचा, कोमलतेचा स्पर्श आहे, हा एक नवाच गोड धक्का ठरला. अनेक वाचकांनी 'माणूस'-कडे पत्रे पाठवून श्री. सुधीर फडके यांचे या लेखाबद्दल अभिनंदन केले आहे. मोहन रानडे यांच्या सुटकेसाठी श्री. फडके व त्यांची मित्रमंडळी यांचे जे भगीरथ प्रयत्न चालू आहेत, त्यांना यश लाभावे, लोकमताचा पाठिंबा त्यांच्या प्रयत्नामागे उभा राहावा, यासाठी 'माणूस' साप्ताहिकाच्या पहिल्या दोन अंकात या विषयाची योजना केली होती. अपेक्षेप्रमाणे वाचकांचा—मराठी जनतेचा—प्रतिसाद मिळाला ही समाधानाची बाब.

गेल्या अंकात स्पष्ट केल्याप्रमाणे या अंकात चालू घडामोडींपैकी दोन विषय विस्ताराने, समग्रतेने, आलेखरूपाने मांडले आहेत—रिपब्लिकन पक्षाचा आत्मघात व महाराष्ट्रीय कलोपासक. 'माणूस'च्या साप्ताहिक स्वरूपाविषयी वाचकांच्या शंका, समज—गैरसमज अशा आलेखांमुळे हळूहळू दूर होतील ही अपेक्षा.

—संपादक

# पत्रमैत्री

स. न. ११ ऑगस्ट, ६६

मागेच आपणांस 'माणूस'च्या प्रस्थानाविषयी लिहिणार होतो. पण विचाराअंती थोडेसे थांबण्याचे ठरवले. आजच 'माणूस' समग्र साप्ताहिकाच्या रूपांत हाती पडला. जुना मित्र अनेक दिवसांनी भेटल्याचा आनंद झाला. विशेष म्हणजे आकार, रूप, रंग आणि गुणवत्ता कायम ठेवल्याबद्दल सकौतुक आनंद झाला. आणि म्हणूनच 'माणूस प्रतिष्ठान' यशस्वी होईल असे वाटू लागले आहे. परंतु हा 'माणूस' समग्र असेल तरच हे शक्य होईल. एरवी प्रत्येक पैसा आज जाणीवपूर्वक खर्च करण्याचा हा काळ असल्यामुळे बहुधा वाचनावर खर्च होत नाही. शिवाय हल्लीची 'चालती फिरती' वाचनालये रुपया दीडरुपयात महिन्याला निदान १५–२० मासिके वाचावयास देतात. तुलनेत अशा वाचनालयातून 'माणूस' आणून वाचणं वाचकांना अधिक फायदेशीर आणि चालकांना त्याहून अधिक! त्यामुळेच 'माणूस'च्या खपासाठी वेगळी योजना आखली पाहिजे, असे मला वाटते. गेल्या चारपाच वर्षांत 'माणूस'ने आपला वेगळा वाचकवर्ग निर्माण केला आहे. या वाचकांनीच 'माणूस' अधिकाधिक खपेल, असा प्रचार केला पाहिजे. कारण 'माणूस प्रतिष्ठान'ची कल्पना अत्युत्तम असून, केवळ ती कल्पनाच ठरू नये! यासाठी प्रत्येक अंकात 'माणूस प्रतिष्ठान'ची कल्पना देऊन वाचकवर्गास सतत पुढच्या आठवड्यांत अंक न विसरता घेण्यास आवाहन करावे.

आपल्या कार्यास सुयश चिंतितो.

**रमेश आढंगळे**, मुंबई

स. न. १३ ऑगस्ट, ६६

'माणूस'चा अंक (विकत घेऊन) वाचला. कारण अंक फुकट मिळाला की त्याचे महत्त्व कमी होते. वाढत्या महागाईच्या दृष्टीने पाहता चाळीस पैसे ही किंमत ठीक आहे, आणखी मात्र वाढवू नये. साप्ताहिक 'माणूस' वाचताना 'माणूस'ची सारी स्थित्यंतरे क्षणभर डोळ्यांपुढून चमकून गेली. तुमचा १९६० चा पहिला अंक आठवला. त्या वेळी तो आमच्या मनात मुळीच भरला नव्हता. तुमचा उत्साह कमी होऊ नये म्हणून तो चांगला आहे, असे आम्ही खोटेच त्या वेळी सांगितले होते. आता मात्र खोटे सांगण्याची आवश्यकता राहिली नाही. पण काही गोष्टी खटकल्या त्या सांगतो. पृष्ठ १५ वरचे व्यंगचित्र मुळीच आवडले नाही, त्यात 'मार्मिक'पणा काहीच नाही. तसेच तेंडुलकरांच्या नाटिकेवर इतक्या

उशीरा अभिप्राय देण्याचे कारण नव्हते. राशीभविष्याचीही मुळीच आवश्यकता नाही. त्यापेक्षा ज्योतिषविषयक लेख दिल्यास ते आमच्यासारख्या अभ्यासूंना उपयुक्त ठरतील. गोंदवलेकर महाराजांची निरूपणे फार आवडली. 'तुझ्या मुक्तिचे वेड' व 'ड्रॅगन जागा झाला' या लेखमालेचे एक प्रकरण—हा मजकूर 'माणूस'ची परंपरा चालवील इतके सुंदर आहे. 'माणूस'ने मराठी मासिकांत जे एक मानाचे स्थान पटकाविले आहे, ते निर्माण करायला आपल्याला किती सायास पडले हे मला ठाऊक आहे. 'माणूस'ला मनःपूर्वक यश चिंतितो.

**वि. के. फडके**, पुणे

**स. न.** १५ ऑगस्ट, ६६

आपल्या साप्ताहिकाचा पहिला अंक अतिशय आवडला. स्वरूप अपेक्षा वाढवणारे आहे. श्री. मोहन रानडे यांचेवरील लेख फारच आवडला. 'ड्रॅगन' 'भस्मासुर'प्रमाणेच लोकप्रिय होण्याचा रंग दिसतो.

निरूपणे व भविष्य ही सदरे मात्र प्रस्तुत आकर्षक अंकात विशोभित वाटतात. निरूपणे फक्त साधकांसाठीच आकर्षक ठरतील, जनसामान्यांच्या आत्ममंदिराचे दार ठोठावण्यास स्वामी विवेकानंदांची तेजस्वी वाणी, गीता, उपनिषदे यांतील अंश अधिक आवाहनात्मक ठरेल. वृत्तपत्रीय भविष्यकथनद्वारा लोकाराधन करण्याने या महान शास्त्राला निष्कारण व अन्याय्य सवंगपणा आला आहे. हे थांबवण्यासाठी साप्ताहिक राशीभविष्याऐवजी या विषयावर माहितीपूर्ण लेख प्रसिद्ध करावा, हे जास्त चांगले.

आपणांस यश लाभो.

**का. ह. ठाकुरदेसाई**, कर्जत


## माणूस पंचवार्षिक ग्राहक योजना



'माणूस' साप्ताहिकाची दिवाळी अंकासहित वार्षिक वर्गणी आहे रुपये वीस.

पाच वर्षांची वर्गणी होते रुपये शंभर. आपण पाच वर्षांची शंभर रुपये वर्गणी 'माणूस'कडे एकदम भरली तर सहा वर्षे—एक वर्ष अधिक— 'माणूस' साप्ताहिकाचे अंक आपल्याला घरपोच मिळतील.

म्हणजेच वर्गणीत वीस टक्के सवलत मिळून आपली वीस रुपये बचत होईल.

# ठुसकाळे...



## □ शब्दांचे सोनखत

रोज वृत्तपत्र वाचताना आपले लक्ष प्रथम कुठे जाते ? जर एखादा प्रचंड अपघात, जगप्रसिद्ध व्यक्तीचा खून वगैरे बातमी नसेल तर बहुधा काँग्रेसी मंत्र्याच्या उपदेशाचे स्तंभ असतात, त्याला वाचक प्रथम मिठी मारतो. मंत्री सहसा निराशा करीत नाहीत. आता गेल्याच आठवड्यात एका मंत्र्यांच्या तोंडून जे शब्दांचे सोनखत निघाले त्याची नुसती आठवण करून पाहा. आपले ना. शांतिलाल शहा, महाराष्ट्र सरकारातील एकमेव गुजराथी मंत्री. यांच्याकडे मराठी माणसांचे आरोग्य सांभाळण्याचे काम आहे. नाशिकला महाराष्ट्र राज्य कुटुंबनियोजन परिषदेचे उद्घाटन करताना हे काय म्हणाले ? म्हणाले—

" कुटुंबनियोजनाला " मुस्लिम समाजाचा विरोध असल्याने काही काळाने भारतात त्यांची संख्या वाढेल, अशी शंका हिंदूंच्या मनात येते. परंतु ती रास्त नाही. " आता काँग्रेस मंत्र्यांत हिंदू वगैरे मानगड नसते अशा थाटात ना. शांतिलाल बोलले, हे फारसे चुकले नाही. ना. शांतिलाल यांचे म्हणणे—रामभाऊ भोसले आणि मुसाखान काझी हे दोघे शेजारी राहत असले आणि रामभाऊंनी कुटुंबनियोजन केले व मुसाखानांनी केले नाही, तरी मुसाखानाच्या घरातली माणसे रामभाऊंच्या घरातल्या माणसांपेक्षा संख्येने वाढतील, ही भीती रास्त नाही ! आता या म्हणण्यात मुसाखानाविषयी काही संशय आहे म्हणावे तर त्याला चार बायका करण्याचा अधिकार. पण मराठी माणसांच्या टाळक्यात हे गुजराथी गणित काही शिरत नाही. खरी इथेच सगळी मेख असते. ना. शांतिलाल यांचे म्हणणे असे असावे की, भारतात अशी मुसलमानांची संख्या वाढणारच नाही. कारण संख्या वाढली की लगेच आपण दुसरी फाळणी करू. वाढलेले लोक नव्या पाकिस्तानात गेले की भारतात पुन्हा हिंदूच बहुसंख्य... ! मराठी माणसांना ही गुजराथी गणिते जितकी लवकर समजतील, तेवढा त्यांचा उद्धार लवकर होईल.

आता उत्तर प्रदेशचे शेतीमंत्री काय म्हणतात पाहा. ना. गेंडासिंग म्हणतात, उंदरांत प्रोटीन्स फार, तेव्हा लोकांनी उंदीर खावेत ; ना. गेंडासिंग हे कुणी रानटी प्राणी नसून चक्क काँग्रेस मंत्री आहेत, ही गोष्ट ध्यानात ठेवून या सूचनेचा आपण विचार केला पाहिजे. मंगलमूर्तीचे हे मूषक वाहन खाण्याची सूचना काँग्रेस मंत्र्यांनी करावी यात पुष्कळ अर्थ आहे. मंगलमूर्ती म्हणजे विद्येची देवता. कुठल्याही सत्कार्या-



साठी आवाहन मिळणारे दैवत. या देवतेची काँग्रेस राज्यात फारशी गरज नाही– म्हणून त्याचे वाहनच काढून घेण्याची ही ना. गेंडासिंगांची युक्ती मोठी शिकंदर आहे की नाही ? ना. गेंडासिंगांची ही सूचना वाचताच अनेकांचे लक्ष आतापर्यन्त दुर्लक्षित झालेल्या क्षुद्र प्राण्यांकडे गेले आहे. आमच्या एका मित्राला ढेकणात हेमोग्लोबिन शंभर टक्के सापडले आहे. व ढेकणाची उसळ ही पौष्टिक आहार ठरेल, असे त्याचे मत आहे. तूर्त कुणी ढेकूण मारू नयेत, हे चांगले. आतापर्यन्त उंदीर खाऊन लठ्ठ झालेली मांजरेही लोकांनी पकडून ठेवावीत. उंदरांतले एवढेसे प्रोटीन खाण्यापेक्षा अनेक उंदरांचे प्रोटीन एकाच मांजरात असण्याचाही संभव आहे.

आरोग्य झाले. शेती झाली आता अन्नाकडे वळू. अमीनचंद प्यारेलाल नावाच्या व्यापारी कंपनीचा व सरकारचा काही वांधा आला. म्हणून मध्यवर्ती अन्नमंत्री श्री. सुब्रह्मण्यम् यांनी त्या कंपनीला शिक्षा केली. पुढे कंपनीने माफी मागताच सुब्रह्मण्यम् यांनी शिक्षा रद्द केली. पब्लिक अकांऊटस् कमिटीने यावर आक्षेप घेतला. यावर सुब्रह्मण्यम् काय म्हणाले ? त्यांनी ठणकावून सांगितले,

" माझी सद्सद्‌विवेकबुद्धी सांगते की मी निर्दोष आहे. " खरोखर असेच वाटते, की सुब्रह्मण्यम् निर्दोषी असावेत. क्षमा हा गुण अहिंसेचा प्राण होय ! अहिंसक सरकारातील मंत्र्यांनी क्षमाशीलता दाखविली ही गोष्टच योग्य झाली. एखाद्या कंपनीने अपराध केला की, मंत्र्याने त्याचे वाकडे करायचे, मग त्याचा सूड म्हणून त्याने निवडणूक फंडाला पैसे द्यायचे नाहीत–असे सूडाचे चक्र वाढविण्यात काही अर्थ नाही. कुणीतरी कुठे तरी थांबलेच पाहिजे. सुब्रह्मण्यम् यांनी पहिल्या घडाक्याला क्षमा करून टाकली, हेच बरोबर आहे. निर्दोष आहे. शंभर टक्के यशस्वी झालेल्या सरकारी कर्मचाऱ्यांचा एक दिवसाच्या लाक्षणिक संपाने रागावलेल्या महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी सुब्रह्मण्यम् यांचेकडून ही क्षमा शिकावी ! गंभीर दखल वगैरे घेण्याचा नाद सोडावा व महागाई भत्त्याचा मंगल कलश आणण्यासाठी दिल्लीला जावे हे उत्तम !

## ☐ बोरिस पॅस्टरनॅक

' डॉ. झिवागो ' नावाची एक कादम्बरी एका रशियन लेखकाने लिहिली. कुणी काहीही लिहावे. परन्तु त्या वेळचे रशियाचे हुकूमशहा क्रुश्चेव्ह यांनी ही कादंबरी रशियात प्रसिद्ध होऊ नये, असे ठरवले. कादंबरी भूमिगत झाली व इटालीत व अमेरिकेत प्रसिद्ध झाली. तिला नोबेल पारितोषिक मिळाले व जगभर तिचा गाजावाजा झाला. या कादम्बरीत कम्युनिझमविरोधी लेखन आहे हे आता चतुर वाचकांनी ओळखले असेल. म्हणून तर कम्युनिस्टविरोधी साहित्यिकांचा वरचष्मा असलेल्या नोबेल पारितोषिक कमिटीला ही कादंबरी फारच श्रेष्ठ वाटली !!

आता रशिया व अमेरिका यांनी या कादंबरीवर थंडे युद्ध करावे, आपला त्यात संबंध येतो का ? आपण फारतर कादंबरी वाचावी––आवडली––आवडली. रस लागला नाही तर फेकून दिली.

पण ' नॉन अलाइंड ' अर्धवटपणा करण्यात आपला हातखंडा ! आपल्या सेन्सॉर बोर्डाने या कादंबरीवरील चित्रपटाला वितरण दाखला देताना पहिला विचार हा केला, की समजा, हा सिनेमा भारतात दाखवला तर रशियाला काय वाटेल ? सेन्सॉरने बंदी घातली. ' डॉ. झिवागो 'चा गळा दाबला. किंचाळी अमेरिकेपर्यंत गेली. चित्रपटाच्या निर्मात्यांनी याविरुद्ध टीकेची राळ उठवली. " आमचे गहू खाता आणि डॉ. झिवागोलाही मारता––! " माहिती व नभोवाणी खात्याने पुन्हा दडपण आणले. डॉ. झिवागोमधील थोडासा भाग कापला व ' डॉ. झिवागो ' या चित्रपटाची बंदी आता उठवण्यात आली आहे. अखेर सिनेमा भारतात लोकांना दाखवला म्हणून आता रशिया नाखूष आणि काही भाग कापला म्हणून अमेरिका नाखूष !

## ☐ ' अवमूल्यन ' म्हणजे काय ?

' अवमूल्यन ' या विषयावर भारतातील सर्व अर्थशास्त्रज्ञ–दिल्लीतील व गल्लीतील, सर्व पुढारी, प्रांतिक व मध्यवर्ती सरकारांतील मिळून ८००–९०० मंत्री या सर्वांची निवेदने आपण वाचली असणार. हे सर्व वाचून भारतातून कसली निर्यात अवमूल्यनामुळे निश्चित अधिक होणार आहे, याचा उलगडा कोणालाही झालेला नाही. असो या अतिगहन विषयावर सुप्रसिद्ध अमेरिकन ललित लेखक अर्नेस्ट हेमिंग्वे यांनी आपल्या " Notes on the new war " या लेखात पूर्वीच लिहिलेले आहे–

" The first Panacea of a mismanaged Nation is devaluation of currency, the next is war. Both bring temporary prosperity, both bring permenant ruin. But both are refuge of rotten politicians and economic opportunists. "

## मंगलकलश आणण्यासाठी......



याचा अर्थ—देशातील अंदाधुंदीच्या राजवटीला, चलनाचे अवमूल्यन हा ‘ त्रैलोक्य चिंतामणी ’ असा सर्व रोगांवरील रामबाण उपाय वाटत असतो. यापुढचा उपाय म्हणजे युद्ध. दोन्हीमुळे देशाला तात्पुरती बरकत आली, तरी त्यामुळे निश्चितपणे देशाचे अंती वाटोळे होते. परंतु सडक्या राजकीय नेतृत्वाला व संधिसाधू फेरफारांना याच गोष्टींचा आश्रय करावा लागतो.

— ग्यानबा

# विचारधारे

— समीर

## □ व्हिएटनामी दृष्टिकोनातून व्हिएटनाम

आजकाल कुठलेही वर्तमानपत्र वाचले की व्हिएटनाममधल्या परिस्थितीबद्दल जगात कुणाकुणाला काय काय वाटते, हे तपशीलवार कळते. पण व्हिएटनामी दृष्टिकोतातून व्हिएटनाम पाहता येण्याची अपूर्व संधी काही दिवसांपूर्वी दिल्लीकरांना लाभली. दिल्लीतल्या ' चीन अभ्यास मंडळा 'च्या विद्यमाने श्री. हॉंग व्हॅन ची या व्हिएटनामी लेखकाने व्हिएटनामच्या दोन्ही भागांतल्या परिस्थितीची चर्चा करून म्हटले :

नेतृत्वाचा अभाव ही दक्षिण व्हिएटनामची मूलभूत समस्या आहे.—आणि हा नेतृत्वाचा अभाव गेल्या काही वर्षांच्या कालावधीत ' चांगल्या ' राजकीय चळवळीच्या अभावातून निर्माण झाला आहे. व्हिएटनाममधल्या बुद्धिजीवी वर्गाने ' राष्ट्रवादी क्रांती ' सुरू केली असती तर देशाचे खूप हित होऊ शकले असते. पण फ्रेंच तालमीत तयार झालेल्या व पूर्वी कधीही कुठल्याही राजकीय कार्यक्रमात भाग न घेतलेल्या या वर्गाने काहीच केले नाही, या परिस्थितीत काय करावे, हेच या लोकांना आता कळत नाही. परंतु आता विद्यार्थीवर्गात एकप्रकारची अस्वस्थता व राजकीय जागृती दिसून येते. तेव्हा हा वर्ग लोकशाहीसाठी जोरदार चळवळ आरंभून देशाला हवे असलेले नेतृत्व पुरवील अशी आशा आहे.

व्हिएटनाममध्ये सध्या चालू असलेली लढाई म्हणजे एक यादवी युद्ध आहे, पण निराळ्या प्रकारचे यादवी युद्ध आहे. हे युद्ध बटण दाबून चालविण्यात येत आहे व ते बटण पेकिंगमध्ये आहे. फक्त डॉ. हो–चि–मिन्हच ही लढाई थांबवू शकतील, पण ते वाटाघाटीला तयार नाहीत. लाल चीनने कोरियन लढाईत मोठ्या प्रमाणावर हस्तक्षेप केला होता तसा या लढाईत होण्याची शक्यता दिसत नाही. कारण त्या वेळी चीनला रशियन वायुदलाचा पाठिंबा होता. तो आता नाही. चीनचे वायुदल सामर्थ्य तुटपुंजे असून चिनी लढाऊ विमानांना सुट्या भागांचा तुटवडा आहे. त्यामुळे पुरेसा हवाई पाठिंबा नसताना चीन व्हिएटनाममध्ये खोलवर आपले लाखो सैनिक पाठवील हे संभवनीय दिसत नाही.

सर्व साम्यवादी देशांपुढे धान्यतुटवड्याची समस्या आहे, पण उत्तर व्हिएटनाम व चीनमध्ये हा तुटवडा विशेष जाणवतो, याचे कारण या दोन देशांत फक्त तांदळाचीच लागवड करण्यात येते, इतर धान्ये पिकविण्यात येत नाहीत. एकीकडे देशातली लोकसंख्या दरसाल साडेचार टक्क्यांनी वाढत आहे व दुसरीकडे अन्न-समस्यापूर्ती बाकी आहे, अशा परिस्थितीत दोन व्हिएटनाम आपल्या झेंड्याखाली एकत्र आणण्याचा हो यांचा प्रयत्न मुख्यत्वे आर्थिक असावा, असे वाटते.

## ☐ स्थानिक राजकारणाची कार्यकारण मीमांसा

स्थानिक राजकारणाची बजबजपुरी म्हणून कुप्रसिद्ध असलेल्या भारतात ही बजबजपुरी कशाने माजते याचा शास्त्रीय अभ्यास केलेले एक ऑस्ट्रेलियन तज्ज्ञ नुकतेच येऊन गेले, ते म्हणजे 'ऑस्ट्रेलियन नॅशनल युनिव्हर्सिटी'त मानसशास्त्र शिकविणारे प्रा बार्नेस. 'एखाद्या राजकीय पक्षात स्थानिक महत्त्वाची कारणे कुठल्या परिस्थितीत शिरतात' या विषयाची चर्चा करण्यासाठी ऑस्ट्रियाला भरलेल्या एका परिषदेहून ते परत चालले होते. त्यांना विचारले, "परिषदेने काही निर्णय घेतला का ?" "नाही. शास्त्रीय परिषदा कधीच निर्णय घेत नसतात." असे ते म्हणले.

स्थानिक गटबाजीची वाढ होण्याचे एकच कारण म्हणजे त्या त्या देशांतल्या लोकांचा सांस्कृतिक दृष्टिकोन. काही देशांत लोकांनी काही प्रश्नांवर मतभेद दाखविलेला चालतो, तर काही देशांत लोक आपसांतले मतभेद लपविण्यासाठी वाटेल ते करायला तयार असतात. उदारणार्थ, "नॉर्वेमध्ये आपण कोणाला पाठिंबा देत आहोत हे कळू न देणे हे राजकारणाचे एक अविभाज्य अंग झाले." हिंदुस्थानातल्या स्थानिक राजकारणाचे आपल्याला काहीच ज्ञान नाही, असे बार्नेस म्हणाले. "पण ते अत्यंत 'सुरस व चमत्कारिक' आहे, असे मला सांगण्यात आले आहे."

## ☐ सहकारी शेतीचे पैलू

'सहकारी शेतीचे पैलू' या विषयावर दिल्लीला नुकताच एक आंतरराष्ट्रीय परिसंवाद झाला. त्यात काही परदेशी तज्ज्ञांनी प्रकट केलेली मते :

इटालीचे डॉ. नेव्हिजर : सहकारी शेती एखाद्या उद्योगधंद्याप्रमाणेच संघटित केली पाहिजे. संशोधन, मूल्यमापन आणि धोरणाची अंमलबजावणी ही कामे करण्याची जबाबदारी तज्ज्ञ पण खासगी संघटनेकडे असावी.

पोलंडचे डॉ. लिप्स्की : पोलंडमध्ये सहकारी शेती अयशस्वी झाली आहे. पोलंडमधल्या परंपरागत शेतीला सध्या समाजवादी वळण देण्यात येत आहे. तेथें जनावरांच्या जोपासनेसाठीही सहकारी शेतीचे तंत्र वापरण्यात येऊ लागले आहे. ●

### क्रियेवीण वाचाळता ?

आपल्या लोकसभेतल्या सध्याच्या शाब्दिक हाणामारीचेही कौतुक करणारी माणसे जगात आहेत ! ऑस्ट्रेलियन पार्लमेंट सभासदांचें एक शिष्टमंडळ सध्या भारतात आहे, त्याचे नेतृत्व करणारे मंत्री श्री. स्वार्ज लोकसभेतली भाषणबाजी पाहून म्हणाले : "भारताच्या व ऑस्ट्रेलियाच्या लोकशाही पद्धतीत खूपच गोष्टी सारख्या आहेत. त्यांतली एक लक्षात येणारी समान गोष्ट म्हणजे 'दमदार' भाषणे !"



# श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## निवडक निरूपणे

### १ : नामस्मरणरूपी शेताची मशागत

नामस्मरणरूपी शेतात उत्तम पीक येण्याला खालील गोष्टींची जरूरी आहे : (१) सदाचरण हे शेताला रक्षण करण्याकरता लागणाऱ्या कुंपणासारखे आहे,म्हणून सदाचरण महत्त्वाचे आहे. (२) शुद्ध अंत:करण– म्हणजेच उत्तम, काळी मुसभुशीत जमीन. या जमिनीमधील दगड, चुना, हरळी काढून साफ करावी, म्हणजेच अंत:-करणात कोणाबद्दलही द्वेष, मत्सर ठेवू नये. (३) नामस्मरण– हे त्या जमिनीत पेरण्याचे बी आहे. हे बी किडके नसावे म्हणजेच नाम सकाम नसावे. उत्तम बी म्हणजे नामाकरिताच नाम हे आहे. (४) तीर्थक्षेत्रे, संतांचे आशीर्वाद, कृपादृष्टी वगैरे– या सर्व गोष्टी पाटाच्या पाण्यासारख्या आहेत. त्यामुळे शेत चांगले होण्यास मदत होते. (५) भगवत्कृपा– ही पावसाच्या पाण्यासारखी आहे. पाटाच्या पाण्या-पेक्षा पावसाच्या पाण्याची गोष्ट काही और आहे. पण तो पडणे न पडणे आपल्या हातात नाही. शेताला लावण्याकरता पाटाचे पाणी, एखादी विहीर, तलाव किंवा नदी यांमधून नेता येणे शक्य असते. परंतु, पावसाच्या पाण्याच्या बाबतीत कोणाला काहीच करता येणे शक्य नाही. त्यामुळे एखाद्याने वर लिहिल्याप्रमाणे शेताची उत्तम निगा राखली, उत्तम बी पेरले, तरी पावसाच्या अभावी पीक न येण्याचा संभव असतो. परंतु नामस्मरणरूपी शेताचे एक वैशिष्टच आहे, ते हे की, त्याच्या अंगी लोहचुंबकासारखी आकर्षक शक्ती आहे, म्हणून हे शेत भगवत्कृपारूपी पाऊस खेचून घेऊन आपणांवर पाडते, त्यामुळे पावसाच्या अभावी शेत वाया गेले असे कधीच होत नाही. आपण असे पाहू की दोन शेतकरी आहेत. एक कर्तव्यकर्म म्हणून वेळ झाली की, आपल्या शेताची मशागत करणारा आहे. व दुसरा आळशी म्हणजे मशागत न करणारा आहे. आता जेव्हा पाऊस पडेल तेव्हा ज्याने मशागत केली त्याचे शेत उत्तम वाढेल. पण दुसऱ्याचे वाढणार नाही. म्हणजे भगवंताच्या कृपेने जो पाऊस पडणार त्याचा एकाला फायदा मिळेल, तो दुसऱ्याला मिळणार नाही.

जो नियम प्रपंचात लागू तोच नियम परमार्थात लागू. भगवंताची कृपा सर्वांवर सारखा वर्षाव करीत असते. ज्याने चित्तशुद्धी ज्या प्रमाणात केली असेल, त्या प्रमाणात त्याला फायदा होईल. भगवंत किंवा संत समदृष्टी असतात, ते असे. त्यांच्या ठिकाणी जर विषमता दिसली तर तिचा उगम किंवा कारण आपल्यात आहे हेच यावरून दिसते.

## २ : नामसाधन कसे करावे ?

नामाचे साधन कसे करावे ? एखाद्या दगडावर पुष्कळ पाणी एकदम ओतले तर तो दगड नुसता भिजेल व पाणी निघून जाईल. कोरडा होईल. पण तेच पाणी थेंब थेंब असे एकाच ठिकाणी व अखंड पडत राहिले तर त्या दगडाला भोक पडेल व काही दिवसांनी दगड फुटूनही जाईल; त्याप्रमाणे केव्हातरी पुष्कळ साधन करण्यापेक्षा अगदी अल्पप्रमाणात का होईना, पण नित्यनेमाने ठराविक वेळी व शक्य तर ठराविक स्थळी जर नामाचे साधन केले तर ते जास्त परिणामकारक होते. जात्याला दोन तळ्या असतात त्यांतील एक स्थिर राहून दुसरी फिरत राहिली तर दळण दळले जाऊन पीठ बाहेर पडते; पण दोन्ही तळ्या फिरत राहिल्या तर दळण दळले न जाता फुकट श्रम मात्र होतात. माणसाचे शरीर व मन अशा दोन तळ्या आहेत. त्यांतील मन हे स्थिर आहे व देह ही फिरणारी तळी आहे. मन परमेश्वराच्या ठिकाणी स्थिर करावे व देहाने प्रपंचाच्या गोष्टी कराव्यात. प्रारब्धाचा संबंध देहापर्यंतच असतो. प्रारब्धरूपी खुंटा देहरूपी तळ्यांत बसून तो त्याला फिरवितो व मनरूपी तळी स्थिर असते. देह प्रारब्धावर सोडावा व मन भगवंताचे स्मरणात स्थिर ठेवावे; याहून नामाचे साधन दुसरे काय ? हे साधन अमक्यालाच साधेल असे नाही; ते कोणालाही साधेल. गरिबाला गरिबीचे दुःख होते, म्हणून साधत नाही; तर श्रीमंताला पैशाचा अभिमान व लोभ असतो म्हणून साधत नाही. विद्वानाला विद्येचा अभिमान होतो म्हणून साधत नाही तर अडाण्याला काय करावे हे समजत नाही म्हणून साधत नाही. साशंक वृत्तीने कितीही साधन केले, कितीही नामस्मरण केले तरी कधीही समाधान होणार नाही.

गुरुचरणी अत्यंत विश्वास । आणि साधनाचा अखंड सहवास ।।
येथे प्रपंचाचा सुटला फास । हाच परमार्थाचा मार्ग आहे खास ।।

नीतिधर्माचे आचरण, शास्त्रशुद्ध वर्तन, शुद्ध अंतःकरण आणि भगवंताचे स्मरण इतक्या गोष्टी असतील तरच साधक शेवटपर्यंत पोचेल, आणि शेवटपर्यंत तो पोचला तरच फायदा. घरी पोचल्यावर पत्र लिहा म्हणतात याचा अर्थ हाच आहे. प्रपंच करीत असता वाईट विचार येतात, परमार्थ करीत असतानाही येतात. म्हणून घावरून जाऊ नये. दृढ विश्वासाने नाम चालू ठेवावे. जेथे कर्तव्याची जागृती व भगवंताची स्मृती आहे तेथेच समाधानाची प्राप्ती होते.

## मनस्विनीस

मनस्विनी, मळभ दाटून आल्यावर
आकाशाचा हुंदकादेखील तुला ऐकू येतो
गर्भालस केळीच्या प्रसूतिवेदना श्रवून
तुझे डोळे पाणावतात
नीवारकण टिपणाऱ्या चिमण्या दचकतील
म्हणून अंगणातही न जाणारी तू!
बाहेर हिमवादळे घोंगावताना
उबदार शाल मजवर लपेटून
कुडकुडत निजणारी तू!
समजून घेणार नाहीस मला?
दशदिशांनी उमलून आलेल्या
माझ्या फुलाच्या ताटव्याखालची जमीन
पार तडकून गेली आहे गऽ!
या काळजातली भळभळणारी जखम
पाहणार नाहीस का कधीच?
तुझ्यासाठी तरी मला समजून घे!
या फुलाखालची जमीन पार खचून गेलीय्!

*—श्रीरंग विष्णू जोशी*

## जन्म

अशा अचानक उमटुनी आल्या
गतजन्मींच्या काही खुणा
ढळे सावली पायामधुनी...
भरल्या प्रहरी उभा उणा १
उत्तररात्री असा दरवळे
प्राजक्त मृद्‌गंध नवा
पहाट डोळे चुंबियता मी—
पुन्हा, वाटते जन्म हवा २
संपु नये ही कधीच येथील
जन्मोजन्मी रात्र सावळी
स्पर्शफुले ही सदा फुलावी
मेन्दीभरल्या तुझ्या ओंजळी ३

*—मनोहर अपोनारायण*

## डोह

निळ्या डोळ्यांच्या डोहात
भोळ्या चंदेरी मासोळ्या,
खेळ चोरटा लाजरा
नव्या हुरहुरी आगळ्या.
गोड शब्दांचा जलद
बरसण्या ये भरा,
धुंद स्मिताचा मयूर
डोले सुगंधी पिसारा.
दूर करू अहंकार
व्हावे जन्माचा अंकित,
संपवावे एकलेपण
खोल गहिऱ्या डोहात.

*—प्रमांशू*

## लुप्त आशेचा किनारा

सांताहुनि माझी दिशा
असे अनंताच्या कडे
वेडा-पिसा चाललेला
मी का मृगजळाकडे?
असे मनाच्या नौकेला—
विवेकाचे हो सुकाणू
हाकारितो कधीचा मी
'पंखहीन' दीन मनू
ओठांवर काही छंद,
पालवितो माझे श्वास
गतिहीन शिडांतूनि
आर्त लोचनी ह्या आस!
'कमी होईना अंतर'
मनी हीच हुरहूर
कापित हा वर्तमान
झेपावते आस दूर

पंख आशेला फुटति
काया परि रंगाळते
मन जाऊ दूर पाहे
तन हाय ठेचाळते !
लौकिकाच्या सागरात
डगमगे माझी नौका

जड जगाचे तूफान—
देईल हो मज धोका
निळ्या नभाचे दर्पण
त्यात जरी ध्रुवतारा
जडतेने ढगाळले
लुप्त आशेचा किनारा !!

—अरविंद सोनांबेकर

# आस्वाद

कृतार्थता, याचना, हुरहुर या साऱ्या एका प्रणयभावनेच्याच कला आहेत. आजच्या कवितांत त्या साऱ्या थोडयाफार प्रमाणाने प्रकट झाल्या आहेत. मनोहर अपोनारायण यांना सावळ्या रात्रीचा शेवट कधीच होऊ नये असे वाटते. या 'जन्मा'त गतजन्मीच्या माधुर्याचा गंध आहे आणि जन्मोजन्मी एकच देखावा राहावा ही त्यांची मागणी आहे. मेंदीभरल्या ओंजळीची छटा शेवटी देऊन आपल्या गीताला त्यांनी एक वेगळे माधुर्य आणले आहे.

'मनस्विनीस' ही श्रीरंग विष्णू जोशी यांची कविता मुक्तछंदात आहे. ती वृत्तबद्ध असती तर अधिक मौज आली असती. पण आहे या स्थितीतही उत्कटता आणि लय यांचा चांगला समवाय साधला आहे. केळीच्या प्रसूतिवेदना पाहून द्रवणारी आणि नीवारकण टिपणाऱ्या चिमण्यांना त्रास नको म्हणून पुढे न येणारी प्रणयिनी अत्यंत सहृदय आहे. फार हलक्या हातांनी तिच्या संवेदनशील मनाचे चित्रण कवीने केले आहे. आणि त्यामुळेच या मनस्विनीने प्रेमिकाच्या मनांतली आग जाणू नये, याचे आश्चर्य शतगुणित होते. मधुर पार्श्वभूमीवर उग्र चित्रण करून कवीने परिणामकारकता उत्तम साधली आहे. एक भावनोत्कट कविता वाचल्याचा आनंद होतो.

'लुप्त आशेचा किनारा' ही अरविंद सोनांबेकरांची कविता म्हणजे अनंताच्या प्रवाहाचे निवेदन आहे. सांताहून अनंताकडे कवीचे मन ओढ घेते. नौकेला लौकिकाचे धक्के बसतात. अंतर दूरदूर जात आहे, याची खंत वाटते. यातले चित्रण तसे फारसे अस्पष्ट नाही. भौतिक आणि आत्मिक जगांची रस्सीखेच हा नेहमीचा विषय थोडया वेगळ्या पद्धतीने मांडला आहे. प्रणयगीताच्या फुलोऱ्यात ही तत्त्वज्ञानात्मक कविता आपल्या वैशिष्टयाने शोभून दिसेल.

प्रभांशू यांनी ज्या डोहाचे वर्णन केले आहे, त्याचे सामर्थ्य खूप दिसते. स्मिताला दिलेली मोराच्या पिसाऱ्याची कल्पना छान आहे. डोहाच्या सौंदर्याने भारावून आत्मसमर्पणाची तयारी कवीने शेवटच्या ओळीत दाखविली आहे. त्यामुळे कविता शेवटी मनावर परिणाम करून जाते.

—गोपीनाथ तळवलकर

# मूळ लेखकासंबंधी थोडंसं

सिगमाँड मॉरिझ ( Zsigmond Moricz, 1879-1942 ) हे विसाव्या शतकातील हंगेरिअन साहित्यिकांपैकी सर्वश्रेष्ठ कादंबरीकार आहेत. अत्यंत कष्टात दिवस कंठणाऱ्या एका शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. एकोणतीस वर्षांचे असताना त्यांच्या लघुकथांनी वाचकांचं लक्ष वेधून घेतलं. मॉरिझ यांच्या लघुकथा आणि कादंबऱ्यांतून ग्रामीण जीवनाच्या खडतरपणाचं आणि खेड्यांतल्या कोंदट वातावरणाचं दर्शन घडवलं गेलं आहे.

पहिल्या महायुद्धातल्या घटनांनी मॉरिझ यांना प्रागतिक विचारसरणीकडे ओढून घेतलं. १९१८ आणि १९१९ च्या राज्यक्रांतींचं त्यांनी अपार आनंदानं स्वागत केलं आणि त्याबद्दल नंतरच्या हॉर्थी राजवटीनं त्यांचा अतोनात छळ केला.

तरीही दोन युद्धांमधल्या काळात मॉरिझ यांनी सामाजिक प्रश्नांवरलं लेखन चालू ठेवलं. ह्या प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी त्यांनी अनेक वार्तापत्रं आणि लेख लिहिले. त्यांचा विशेष रोख नेहमी शेतकऱ्यांच्या दारिद्र्यावर होता.

कामाच्या गडबडीतूनही मॉरिझ यांनी 'Transylvania' ही हंगेरिअन साहित्यांत ऐतिहासिक ठरलेली तीन नाटकं लिहून पूर्ण केली. याच कालावधीत म्हणजे १९२० च्या सुमाराला त्यांच्या आणखी काही कादंबऱ्या प्रकाशित झाल्या.

शेवटल्या काळात मॉरिझ यांनी लिहिलेल्या कथा कादंबऱ्यांमधून समाजाच्या वेदनेचं अतिशय सुंदर शब्दचित्र आढळून येतं. याच काळांत त्यांनी दोन महत्त्वपूर्ण कादंबऱ्या लिहिल्या.

१९४८ च्या हंगेरिअन स्वातंत्र्य युद्धातल्या प्रसिद्ध लुटारू, पण गरिबांचा त्राता असलेल्या एका माणसाच्या-सॅन्दोर रोझाच्या-जीवनावर ह्या कादंबऱ्या आधारलेल्या आहेत.

सिगमाँड मॉरिझ हे त्यांच्या जिवंतपणीच एक मान्यवर लेखक, नाटककार आणि संपादक होते. परंतु त्यांच्या लेखनाचे यश स्वातंत्र्योत्तर काळातच ( १९४५ नंतर ) दिसून आले. त्या वेळेपासून सतत त्यांच्या लेखनानं असंख्य वाचकांवर मोहिनी घातलेली आहे.

सिगमाँड मॉरिझ यांच्या नाटकांचेही हंगेरिअन रंगभूमीवर अनेकदा प्रयोग झाले आहेत. ते आज जनतेचे लेखक झाले आहेत. ...

# आई अन् काकू...

सिगमाँड मॉरिझ

अनुवाद : शाम तारे

आम्ही खूप गरीब होतो. अगदी भिकाऱ्यांपेक्षासुद्धा गरीब. हो! भुकेकंगाल, सुशिक्षितपणापेक्षा जास्त दुसरं एखादं दारिद्र्य असेल, असं निदान मला तरी वाटत नाही.

न्यिरसेगच्या खेड्यामध्ये आम्ही एकांतवासात राहत होतो. या गावातल्या निव्वळ पाऊल ठेवण्याइतक्या जागेवरसुद्धा आमची मालकी नव्हती. त्यामुळं इथल्या अॅकेशियाच्या फुलांचा सुवाससुद्धा आम्हांला त्रासदायक व्हायचा...भरघोस द्राक्षांचे मळे आठवायचे...घोडे-गाईबैलांची खिल्लारं आणि तिझा नदीकाठचं वेढलेलं आमचं खूप मोठं घर आठवायचं छानदार...

जगापासून तोंड लपविण्यासाठी आम्ही इथवर आलो होतो; कारण इथं आमचे नातेवाईक होते...शक्यतोवर नातेवाईकांजवळच राहावं, असं माझ्या वडिलांना वाटायचं—कारण ते खूप दयाळू होते आणि त्यांना लोकांची आवड होती.

पण तरीही नातेवाईक म्हणजे एक त्रासच असतो.

आमचे नातेवाईक एका खूप मोठ्या लांबरुंद पसरट अशा घरांमध्ये राहत होते. गावाच्या अगदी मध्यभागातलं छोट्याछोट्या खिडक्या असलेलं ते मोठंथोरलं घर एखाद्या फोपशासारखं दिसायचं दुरून. आमच्या जुन्या घरापेक्षा हे घर तर भलतंच रद्दी होतं. पण या घरातून आमच्या दिशेनं सारखी आगपाखड व्हायची. व्हिन्सकाका हे आमच्या घराण्यातले सख्खे वाटतच नव्हते. दुहेरी हाडाच्या नि गोबऱ्यागोबऱ्या गालांच्या व्हिन्सकाकांनी आम्हांला नोकर म्हणून घरात ठेवायचं कबूल केलं होतं. माझे वडील त्यांच्यासारख्या शर्टाच्या बाह्या वर करीत नव्हते म्हणून काका त्यांना खूप रागावायचे. त्यांचा लहानसहान गोष्टींवरून द्वेष करायचे.

बायकांमध्ये तर हा द्वेष वाढत्या प्रमाणात होता. माझ्या आईचं नाव ज्यूडिथ. ज्यूडिथ सिमोन्के. तिची आजी सरदार घराण्यातली होती आणि तिचे सगळे नातेवाईक सरदार मंडळींपैकीच होते. व्हिन्सकाकांच्या बायकोचं—म्हणजे माझ्या काकूचं—नाव होतं ईस्थर. ईस्थर सित्के. तिचे वडील कुठल्या तरी प्रदेशात गुराखी होते इतकंच. ते पोलिसांच्या हातून मारले गेले होते, अशीही लोकांमध्ये कुजबुज होती.



**ती एकाएकी गोंधळली.**
**तिनं मोरीत दूध ओतायचं थांबवलं**

दोघीही बायका अशा धारदार पात्यांसारख्या होत्या.

माझ्या आईला तक्रार म्हणून करणं माहीत नव्हतं. शांत, थंड स्वभावाची नि येईल तसं आयुष्य सुस्कारे न सोडता जगणारी बाई होती ती. पण तिच्याजवळच्या लोखंडी पेटचांमधून तिनं छानछान रेशमी कपडे आणि ओंजळी भर-भरून जड जवाहीर ठेवून दिलं असल्याची गावात वदंता होती. तिच्यात मुळीच तथ्य नव्हतं असं नाही, पण होतं तेही उगीच थोडंसं.

शेतावरून एखादे वेळी माझे वडील घरी येत–जात होते. घरी आले की, ते गळा दाबल्यासारख्या आवाजात बोलायचे...माझ्या वडिलांना खूप आशा होती, त्यांचा प्रत्येकावर विश्वास होता नि प्रत्येकाचं भलं व्हावं अशी त्यांची इच्छा असायची. पण ते खूप निराशावादीसुद्धा होते. मग आई अन् वडिलांमध्ये नेहमी तमाशा व्हायचा.

लाजाळूच्या झाडासारखा मी मोठा होऊ लागलो. आई अन् जग यांमधल्या दुव्याचं काम करू लागलो...मला लोकांची भीती वाटायची. गरागरा लांब हात पसरून फिरायचीसुद्धा मला भीती वाटत होती. एखाद्या सापासारखा–मी जगाकडे बघायला लागलो–केव्हाही बिळात शिरता येईल अशा बेतानं, आणि तरीही माझाच लोकांशी संबंध जास्त यायचा. गावाच्या नजरेत मी ह्या कुटुंबाचा प्रतिनिधी होतो. वडील कधीच घरी नसायचे, आणि आई तर गरजच पडल्याशिवाय परसातसुद्धा पाऊल टाकत नव्हती. घरातून बाहेर पडणारा असा मी एकटाच होतो...शाळेत जात होतो... किराणा दुकानात...किंवा दूध आणायलासुद्धा मलाच जावं लागायचं...

दूध. आमच्या साधारण आयुष्यामध्ये अव्हेरली गेलेली अशी ती एकच गरज होती...आमच्या छोटचा छोटचा गरजांमधली. मला स्वत:ला जाणवणारी अशी ही एकच गरज...दूध मला आवडायचं...पण आमच्याकडे गाय नव्हती. गावामध्ये दूध मिळणं मुष्किल असायचं...इकडल्या भागात बाजारात दूध 'विकायला' जात होतं.

रोजच्या रोज दुधासाठी गावातून चकरा मारताना माझा जीव मेटाकुटीला

यायचा. जर माझी आई खूप बोलकी असती आणि तिनं शेजारणींच्या गप्पांमध्ये भाग घेतला असता तर मला दुधासाठी इतकं भटकावंही लागलं नसतं. त्यांनीच आमच्या दारासमोर येऊन दूध घातलं असतं. पण आई त्यांच्याशी बोलत नव्हती अन् त्या दूध आणून देत नव्हत्या...तसा मला आईचा खूप अभिमान वाटायचा. कारण ती शांत होती, सुंदर होती आणि अभिमानी होती.

नाताळच्या सुमाराला एक दिवस ह्या दुधानं आमच्या घरात धमाल माजवून दिली.

दोन–चार चकरा मारूनही अन् लोकांच्या पुढे हातातली पांढरी, तांबडी नाणी धरूनही कुठे मला पेलाभर दूध मिळालं नव्हतं–प्रत्येक घरात भरपूर दूध असून-सुद्धा–काहीजणी तर माझ्यासमोर या पातेल्यातलं दूध त्या पातेल्यात ओतायच्या. एका घरात मी दुधाबद्दल विचारलं, तर त्या घरातली एक गलेलठ्ठ पिचक्या डोळ्यांची कारभारीण कंबरेवर हात देऊन उभी राहिली...मोठ्यानं ओरडली...

" दूधच नाहीय् बेटा. त्यामुळं नाइलाज आहे...नाताळाकरता दूध लावून तर ठेवायला हवं ना ?...छानदार केक करायचेत बाबा अजून...आणि बाजारालासुद्धा पाठवायला हवं दूध...भाव कसा दणकट आहे सध्या बाजारात ! "

थकूनभागून मी घरी पोचलो. रडण्यामुळे चुरचुरणारे डोळे हातांनी पुसत मी आईला म्हटलं,

" दूध कुठेच मिळत नाहीय्...खरं म्हणजे मला कुणी दूध देतच नाहीय् ! "

आईचे काळेभोर डोळे क्षणभर ताणले गेले...निखाऱ्यासारखे...ती बोलली नाही–रडली नाही अन् तिनं सुस्कारासुद्धा सोडला नाही...पण वादळ होणारसं वाटलं, तसा मीच एखाद्या उंदरासारखा कोपऱ्यात अंग चोरून उभा राहिलो.

आईलासुद्धा एक छानदार कॉफीकेक तयार करायचा होता नाताळासाठी. पण ती गप्प होती. शेजारच्या खुजातलं पाणी घेऊन ती कणीक मळू लागली...खोल विचारात असल्यासारखा मी तिच्याकडे बघू लागलो...किलकिले डोळे करून...बाहेर सूर्य बुडायला झाला होता. समोरच्या ताटातला कणकेचा गोळा चेंडूसारखा गोल गोल झाला तशी माझ्या डोक्यात एक कल्पना आली.

" ए आई ग, " मी म्हटलं.

आईनं वर बघितलं तसा मी पुढं म्हणालो,

" मी काकूकडे जाऊन येतो... "

आईची पापणीसुद्धा हलली नाही. आणि मी एखाद्या बेरडासारखा बोलून गेलो होतो ..माझ्या डोक्यावरल्या कपाटातलं सोनेरी कव्हरचं मोठंथोरलं बायबल जरी माझ्या अंगावर आदळलं असतं तरी मी आश्चर्यचकित झालो नसतो, इतका माझा मीच भारून गेलो होतो.

ईस्थरकाकू आमच्या नात्यात होती अन् आमची परिस्थिती गरिबीची होती,

तरीसुद्धा तिच्याकडे आम्ही कधीच काही मागितलं नव्हतं...ईस्थरकाकूकडे चांगल्या सहा गायी होत्या–आणि आमच्याकडे गेल्या तीन दिवसांपासून थेंबभरसुद्धा दूध नव्हतं. फक्त भाजीचा रस्सा शिजायचा..बटाटयाचा, तर कधी टमाटयाचा, पण दुधासाठी खूपच आसुसलो होतो.

सूर्याचा लालभडक गोळा खिडकीतून दिसत होता. आई अजूनही कणीक मळत होती. मग ती म्हणाली,

'जा. जाऊन ये!'

मी काही तरी भलतंच ऐकलं असावं अशी माझी खात्री होती. तिचे शब्द परत घ्यायला तिला वेळ मिळावा म्हणून मी थोडा वेळ तसाच थांबलो, पण ती बोलली नाही–तसा मी टेबलावरचे पैसे उचलून दाराबाहेर धावलो...पण...उंबरठयातच थांबून मी परत आईकडे बघितलं.

"मग मी जाऊ का?"

"हां! जा!"

काकूच्या घरापर्यंत पोचलो तोपर्यंत माझ्या हृदयात कसं धडधड धडधड होत होतं.

काकूच्या दारातल्या कुत्र्यांनी मला खाली पाडायचंच शिल्लक ठेवलं होतं. मला त्यांची भयंकर भीती वाटत होती. व्हिन्सकाकांकडे गावातली सगळयांत अट्टल चावरी कुत्री होती.

एक मोलकरीण घरातून बाहेर आली म्हणून मी वाचलो.

"ईस्थरकाकू कुठाय्?" मी विचारलं.

घाणेरडया कपडयांतल्या त्या मोलकरणीला खूपच राग आलेला दिसत होता. कदाचित् कुत्र्यांऐवजी ही आपल्यावरच डाफरेल असं मला वाटू लागलं होतं.

"तिकडे कोठीघरात" ती रागानं म्हणाली.

मी हळूहळू सरपटल्यासारखा एक डोळा कुत्र्यांवर ठेवून कोठीघराकडे चालू लागलो...पावलाखालच्या गवताच्या काडीचासुद्धा आवाज होऊ देत नव्हतो मी!

शेजारच्या गोठयामधली सर्दशी थंड हवा अंगाला चाटून जात होती.

अन् चालता चालता एकाएकी मी जागच्या जागी स्तब्ध झालो. एखाद्या खडकासारखा ताठ होऊन गेलो... गोठयातून वेगळयाच वाटणाऱ्या किंकाळया ऐकू येत होत्या.

'सोड मला! सोडा मला!' हा ईस्थरकाकूचाच आवाज होता. पण ह्या किंकाळया आपसूकच निघाल्यासारख्या वाटत होत्या.

आतली धडपड ऐकू येत होती. गवताच्या भिंतीला कुणीतरी रेटावं तसल्या प्रकारचा गवताच्या काडयांचा आवाज होत होता. ईस्थरकाकू वाटेल तशा शिव्या देत होती...गुद्दे घातल्याचा आवाज येत होता.

एका माणसाचं हलक्या आवाजांतलं तिरसट हसणं ऐकू आलं.

मी आवाज ओळखला. व्हिन्सकाकांच्या गाडीवानाचा आवाज होता तो. फेरी पाल त्याचं नाव. त्याच्या डोक्यावरच्या हॅटमध्ये नेहमी छान छान पिसं खोवलेली असायची. नुकतीच त्यानं पहिली नोकरी सोडून व्हिन्सकाकांकडे ही नोकरी त्या मस्त मोलकरणीमुळं धरली होती हेसुद्धा मला ठाऊक होतं.

" काय हवंय् तुला ? " काकू कुजबुजली.

" माझ्याकडे आलं पाहिजेस आज...रात्री माझ्याकडे यायला हवं... " पाल म्हणाला.

मी स्तब्ध होतो. भीतीनं पुतळ्यासारखा मी जागच्या जागी गाडला गेलो होतो—अन् जे काही कानांवर आदळत होतं त्यातला शब्दसुद्धा मला समजत नव्हता.

" जाऊ दे मेला..." पुन्हा काकू कुजबुजली.

" येशील का ?...येशील ?...येशील...?...जर तू आली नाहीस तर मी तुझ्या घराला आग लावून देईन....मला फसवण्याचा प्रयत्न करू नकोस...एकदा तू मला सांगितलंस म्हणजे तुला आलंच पाहिजे...मध्यरात्री..."

गोठ्याचं लोटलेलं दार धाड्दिशी उघडलं गेलं आणि ईस्थरकाकू धावतच बाहेर आली.

तिनं मला तिथं उभं असलेलं बघितलं आणि ती जागच्या जागीच गोठून गेली... मी सगळं काही ऐकल्याचं पटकन् लक्षात आलं तसं तिच्या हातांतलं दुधाचं भांडं लख्कन हललं...अगदी पडणारच होतं ते जमिनीवर...

" काय हवंय् तुला ? " काकूच्या डोळ्यात खून चढला होता जणू...ती आपल्याला खाऊन टाकील की काय अशी मला भीती वाटू लागली होती.

" माझ्या आईनं विचारलंय् की भांडंभर दूध आम्हांला द्याल का ? "

" नाही. " ती किंचाळली तसा मी जागच्या जागीच थिजून गेलो—त्या शब्दाच्या मारानं...

ती वळली आणि तिनं घरात वळून बघितलं तशी माझ्या डोक्यात पुन्हा एक कल्पना आली.

" मी पैसे आणलेत दुधासाठी, " मी मलाच आश्चर्य वाटण्याइतक्या मोठ्या आवाजात म्हणालो.

ती थोडीशी मागे सरली. " सांगितलं ना दूध नाहीय म्हणून. " तिनं माझ्याकडे पुन्हा बघितलं, " मला अजून केक तयार करायचेत. "

" हं. " माझ्या शेजारून आवाज आला तसं मी वळून बघितलं. फेरी पाल उभा होता तिथं. काकूपेक्षा मला या पालचाच खूप खूप राग आला होता.

अगदी नाराज होऊन मी घरी परतलो. बराच वेळ मी दरवाजाबाहेरच उभा होतो. दरवाजा लोटून बघण्याचासुद्धा धीर होत नव्हता मला.

आईनं घरात दिवा लावला होता. इकडल्या भागात काच लावलेले तेलाचे दिवे

घरातसुद्धा वापरावे लागत होते. गोठ्यासारखे......दिव्यात तेल नसल्याचं मला माहिती होतं...बाटलीतलं साठवण तर केव्हाच संपलं होतं...

" काकूकडेसुद्धा दूध नाहीय् ती म्हणते, " पैसे टेबलाच्या काठावर ठेवून मी पुटपुटलो.

लोखंडी पुतळ्यासारखी आई एकदम ताठ झाली. तिनं ईस्थरकाकूला खूप ओरडून शिव्या द्याव्या, असं मला वाटत होतं. पण आईनं एक शब्दसुद्धा तोंडातून काढला नाही. फक्त कपाळावरचा घाम टिपत तिनं म्हटलं...

" अस्सं ! "

आमच्यापैकी कुणीच बोललं नाही मग. मी दिव्याच्या कमीजास्त होणाऱ्या...भकभकणाऱ्या वातीकडे बघू लागलो आणि मला वाटलं, खरोखरच या दिव्यानं सगळं तेल संपवलंय्. शिवाय बाटलीतलं तेल तर अगोदरच संपलं होतं...नाताळ जवळ आलाय् तेव्हा वडिलांनी घरी यायला हवं, असाही विचार मनात येऊन गेला. पण ते येत नव्हते तेच बरं होतं...कारण असलं दारिद्र्य् आम्ही कधी बघितलं-सुद्धा नव्हतं....वडील बाहेर असतात तोपर्यंत माणसं असतात त्यांच्याभोवती...मग त्यांना बरं वाटतं. पण... ते घरी येतात, तेव्हा त्यांच्याजवळ साधी दिडकीसुद्धा नसते...

मग लवकरच मला झोप लागल्यानंतरही माझ्या मनात असलेच काहीतरी मोठ्या माणसासारखे विचार येत होते...त्या काळंचाकुट्ट रात्रीच केव्हातरी घराच्या खिडकी-वर थापा दिल्याचा आवाज झाला.

" ज्यूडिथ, ज्यूडिथ ! "

" कोण ईस्थर ? तू ? " आई जवळजवळ ओरडलीच.

" मला आत आत येऊ दे पहिल्यांदा...आत येऊ दे..." ईस्थर म्हणाली.

आईनं तिला आत घेतलं. मी अंथरुणात चळचळा कापत होतो. काडी ओढ-ल्याचासुद्धा आवाज ऐकू येईल इतकं शांत होतं सारं. पण आईनं काडी ओढण्याच्या आतच कुजबुजण्याच्या सुरात ईस्थरकाकू म्हणाली,

" राहू दे ते. मला जिवं मारायचंय् का काडी ओढून ? मला झोपायचंय् इथं..."

आईनं तिच्यासाठी अंथरूण तयार केलं. काकू तशीच झोपून राहिली. मग एकाएकी तिचं किंचाळणं सुरू झालं.

" ओह...हात नको लावूस इथं...खूप त्रास होतोय्.....मेल्यानं सगळी हाडं मोडलीत माझी. " आणि मग ईस्थरकाकू हुंदके देत रडू लागली, " खूप मारलं ग मेल्यानं...अगदी मरेस्तोवर..."

अंधार असल्यामुळं डोळे फाडून बघितलं तरी काहीच दिसत नव्हतं. मी ऐकत होतो तो सारा काकूचाच आवाज होता. आईचं अस्तित्वसुद्धा जाणवत नव्हतं इतकी ती शांत होती.

काकू अजूनही दबलेल्या आवाजात हुंदके देत होती.

"अगदी मूर्ख आहे ग मी ! ...अगदी मूर्ख..." काकू दातओठ खात म्हणाली... "आणि मेल्यानं मला तिथं उघड्यावर तासभर थंडीत कुडकुडायला लावलंन्... जाणार तरी कुठं होते मी ?...तुझ्याकडे येण्याशिवाय गत्यंतरच नव्हतं मला... आणखी कुणाकडे गेले असते तर संपलंच असतं की सारं...मेल्यानं मला फाडून खाल्लं असतं..."

पुन्हा ती रडू लागली...हुंदके देऊ लागली...

"बच्चूचे वडील इथं नाहीत हे मला ठाऊक होतं...आणि शिवाय तुला तर सगळंच माहिती झालंय्..."

"मला ?" आईनं विचारलं.

"त्यानं....बच्चून....सांगितलं नाही का तुला ?" काकू म्हणाली, तशी मला


"डायमंड"

टॅक्सी व रिक्षा मीटर्स

भारतात सर्वप्रथम

डायमंड क्लॉक मॅन्यु. कं. प्रा. लि.,

११८० बुधवार पेठ, पुणे २.

डायमंड वॉच कंपनी

११७९ बुधवार पेठ, पुणे २.

महाराष्ट्रातील ख्यातनाम घड्याळजी. सर्व प्रकारची घड्याळे व इन्स्ट्रूमेंटस् चोख दुरुस्त केली जातात.

बसल्याबसल्याच घेरी आल्यासारखं झालं.

आईनं सुरुवात केली. नेहमीसारख्या साफ...मुलायम...शांत आवाजात ती बोलायला लागली. तिच्या अशाच आवाजाला मी भयंकर भीत असे...अगदी माझे वडीलसुद्धा भ्यायचे असल्या आवाजाला...

"नाही बाई, मला नाही सांगितलं बच्चूनं!" आई म्हणाली. तसा मी, तिचा बच्चू, इथं अंथरुणात झाडावरच्या पानांसारखा थरथर कापत होतो.

एकाएकी ईस्थरकाकू गप्प झाली...मेल्या माणसासारखी...ती बोलली नाही—रडली नाही....तिनं आवाजसुद्धा केला नाही...मग आईला झोपसुद्धा लागली तरी तिच्या पायाशी मुटकुळं करून पडलेल्या मला तिचा थंडगार स्पर्श जाणवत होता.

सकाळी मी उठलो तेव्हा सारं कसं नेहमीसारखं होतं. आईनं स्टोव्ह पेटवला होता नि ती कामाला लागली होती.

कपडे करून मी न्याहरीसाठी आईपुढं बसलो होतो तेवढ्यातच ईस्थरकाकूची ती मोलकरीण—सू तिचं नाव—आली होती.

ती पूर्वीच्यासारखीच आनंदी नि छानदार वाटत होती. काळच्यासारखी रागीट वाटत नव्हती की वेडावून बोलत नव्हती.

"बाईंनी हे दुधाचं भांडं दिलंय्,...संध्याकाळचं सगळं दूध दिलंय...म्हणाल्या...त्यांच्याकडे केक करायचेत म्हणून साय मात्र काढून घेतलीय्...' सू म्हणाली.

"ठीक आहे सू...ठीक आहे म्हणावं...आणि...थांब हं जराशी...हे एरिंग्ज दे तुझ्या मालकिणीला...सांग म्हणावं मी दिले आहेत...हं...?..."

आणि बोलता बोलता आईने तिच्या त्या लोखंडी पेटीचं झाकण उघडलं आणि एक छानदार एरिंग्जचा जोड बाहेर काढला.

दूध इतकं महाग झालं असावं असं मला वाटत नव्हतं...पण सूनं जितक्या आनंदानं अन् तत्परतेनं एरिंग्ज घेण्याकरिता हात पुढे केला तितक्याच तत्परतेनं मी दुधाचं भांडं हाती घ्यायला पुढं झालो. दुधाच्या न्याहरीकरता मी इतका आसुसलो होतो की आता एक क्षणही थांबायची माझी तयारी नव्हती...

पण आईनं दुधाचं भांडं उचललं आणि ती सावकाश त्यातलं दूध मोरीत ओतू लागली. आमच्या इथल्या छोट्याशा डुकराला झालं असतं थोडसं दूध. पण...

माझा चेहरा एकदम पडला नि मला खूप भीती वाटायला लागली. आई माझ्याकडे बघत होती...एकाएकी ती गोंधळली...तिनं मोरीत दूध ओतायचं थांबवलं तशी धार बारीक होत गेली...थेंब पडू लागले आणि अखेर तेही बंद झाले.

शेवटी आईनं एक लांब सुस्कारा सोडला. तिच्या सुंदर पण उदासवाण्या गालांवरून एक अश्रू ओघळला...अन् म्हणाली,

'बच्चू...! तुझा पेला आण बरं इकडे...'

●

# नाझी

# भस्मासुराचा उदयास्त

: लेखक :

रा. म. शास्त्री

पुस्तकाच्या छपाईस १५ ऑगस्टपासून प्रारंभ

रॉयल आकार : पृष्ठसंख्या सुमारे पाचशे

भरपूर छायाचित्रे

**राजहंस प्रकाशन**

४१९ नारायण पेठ, पुणे २.

२७ ऑगस्ट १९६६



प्र च लि त  वि ष य

# रिपब्लिकन पक्षाचा आत्मघात

निवडणुकीची पहिली सलामी
मा. यशवंतराव व दादासाहेब

बरोबर एकेचाळीस वर्षांपूर्वी नाशिकमधील मल्हारखाणीच्या खोल तळयात तेहतीस वर्षांचे तरुण वकील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पोहण्यासाठी उतरले होते. पण त्या दिवशी काय झाले कुणास ठाऊक, त्यांनी त्या तळयात उडी मारली आणि ते खालीच गेले. नाकातोंडात पाणी जाऊन ते गटांगळया खाऊ लागले आणि बुडण्याच्या पंथाला लागले.

नाशिकला डॉ. आंबेडकर अस्पृश्यांच्या ज्या वसतिगृहात उतरत असत, त्याचा तेवीस वर्षांचा तरुण संचालक जवळच होता. तो पोहत पोहत पुढे गेला होता. बुडत असलेल्या डॉ. आंबेडकरांकडे त्याचे लक्ष जाताच वेगाने हात मारीत तो मागे आला आणि त्याने स्वतःचा जीव धोक्यात घालून नाकातोंडात पाणी गेलेल्या, अर्धवट शुद्धीवर असलेल्या डॉ. आंबेडकरांना बाहेर काढून त्यांचे प्राण वाचवले.

तो तरुण म्हणजेच श्री. भाऊराव कृष्णराव तथा दादासाहेब गायकवाड. एकेचाळीस वर्षांपूर्वी बुडण्याच्या पंथाला लागलेल्या डॉ. आंबेडकरांना मृत्यूच्या दाढेतून ओढून काढून गायकवाडांनी भारतातील तमाम हरिजनांवर फार मोठे उपकार केले. पण आज डॉ. आंबेडकरांच्या कर्तृत्वाचे फळ म्हणून निर्माण झालेला रिपब्लिकन पक्ष राजकारणात गटांगळया खाऊन बुडण्याच्या बेताला आला आहे आणि काही अपवाद सोडता श्री. दादासाहेब गायकवाड, रामचंद्र धोंडिबा भंडारे आदी डॉ.

आजपर्यंत हुकमी सामाजिक शक्ती पाठीशी असलेला सामर्थ्यवान रिपब्लिकन पक्ष येत्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर शिल्लक उरेल काय ?

पक्षाची ज्या दिशेने गती चालू आहे ती पाहता त्याचा शेवट जवळ आला आहे, हे स्पष्ट दिसते. अशा संकुचित पायावर उभ्या असणाऱ्या अल्पसंख्याकांच्या पक्षाचा शेवट लोकशाहीच्या विकासाबरोबर अपरिहार्यही असतो. प्रश्न एवढाच आहे, की हा शेवट करताना रिपब्लिकन पक्षाच्या नेत्यांनी आपल्या समाजाच्या एकंदर व्यापक हिताची जाणीव ठेवली की केवळ राजकीय संधिसाधूपणा केला ?

—त्याची ही चर्चा.

लेखक

# अभ्यासक

आंबेडकरांचे अनुयायीच पक्षाला वाचविण्याऐवजी त्याचे डोके अधिक खोल दाबीत आहेत, हे दुर्दैव आहे. त्यांच्या कृतीमुळे पक्षाचा पाय अधिकच खोलात जाऊ लागला आहे. पक्ष जवळ जवळ संपला आहे.

**काँग्रेसशी हातमिळवणी**

काँग्रेस-रिपब्लिकन युती ही या सार्वत्रिक निवडणुकीची पहिली सलामी. एका क्रांतिकारी समाजाचे हुकमी पाठबळ असलेल्या सामर्थ्यवान विरोधी पक्षाला आपलेसे करून घेऊन काँग्रेसने या पहिल्याच सलामीत महाराष्ट्रामध्ये विरोधी राजकारणावर मात केली आहे. काँग्रेसने रिपब्लिकन पक्ष गिळंकृत केला तोही एकदम नव्हे. हप्त्या-हप्त्याने. प्रथम यशवंतरावजी चव्हाणांनी ऐंशी टक्के रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्रात पाठबळ असलेल्या दादासाहेब गायकवाडांच्या गटाशी निवडणुकीच्यापुरती हातमिळवणी करून पक्षाचा मोठा लचका तोडला. आणि त्यांच्यावर कडी करण्यासाठी म्हणूनच की काय, मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीने रिपब्लिकन पक्षाच्या भंडारे गटाचे आपल्यात बिनशर्त विलीनीकरण करवून घेतले. या दुहेरी युतीमुळे रिपब्लिकन पक्षाच्या पुढाऱ्यांनी — डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या क्रांतिकारक ध्येयांनी प्रेरित होऊन रिपब्लिकन पक्ष स्थापण्याचे ठरविले होते — त्या ध्येयांना हरताळ फासला आहे, ही तत्त्वच्युती आहे.

## जन्माआधीच धक्का

डॉ. आंबेडकरांनी पहिली राजकीय संघटना स्थापन केली, ती १९३६ साली 'स्वतंत्र मजूर पक्ष' या नावाने. सर्व धर्मपंथांच्या लोकांना हा पक्ष खुला होता खरा, पण त्यात अस्पृश्यांचाच भरणा अधिक होता. याच पक्षाचे पुढे १९४२ साली डॉ. आंबेडकरांनी 'अखिल भारतीय शेडचूल्ड कास्ट फेडरेशन' मध्ये रूपांतर केले. हरिज्न समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठीच या पक्षाचा जन्म झाला होता.

पण केवळ एका विशिष्ट समाजासाठी, त्याच्या हितसंबंधांच्या रक्षणासाठी स्थापन केलेल्या राजकीय पक्षाची, त्या समाजाची ध्येये साध्य झाल्यानंतर काय चमत्कारिक स्थिती होऊ शकेल याची डॉ. आंबेडकरांना पूर्ण कल्पना असली पाहिजे. म्हणूनच त्यांनी, " सामाजिक, राजकीय व आर्थिक न्याय, विचार, प्रचार व श्रद्धा आदींचे स्वातंत्र्य, प्रगतीसाठी समान दर्जा व संधी प्रत्येक व्यक्तीला मिळ-वून देण्यासाठी " एक धर्मपंथनिरपेक्ष, संसदीय राज्यघटनेवर विश्वास ठेवणारा अखिल भारतीय पक्ष स्थापन करण्याची घोषणा १९५६ साली बौद्ध धर्माची दीक्षा घेताना केली. परंतु दुर्दैवाने या नियोजित पक्षाचा जन्म होण्याअगोदरच डॉ. आंबेडकर निधन पावले आणि जन्मापूर्वीच पक्षाला हा पहिलाच धक्का बसला.

डॉ. आंबेडकरांच्या मृत्यूनंतरही त्यांच्या अनुयायांनी त्यांच्या घोषणेप्रमाणे १९५८ साली मद्रासचे खासदार एन्. शिवराज यांच्या अध्यक्षतेखाली सध्याचा 'अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षा'ची स्थापना केली. परंतु या अनुयायांमध्ये डॉ. आंबेडकरांच्या तोडीचा, दूरदृष्टी असलेला, आपल्या समाजाव्यतिरिक्त साऱ्या जनतेत मान्यता पावू शकणारा व समाजाच्या प्रश्नांची सापेक्ष जाणीव असलेला पुढारी कुणी नव्हता. त्यामुळे नव्या अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाची भारतीय जनतेला ओळख झाली, ती तो केवळ एका समाजाचाच पक्ष म्हणून. शेडचूल्ड कास्ट फेडरेशनचे हे नवे नाव होते. व्यापक स्वरूपाचा, सर्व समाजांतील, सर्व थरांतील व्यक्तींना आकृष्ट करू शकणारा राजकीय पक्ष असे स्वरूप त्या पक्षाला कधी लाभलेच नाही.

पक्षाने आपल्या हरिजन व नवबौद्ध समाजांच्या हितसंबंधांचा मात्र जोरदार पुरस्कार करून मोठ्या तडफेने त्यांचे प्रश्न धसास लावले. त्यामुळे आधीच डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली भक्कम संघटित असलेला समाज रिपब्लिकन पक्षाच्या झेंड्याखाली अधिक संघटित झाला. आणि आज भारतात, विशेषतः महाराष्ट्रात, सर्वाधिक बळकट संघटना आणि हुकमी सामर्थ्य असलेला पक्ष म्हणून रिपब्लिकन पक्ष ओळखला जातो. भारतातील सहा कोटी हरिजनांपैकी (त्यातील आता एक कोटीच्याही वर बौद्ध झालेले आहेत, अधिक होत आहेत.) चार कोटी या पक्षात आहेत. आणि पक्षाच्या एका हाकेसरशी पक्षासाठी खुशीने प्राण द्यावयास ते तयार आहेत. रिपब्लिकन पक्षाने गेल्या वर्षी हाती घेतलेल्या भूमिहीनांना जमिनी मिळवून

देण्याच्या सत्याग्रहात साऱ्या भारतातून चार लाख तीस हजार सत्याग्रही तुरुंगात गेले होते. स्वातंत्र्यपूर्व बेचाळीस सालच्या सत्याग्रहात किती सत्याग्रही तुरुंगात गेले होते आणि कम्युनिस्ट, संयुक्त समाजवादी आदी पक्ष चळवळ उभारतात तेव्हा किती जातात याच्याशी वरील आकड्याची तुलना केली असता रिपब्लिकन पक्षाची हुकमी ताकद प्रभावीपणे ध्यानात येईल.

अर्थात एवढी आश्चर्यकारक संघटना आणि ताकद या समाजात निर्माण केली ती-डॉ. आंबेडकरांनीच. हजारो वर्षे सवर्णांच्या क्रूर दडपशाहीखाली पिचत पडलेल्या व अपमानास्पद जिणे जगणाऱ्या या गरीब समाजात स्वाभिमान आणि ताठरपणा निर्माण केला तो डॉ. आंबेडकरांनीच.

## एका पिढीतील क्रांती

तसे पाहता हिंदुस्थानात सर्वांत जास्त भाविक आणि धर्मभीरू वर्ग कोठला असेल तर तो अस्पृश्यांचा होता. तीर्थयात्रांना सर्वांत जास्त गर्दी लोटायची ती याच समाजाची. पण आज यांपैकी दीड कोटींच्यावर हरिजनांनी आपल्या धर्माचे पिढ्यान् पिढ्यांचे संस्कार तोडून टाकून नवा धर्म उचलला आहे. जुन्या देवांची सतत तोंडात घोळणारी नावे प्रयत्नपूर्वक टाकून देऊन त्या जागी नव्या प्रार्थना, नवे विचार व आचार आत्मसात करण्याचे त्यांचे प्रामाणिक प्रयत्न चालू आहेत आणि हिंदू धर्माभिमान्यांना राग येईल – पण हिंदू धर्मात राहून युगानुयुगे त्यांची जेवढी प्रगती झाली नव्हती तेवढी आता नवबौद्धांची होत आहे.

हरिजनांच्या एका पिढीत झालेली ही क्रांती खरोखर आश्चर्यजनक आहे. पिढ्यान् पिढ्या म्हसोबा, मरीआई अशा सवर्णांनी टाकून दिलेल्या देवांना पूजणारे, आळंदी-पंढरीच्या वाऱ्या करून लांबूनच देवाचे दर्शन घेणारे हरिजन आता नवबौद्ध म्हणून फक्त भगवान बुद्धाचे नाव घेतात. पूर्वी संस्कृत श्लोक, पूजा, स्तोत्रे वर्ज्य असल्याने केवळ ज्ञानबा–तुकारामांच्या गजरावर आणि भजनांवर आपली भूक भागविणारे हे लोक 'बुद्धं सरणं गच्छामि' सारख्या जवळ जवळ नव्या भाषेतील प्रार्थना सामुदायिकपणे शाळांमध्ये, मोहल्ल्यांमध्ये मोठ्या अभिमानाने म्हणू लागले आहेत. त्यांच्यांतील उत्साही तरुण पाली भाषेचा मनापासून अभ्यास करीत आहेत व बौद्धांच्या ठिकठिकाणी भरणाऱ्या परिषदांमध्ये उत्साहाने भाग घेत आहेत.

१९५६ साली जेव्हा प्रथम डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धर्म स्वीकारला आणि त्याची लाट महाराष्ट्रातील आणि बाहेरील हरिजनांमध्ये पसरू लागली तेव्हा अनेक हरिजनांनी, म्हाताऱ्या–कोताऱ्यांनी, स्त्रियांनी आपापले देव नद्यांमध्ये बुडवले. त्या जागी त्यांनी भगवान बुद्धाच्या मूर्ती बसविल्या. आज कोणत्याही नवबौद्धाच्या घरात अथवा झोपडीत प्रवेश केल्यास तेथे देवाच्या मूर्ती तर राहोच, हिंदू देवांची चित्रे असलेली कॅलेंडर्सदेखील दिसणार नाहीत. देवाचे नाव तोंडातून निघू नये

म्हणून बाया जात्यावर दळताना ओव्या म्हणणार नाहीत.

गाव तेथे महारवाडा असे पूर्वी लोक म्हणत. महाराष्ट्रात तरी या सर्व महारवाड्यांचे बौद्धवाडे झाले आहेत. बौद्ध वाड्यांमधल्या घरांघरांतील तुळशी आणि देव आता गेले आहेत. भगवान बुद्धाच्या आणि आंबेडकरांच्या तसबिरी त्या जागी आल्या आहेत. काही बौद्धवाड्यांतून रोज संध्याकाळी किंवा काहींतून आठवड्यातून एकदा सारे स्त्री-पुरुष एकत्र येतात आणि पाली भाषेतील विशरद, पंचशील आदी प्रार्थना म्हणतात. त्याचा मराठीतील अर्थ त्यांना सांगितला जातो. भेटल्यावर 'राम राम' करण्याची पद्धत त्यांनी पार टाकून दिली आहे. आता 'जय भीम' अशी डॉ. आंबेडकरांच्या नावाची घोषणा करूनच ते परस्परांना अभिवादन करतात.

हिंदूंचे सारे सण नवबौद्धांनी टाकून दिले आहेत. ते फक्त बौद्ध जयंती, आंबेडकर जयंती आणि आंबेडकर निर्वाण दिन एवढेच दिवस पाळतात. तेही सामुदायिक रीतीने. एक अभिनव काटकसरीपणा आणि नेटकेपणाही नवबौद्धांनी प्रयत्नपूर्वक अंगी आणला आहे. घरात कुणी मृत्यू पावला की घाला गावजेवण. ही प्रथा त्यांनी आता बंद केली आहे. त्यांचे अंत्यसंस्कार बौद्ध भिक्षूंच्या प्रार्थनेने होतात. त्यांची लग्ने अत्यंत साधेपणाने होतात. शुभ्र पोषाखातील वधूवरांना आलेले पाहुणे शुभ्र फुलांच्याच अक्षता वाहतात. वधूवरांच्या अंगावर दागिने नसतात. असतात ते फुलांचे. काही बौद्ध भिक्षू पालीतील प्रार्थना म्हणतात आणि जमलेली वडील मंडळी वधूवरांना आशीर्वाद देतात. लग्नाला मुहूर्त नसतो. बाहेरगावची मंडळी लग्ने लावून लगेच परत जातात. ऐपत नसेल तेथे जेवणावळी मुळीच होत नाहीत. लग्नात मंत्र-तंत्र नाही, काही नाही.

हिंदूंनी तुच्छ लेखलेल्या या गुणी समाजात स्वच्छतेची, नेटकेपणाची, काटकसरीची व साधेपणाची एक सुरेख संस्कृती जन्म घेते आहे. आणि या जाणीवेमुळे त्यांच्यांत एक नवा स्वाभिमान व कडवेपणा येत आहे. हजारो वर्षे दडपून ठेवलेली मने या क्रांतीने आता प्रकट होत आहेत.

आजही उरलेल्या हरिजनांचे बौद्ध धर्मात परिवर्तन अद्याप हळूहळू चालू आहे. डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतली त्या वेळी ज्या वेगाने कार्य झाले त्या वेगाने जरी आता ते कार्य चालू नसले तरी ते संथपणे चालू आहे. सरकारदप्तरी जरी नवबौद्धांची संख्या पस्तीस लाखांवरच असली तरी केवळ हरिजनांच्या सवलती मिळाव्या म्हणून बौद्ध धर्म न लावणारीही अनेक मंडळी आहेत. बौद्ध महासभेच्या अंदाजाप्रमाणे दीड कोटीच्यावर तरी नवबौद्ध असावेत. महाराष्ट्रातील हरिजनांपैकी ९० टक्क्यांच्यावर बौद्ध झाले आहेत. साऱ्या हरिजनांना बौद्ध करण्याची तर नवबौद्धांची तयारी आहेच, पण अखिल भारतीय समाजही पुढे बौद्ध धर्माचाच स्वीकार करील असा त्यांचा विश्वास आहे. आणि या क्रांतीची त्यांची तयारी चालू आहे.

## पक्षाचे संकुचित स्वरूप

हिंदू समाजाच्या नजरेसमोर घडत असलेली पण जवळजवळ दुर्लक्षित झालेली ही प्रचंड किमयायुक्त क्रांती घडवून आणण्याचे श्रेय आहे अर्थातच डॉ. आंबेडकरांना. मेलेल्या मनांमधून एक नवा क्रांतिकारक समाज त्यांनी निर्माण केला. या नव्याने आशा पालवलेल्या, नव्या आकांक्षा निर्माण झालेल्या, क्रांतिकारक समाजाचे रिपब्लिकन पक्षाला संपूर्ण पाठवळ मिळाले, त्यायोगे साऱ्या समाजात क्रांती घडवून आणण्याची क्षमता त्या पक्षात निर्माण झाली असती. पण दुर्दैव पक्षाचे आणि देशाचे. या क्रांतिकारक समाजाला कणा समजून त्याभोवती सर्व समाजास आकृष्ट करू शकणारा नवा व्यापक पक्ष निर्माण करण्याची डॉ. आंबेडकरांची इच्छा होती. पण प्रत्यक्ष पक्ष निर्माण झाला तेव्हा हा समाज म्हणजेच पक्ष असे समीकरण झाले आणि हा समाज कधीही बहुमत मिळवू शकणार नाही, अशा कायमच्या अल्पसंख्याकांचा !

राजकीय पक्षाच्या दृष्टीने ही स्थिती मोठीच चमत्कारिक होती. आजही अशीच परिस्थिती आहे. आमचा पक्ष सर्वांना खुला आहे असे जरी पक्षनेते आज सांगत असले तरी हरिजन, नवबौद्ध समाजाबाहेरच्या एकाही व्यक्तीला ते आकृष्ट करू शकत नाहीत. नव्हे, त्यांनी तसा प्रयत्नच केला नाही. त्यांनीच जाणून बुजून आपला पक्ष हा धार्मिक पक्ष करून टाकला व त्याला केवळ एका मठाचे स्वरूप दिले. आणि धर्मप्रचारासाठी पक्षाचे व्यासपीठ वापरले. अशा परिस्थितीत पक्षाला व्यापक राजकीय पक्षाचे स्वरूप येणे शक्य नव्हते.

पक्षाचे आणखी दुर्दैव असे की डॉ. आंबेडकर अगोदरच निधन पावल्याने पक्षाला अखिल भारतीय पातळीवर प्रभावी नेतृत्वही कधीच मिळू शकले नाही. त्याची जागा पक्षाने आंबेडकरांच्या फोटोने भरून काढली. दुसऱ्या कोठल्याही भारतीय पुढाऱ्याला क्वचितच मिळाले असेल एवढे आपल्या अनुयायांचे प्रेम डॉ. आंबेडकरांना मिळाले आहे. आज त्यांच्या फोटोची अक्षरशः पूजा होते. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर इतर प्रांतांतही ही प्रथा असल्याचे सांगतात. एवढी व्यक्तिपूजा स्वतः डॉ. आंबेडकरांना मुळीच आवडत नव्हती. आपल्या एकावन्नाव्या वाढदिवसानिमित्त 'नवयुग' साप्ताहिकाने काढलेल्या आंबेडकर जयंती विशेषांकात त्यांनी लिहिले—
" आपल्या देशात राजकीय पुढाऱ्याला अवतारी पुरुषाप्रमाणे मान दिला जातो ही दुर्दैवाची गोष्ट आहे. हिंदुस्थानबाहेर केवळ महापुरुषांच्याच जयंत्या साजऱ्या होतात. पण हिंदुस्थानात अवतारी पुरुषांप्रमाणे राजकीय पुढाऱ्यांचेही जन्मदिवस पाळले जातात ही दुःखाची गोष्ट आहे. व्यक्तिशः माझा वाढदिवस व्हावा, हे मला मुळीच पसंत नाही. मी लोकशाहीचा कट्टर पुरस्कर्ता आहे. तेव्हा मला विभूतिपूजा कशी आवडेल ? विभूतिपूजा हा लोकशाहीचा विपर्यास आहे. पुढारी लायक असेल तर त्याच्याबद्दल प्रेम, कौतुक व आदर बाळगण्यास हरकत नाही. तेवढ्यानेच पुढाऱ्याचे व त्याच्या अनुयायांचे समाधान झाले पाहिजे; पण पुढाऱ्याची देवाप्रमाणे पूजा करणे

ही गोष्ट मला बिलकुल मान्य नाही. त्यामुळे पुढाऱ्याबरोबर त्याच्या भक्तांचाही अध:पात होतो."

डॉ. आंबेडकरांनी एवढा गंभीर इशारा देऊनही त्यांच्या अनुयायांनी तो ऐकला नाही. रिपब्लिकन पक्षाने म्हणजेच त्या समाजाने डॉ. आंबेडकरांच्या फोटोची पूजा करून त्यांना आपल्या नेतृत्वाच्या पकडीत एवढे जखडून टाकले की ते केवळ एका समाजाचे नेते उरले आणि तो पक्षही डॉ. आंबेडकरांचा झाला. इतर कुणी पक्षात येऊन लुडबुड करण्याची गरज उरली नाही. डॉ. आंबेडकर केवळ त्याच समाजाचे हक्काचे नेते झाले.

## समस्या सुटण्याच्या मार्गावर

तेव्हा रिपब्लिकन पक्ष हा एका विशिष्ट समाजाचा पक्ष म्हणून ठरला व त्या समाजाचे सारे प्रश्न व अडचणी सोडवून घेणे हे ध्येय. स्वातंत्र्याच्या एकोणीस वर्षांच्या काळात हरिजनांचे बरेच प्रश्न सुटले आहेत म्हणा किंवा सुटण्याच्या मार्गावर आहेत. डॉ. आंबेडकरांच्या, महात्मा गांधींच्या प्रयत्नाने म्हणा किंवा साऱ्या समाजात हळूहळू जागृती होत असल्यामुळे म्हणा समाजातील अस्पृश्यता आता नाहीशी होत चालली आहे. शहरांमधून अस्पृश्यता नाहीशी झाली आहे. खेड्यांमधून हळूहळू होत आहे. खेड्यांत या गोष्टीला वेळ लागेल पण ती होत आहे हे निश्चित. हरिजनांना हव्या असणाऱ्या राजकीय व आर्थिक सवलती पुरेशा मिळाल्या आहेत. त्याच सवलती नवबौद्धांनाही चालू ठेवण्याचा निर्णय सरकारने नुकताच घेतलेला आहे. आज शिक्षणामध्ये, नोकऱ्यांमध्ये सर्व समाजाच्या बरोबरीने हरिजनांची व बौद्धांची मुले पुढे आहेत. एवढेच नव्हे तर कितीतरी दरिद्री सवर्णांपेक्षा हरिजनांना शिक्षण मिळणे अधिक सुलभ झाले आहे. खेड्यांमध्ये काही ठिकाणी हरिजनांवर व नवबौद्धांवर अत्याचार झाल्याची उदाहरणे अद्याप घडतात. पण प्रमाण कमी होत आहे.

आपल्या समाजाचे आर्थिक आणि राजकीय प्रश्न सोडविण्यासाठी रिपब्लिकन पक्षानेच खास प्रयत्न करावेत असे तीव्र प्रश्न उरलेले नाहीत, ही आता वस्तुस्थिती आहे.

## नेतृत्वस्पर्धेतून गटबाजी

तेव्हा पक्षाने आपल्यापुढे ठेवलेली सारी सामाजिक ध्येये तर अगोदरच साध्य झालेली, स्वतंत्र व्यापक स्वरूपाचा राजकीय पक्ष होण्यासाठी लागणारी साधने जन्मत:च छाटून टाकलेली व कायमचा अल्पसंख्याकांचा पक्ष म्हणून जिवंत राहण्याचे भवितव्य. त्यातच नेतृत्वासाठी पक्षात भांडणे माजलेली....

महाराष्ट्रातील रिपब्लिकन पक्षात आज तीन प्रमुख गट आहेत. पहिला श्री. दादासाहेब गायकवाडांचा. हा सर्वांत सामर्थ्यवान गट म्हणून ओळखला जातो. दादासाहेबांचे प्रतिस्पर्धी जरी हे मान्य करीत नसले तरी या तीन गटांपैकी याच

गटाशी यशवंतराव चव्हाणांनी निवडणुकीसाठी हातमिळवणी केली त्यावरून याची खात्री पटेल. दुसरा गट श्री. रामचंद्र घोंडिबा भंडारे यांचा आणि तिसरा श्री. बापू चंद्रसेन कांबळे यांचा. हे तीनही गट स्वतःलाच खरा रिपब्लिकन पक्ष मानतात. शिवाय विदर्भामध्ये श्री. आवळे यांचा विदर्भवादी गट आहे तो वेगळाच. पण श्री. गायकवाडांच्या गटातील लोक तो आपलाच गट आहे असे मानतात. श्री. गायकवाड हे अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष आहेत. रिपब्लिकन पक्षातीलही समंजस माणसे नेतृत्वस्पर्धा हेच या गटबाजीचे कारण आहे, असेच सांगतात.

अशा रीतीने गटबाजीने जेरीस आलेल्या, सामाजिक उद्दिष्ट संपलेल्या व राजकीय भवितव्य नसलेल्या रिपब्लिकन पक्षापुढे तीन पर्याय होते.

## तीन पर्याय

पहिला म्हणजे पक्षाच्या कक्षा वाढवून पुन्हा एकदा व्यापक स्वरूपाचा, सर्व समाजाचे लोक ज्यात आकृष्ट होतील असा एक खराखुरा बलवान राजकीय पक्ष निर्माण करणे. हरिजन नवबौद्ध समाजांव्यतिरिक्त इतर दलित वर्गांना, दरिद्री वर्गांना पक्षात आकृष्ट करणे सहज शक्य होते. पक्षातील मुख्य घटक असलेल्या नवबौद्ध समाजाची क्रांतिकारक वाटचाल पाहता असा पक्ष खरोखरच एक मोठी राजकीय शक्ती म्हणून वावरला असता. पक्षापुढील हाच सर्वोत्तम पर्याय होता. पण त्यासाठी पक्षनेत्यांना पक्षकारण आणि धर्मकारण अलग करावे लागले असते आणि त्यांना आपल्या सर्वंकष नेतृत्वाचीही कसोटी द्यावी लागली असती.

दुसरा पर्याय म्हणजे आपल्या क्रांतिकारक सामाजिक तत्त्वांशी मिळते घेणाऱ्या व संसदीय राज्यव्यवस्थेवर विश्वास ठेवणाऱ्या एखाद्या पुरोगामी विरोधी, वर्गीय अथवा राष्ट्रीय पक्षात विलीन होणे. त्यायोगे देशातील विरोधी राजकारणाची ताकद एकदम वाढली असती हे निश्चित. तसेच पुरोगामी विरोधी राजकारणाला एक वेगळीच धार आली असती आणि देशावरील एकपक्षीय हुकूमशाहीचा वाढता धोका कमी झाला असता.

तिसरा आणि सर्वांत शेवटचा पर्याय म्हणजे काँग्रेसमध्ये विलीन होणे. हा पर्याय म्हणजे पक्षाचा आत्मघात करतानाही ज्या ध्येयासाठी डॉ. आंबेडकर झगडले व ज्यासाठी पक्षही झटला त्या क्रांतिकारक ध्येयांना तिलांजली देणे. जातीय राजकारणाला नवी धार चढवणे.

## फायदा फक्त पुढाऱ्यांचा

श्री. कांबळे यांचा गट सोडता इतर पक्षांची प्रगती दुर्दैवाने याच दिशेने चालू असल्याचे दिसते. श्री. भंडारे यांनी काँग्रेसमध्ये बिनशर्त विलीनीकरण स्वीकारले तर श्री. दादासाहेब गायकवाड यांनी निवडणुकीसाठी हात पुढे केला. गायकवाड गट काँग्रेसच्या जवळ कधीच नव्हता. उलट काँग्रेसचा कट्टर विरोधक आणि कडवा क्रांतिकारी गट म्हणून तो महाराष्ट्रात ओळखला जात होता. एवढे असूनही या दोन

गटांनी आपल्या भूमिकेशी जुळणाऱ्या एखाद्या विरोधी पक्षाच्या जवळ न जाता काँग्रेससारख्या प्रतिगामी आणि केवळ धर्मातीत हे नाव लावून उघड जातीय व धार्मिक राजकारण चालविणाऱ्या पक्षाबरोबर घरोबा का केला? यात शुद्ध राजकीय स्वार्थ आहे. यात फायदा कुणाचा होणार असेल तर तो पुढाऱ्यांचा. त्यांच्या समाजाचा मुळीच नाही.

## जातीयतेपुढे शरणागती

इतकी वर्षे काँग्रेसच्या विरोधात राहून आम्ही जातीय दुष्टावा सहन केला. आता हा जातिकलह संपविण्यासाठी व आमच्या पक्षाचे सामाजिक अभिसरण होण्यासाठी आम्हांला काँग्रेसशी सहकार्य करणे भाग आहे, अशी अगतिक कारणे या दोन्ही गटांचे पुढारी आपल्या कृतीचे समर्थन करताना सांगतात. यांतच काँग्रेसच्या विरोधात राहिल्यामुळेच आमच्यावर जातीय अन्याय होतात याची कबुली आहे. हे जातीय अन्याय थांबविण्यासाठी त्या पक्षाला शरण जायचे की साऱ्या पुरोगामी पक्षांना एकत्र आणून या जातीयतेविरुद्ध लढा द्यावयाचा, हा प्रश्न पक्षनेत्यांपुढे होता. त्यांनी पहिला पर्याय स्वीकारला.

काँग्रेसचे अवघे राजकारण जातीयतेवर आहे, याची कबुली प्रांजल काँग्रेसनेतेही देतात. अशा या जातीय पक्षात जाऊन अथवा त्याच्याशी निवडणुकीत सहकार्य करून आपल्या पक्षाचे खरोखरच सामाजिक अभिसरण होईल, असे या पक्षनेत्यांना प्रामाणिकपणे वाटत असेल किंवा काय याबद्दल शंका येते. काँग्रेसमधील इतर जातीय गट जसे जास्तीत जास्त तिकिटे मिळविण्यासाठी आपापसात लाथाळ्या करतात आणि यात अधिक कडवे जातिनिष्ठ बनतात तसेच आता रिपब्लिकन पक्षाचेही व्हावयाचे. पक्षनेत्यांना अभिप्रेत असलेले सामाजिक अभिसरण जातिनिरपेक्ष विरोधी पक्षांतच झाले असते.

पुन्हा या समाजाच्या अशा काही फार मोठ्या समस्या उरल्या आहेत की, ज्या सत्ताधारी पक्षात गेल्यानंतरच सुटतील असेही नाही. समाजाचे मोठे प्रश्न आतापर्यंत काँग्रेसच्या विरोधात राहूनच सुटले. शिवाय असे प्रश्न सोडविण्यासाठी आपल्या जातिविरोधी क्रांतिकारक तत्त्वांना हरताळ फासून सत्ताधारी पक्षास शरण जाणे हे कितपत योग्य आहे हा प्रश्न अलाहिदा.

## तिकीट स्पर्धा

तेव्हा सामाजिक अभिसरणासाठी काँग्रेसबरोबर सहकार्य यांसारख्या हास्यापद आणि दांभिक कारणांची अधिक चर्चा करण्याची गरज नाही. गायकवाड गटाने काँग्रेसशी निवडणूक समझोता केल्याचे कळताच भंडारे गटातील तिकीट इच्छुकांची कशी तारांबळ उडाली, आपल्या गटाने लवकर एखादे पाऊल नच उचलले तर तिकिटासाठी गायकवाडांकडे जाण्याची त्यांनी तयारी कशी ठेवली आणि गायकवाड गटातील तिकीट इच्छुकांनी तिकिटे नच मिळाल्यास विरोधासाठी भंडाऱ्यांकडे


जाण्याचे कसे मनसुबे रचले याच्या सुरस कथा कोणताही रिपब्लिकन पक्षाचा मन-मोकळा सामान्य कार्यकर्ता सांगेल. ही सारी धडपड नेत्यांची आहे, सत्तेसाठी हे सारे चालले आहे हे त्यांना माहीत आहे.

रिपब्लिकन पक्षाचा मोठा कार्यभाग संपला आहे, याची पक्षनेत्यांना जाणीव आहे. पक्ष संपत असताना जास्तीत जास्त राजकीय फायदा मिळावा म्हणून दिलेली तत्त्वाची किंमत म्हणजेच रिपब्लिकन–कॉंग्रेस युती. यांत पुढाऱ्यांच्या आणि राज-कारणाच्या दृष्टीने गैर काहीच नाही. पण त्याचबरोबर ज्या समाजाच्या हुकमी ताकदीच्या जोरावर हे चालू आहे त्या समाजाचा यात फायदा नाही. काही झालेच तर तोटाच होणार.

श्री. गायकवाडांची युती निवडणुकीसाठी आहे आणि श्री. कांबळे हे अद्याप विरोधात असले तरी त्यांचे बळ कितपत प्रभावी आहे, याबद्दल शंका आहे. एकदा निवडणुकीत युती केल्यानंतर श्री. गायकवाड आपली प्रखर तत्त्वे आणि कडवा विरोध कितपत टिकवू शकतील याचीही शंकाच आहे. युतीची ही क्रिया गुजराते-तून इतर प्रांतांत पसरण्याची लक्षणे आहेत. आणि एकदा महाराष्ट्रातील रिपब्लिकन पक्ष कोलमडला की सारा पक्ष कोलमडल्यासारखे होणार आहे. या घटनेमुळे देशा-तील विरोधी राजकारणामध्ये एक फार मोठी पोकळी निर्माण होणार आहे यात शंका नाही.

●


सर्व प्रकारची वाद्ये मिळण्याचे विश्वसनीय ठिकाण



नाविन्यपूर्ण इलेक्ट्रिक गिटार, मेंडोलीन व बुलबुलतरंग इत्यादींचे आद्य प्रवर्तक

हरिभाऊ विश्वनाथ कं.

संगीत वाद्यालय

दादर, मुंबई २८.

# आणि ड्रॅगन जागा झाला

लेखांक तिसरा

अरुण साधू

चांगशा या हुनान प्रांताच्या राजधानीतील एका माध्यमिक शाळेच्या फाटकासमोर सुमारे पंधरा वर्षांचा उफाड्या अंगाचा एक विद्यार्थी उभा होता. त्याच्या एकंदर अवतारावरून तो पक्का खेडवळ होता, हे स्पष्ट दिसत होते. त्याच्या खांद्यावर एक आडवा बांबू होता आणि बांबूला त्याच्या सामानाची बोचकी बांधली होती. चिनी मुले आणि पुरुष घालतात तशी भली थोरली वेणी त्याच्या डोक्यावर होती. अंगात एकच बंद गळ्याचा, स्वस्त किंमतीचा जाडाभरडा कोट आणि पायजमा होता. चेहऱ्यावर शहरी राहणीविषयी विस्मयजनक कुतूहल होते.

हे कोण खेडवळ पात्र आहे, असे वाटून शाळेच्या दरवानाने त्याला शाळेच्या आवारात येऊ देण्यासच नकार दिला. काय करावे हा त्या विद्यार्थ्यापुढे प्रश्न पडला. शेवटी त्याने आपल्या ओळखीच्या एका शिक्षकाचे नाव सांगून आपण शाळेत प्रवेश मिळविल्याची त्या दरवानाला खात्री पटवली व कसाबसा आत प्रवेश मिळवला.

त्या विद्यार्थ्याचे नाव होते माओ-त्से-तुंग.

पुरातन कालापासून प्रसिद्ध असलेल्या या हुनान प्रांताच्या राजधानीत माओ प्रथमच पाऊल टाकत होता. त्या काळाच्या मानाने सुमारे साडेचार लाख लोकवस्तीचे चांगशा शहर बरेच मोठे आणि पुढारलेले होते. ह्सियांग नदीच्या रुंद पात्राच्या पूर्व किनारी हे शहर वसलेले आहे. साऱ्या हुनान प्रांतातील माल चांगशामधूनच ह्सियांग नदीच्या मार्गाने यांगत्से नदीत जातो व तेथून पुढे देशात ठिक-

ठिकाणी पाठवला जातो. त्यामुळे चांगशा शहराजवळील नदीचे पात्र नाना प्रकारच्या मालाने गच्च भरलेल्या गलबतांनी सदैव फुललेले असते.

अत्यंत नाजूक आणि उच्च प्रतीच्या कलाकुसरींसाठीदेखील चांगशा सुप्रसिद्ध आहे. तऱ्हतऱ्हेच्या नाजूक कागदी छत्र्या करण्यात, कापडावर रंगीत रेशमांनी सुरेख चित्रे भरण्यात, बांबूवर कोरून नक्षीकाम काढण्यात चांगशा येथील परंपरागत कलाकारांचा हात कुणी धरणार नाही. त्यांच्या या कलावस्तूंना साऱ्या देशात फार मागणी असते.

राजकीयदृष्ट्यादेखील चांगशा शहराचे तेव्हा खूपच महत्त्व होते. उत्तर चीनमधून दक्षिण चीनमध्ये किंवा उलट दिशेने चीनची एकी घडवून आणण्याच्या हेतूंनी अथवा लष्करी विजयाच्या इच्छेने जाणाऱ्या कोणत्याही सैन्याला हूसियांग नदीच्या खोऱ्यातून व हुनान प्रांतातून जावेच लागे आणि चांगशा शहरावर ताबा मिळवल्याशिवाय त्या सैन्याची पुढे प्रगती होत नसे.

## क्रांतीचे वारे

विद्यार्थी म्हणून माओ या हुनानी राजधानीत आला, तेव्हा साऱ्या चीनभर चालू असलेली स्वातंत्र्य–चळवळीची खळबळ याही शहराला घुसळून काढत होती. ठिकठिकाणी लावलेली पत्रके, वृत्तपत्रे क्रांतीच्या नावाने आक्रोश करीत होती. माओने आयुष्यात पहिले वृत्तपत्र पाहिले ते चांगशा येथे. त्या वृत्तपत्राचे नावच माओला फार स्फूर्तिदायक वाटले, "लोकशक्ति" (मिन लि पाओ). डॉ. सन् यत सेनच्या युनिटी लीग या गुप्त संघटनेमार्फत चालविल्या जाणाऱ्या या वृत्तपत्रातून स्वातंत्र्याचे, मांचू विरोधाचे आणि क्रांतीचे जहाल विचार प्रसृत केले जात होते. बादशाही पद्धती उखडून लावून त्या जागी संसदीय लोकशाही स्थापणे हा त्या वृत्तपत्राच्या शिकवणीचा मुख्य गाभा होता.



माओ आणि माओप्रमाणेच खेड्यापाड्यांतून शहरांत शिक्षणासाठी येणाऱ्या लाखो जागृत चिनी विद्यार्थ्यांवर ही वृत्तपत्रे व हे नवे क्रांतिकारी विचार एकदम प्रभावी छाप बसवीत

होते. क्रांती चळवळीच्या अनुयायांची निर्भय वृत्ती, जुन्या रूढींविरुद्धची बंडखोरी त्यांना मोहून टाकीत होती.

डॉ. सन्च्या क्रांतिकथा या वेळपर्यंत साऱ्या विद्यार्थ्यांच्या तोंडी झाल्या होत्या. अनेक जिवावरच्या प्रसंगांतून तो निभावला होता आणि अनेक अपयशांना त्याने तोंड दिले होते, आणि तरीही निराश न होता तो दुर्दम्य आत्मविश्वासाने मांचू बादशाहीविरुद्धही लढा देत होताच. त्याच्या अंतिम यशाबद्दल विद्यार्थ्यांची श्रद्धा होती. आणि त्याच्या विजयाचे दिवस फार दूर राहिले नसल्याचीही चिन्हे दिसत होती.

विद्यार्थ्यांची उत्सुकता शिगेला पोचली होती आणि सहनशीलता खूप ताणली गेली होती. अनेक शतके एकाच ठिकाणी साचून राहिलेल्या तळ्यातील पाण्याप्रमाणे येणारा चिनी संस्कृतीचा दुर्गंध त्यांना असह्य झाला होता. मुलींचे सुंदर पाय वाढून मोठे होऊ नयेत म्हणून ते लाकडी जोड्यात लहानपणापासून दाबून ठेवण्याची प्रथा फार प्राचीन कालापासून चीनमध्ये होती. चिनी जनतेची बुद्धिमत्ता आणि निर्मितिक्षमता अशीच या बादशाहीने आणि जुन्या संस्कृतीने बांधून टाकल्यासारखी या विद्यार्थ्यांना वाटत होते. चीनच्या साऱ्या जीवनपद्धतीतच त्यांना आमूलाग्र बदल हवा होता. पण लांब लांब नखे वाढवून सुंदर सुंदर कविता लिहिणाऱ्या, जवळ अनेक रखेल्या बाळगणाऱ्या आणि कोणतेही उपयुक्त काम न करणाऱ्या चैनी चिनी घरंदाजांना तर या जुन्या जीवनपद्धतीत मुळीच बदल नको होता.

विद्यार्थ्यांच्या या असंतोषाला वाचा फोडणे आवश्यक होते. माओने शाळेत आपल्याभोवती या नव्या विचारांनी अस्वस्थ झालेल्या विद्यार्थ्यांचे टोळके जमवले होते. पुरुषांच्या डोक्यावरची वेणी मांचू राजघराण्याचे आणि चिनी रूढींचे प्रतीक होती. या दुष्ट परंपरांवर प्रहार करण्यासाठी माओने आणि त्याच्या मित्रांनी आपापल्या डोक्यावरच्या वेण्या कापून टाकण्याचे ठरविले.

दुसरे दिवशी सकाळी माओ बघतो तो, तो स्वतः आणि त्याचा एक मित्र यांशिवाय इतर कुणीच आपल्या वेण्या कापल्या नव्हत्या. त्यांना भीती वाटत होती. त्या रात्री माओने आणि त्याच्या मित्राने हाती कैच्या घेतल्या आणि झोपेत असलेल्या आपल्या १०–१२ मित्रांच्या वेण्या भराभरा कापून काढल्या.

परंतु माओच्या आणि त्याच्या मित्रांच्या असंतोषाचा हा आविष्कार भलताच मऊ होता. माओ इकडे आपल्या मित्रांच्या वेण्या कापीत असतानाच चांगशाच्या उत्तरेला असलेल्या हुपेई प्रांताची राजधानी हँकोव येथे साऱ्या चीनच्या इतिहासाला कलाटणी देणाऱ्या क्रांतिकारक घडना घटत होत्या.

९ ऑक्टोबर १९११ रोजी हँकोव येथील एका सरकारी कचेरीत गुप्त रीतीने लपवून ठेवलेल्या एका बाँबचा प्रचंड स्फोट झाला. त्यामुळे चिडून जाऊन हँकोव येथील पोलिस अधिकाऱ्यांनी गावात सापडतील त्या संशयित क्रांतिकारकांना धरून ठार मारण्यास सुरुवात केली.

झाले. या दडपशाहीने क्रांतिकारकांची डोकी भडकली. चीनचे जे बादशाही सैन्य होते त्यामध्येही या वेळपर्यंत डॉ. सन् यत सेनच्या विचारांचा प्रसार होऊन त्यांतील बऱ्याच जणांच्या मनांत चालू राजवटीविषयी असंतोष घुमसत होताच. या सैन्यातही डॉ. सन्चे अनुयायी तयार झाले होते. हँकोवमधील दडपशाहीच्या बातम्या ऐकून तेही पेटून उठले.

दुसऱ्या दिवशी भडका उडाला. हँकोव शहर यांगत्से आणि हान नद्यांच्या संगमावर नदीच्या उत्तर किनारी वसले आहे. त्याच्याविरुद्ध किनाऱ्यावर वुचांग हे प्राचीन शहर आहे. (चिनी कम्युनिस्टांनी या दोन शहरांमध्ये हानयांग नामक आणखी एक शहर मिळवून नव्या प्रचंड शहराला वुहान हे नाव दिले आहे.) दुसऱ्या दिवशी वुचांग येथील क्रांतिकारकांनी उघडपणे बंडाचा झेंडा उभारला. बादशाही सैन्यातील क्रांतिकारक बंडखोरही त्यांना येऊन मिळाले. वुचांगच्या सेनाधिपतीलाही क्रांतिकारकांना येऊन मिळावे लागले. क्रांतिकारकांची शक्ती वाढली आणि अवघ्या दोन दिवसांच्या आत हँकोव, वुचांग आणि हानयांग येथील गव्हर्नरांना पळ काढावा लागला.

क्रांतीला उघड तोंड लागले होते. क्रांतीचे वारे हां हां म्हणता साऱ्या देशात वणव्याप्रमाणे पसरू लागले. ठिकठिकाणच्या बंडखोर सैन्याच्या तुकड्यांनी ध्वज उभारले. एकामागून एक शहरे क्रांतिसैन्याच्या ताब्यात येऊ लागली. काही दिवसांच्या अवधीतच इतिहासप्रसिद्ध नानकिंग शहर क्रांतिकारकांच्या हाती पडले.

**नवे प्रजासत्ताक**

अमेरिकेतील कोलॅरॅडो परगण्यात चिनी पोलिसांच्या ससेमिऱ्यामुळे पळून गेलेला डॉ. सन् यत सेन विश्रांती घेत असताना त्याला चिनी क्रांतीची ही वार्ता कळली. लगेच त्याने आपले सामान आवरून चीनला जाणारी एक आगबोट पकडली. प्रवासात असतानाच एका वृत्तपत्रात त्याने वाचले, चिनी क्रांतिकारकांनी या तात्पुरत्या चिनी गणराज्याचे अध्यक्ष म्हणून डॉ. सन् यत सेन यांस नेमले होते. दक्षिण चीनमधील बराच भाग क्रांतिकारक सैन्याच्या ताब्यात आला होता. पण पेकिंग आणि त्याभोवतीचा प्रदेश येथे बादशाही सत्ता अद्याप टिकून होती.

या वेळेपर्यंत माओ-त्से-तुंगही आपल्या शाळेत एक क्रांतिकारक म्हणून ओळखला जाऊ लागला होता. क्रांतीला सुरुवात होताच त्याने ताबडतोब शाळा सोडली आणि राष्ट्रीय क्रांतिकारक सैन्यात तो दाखल झाला. विद्यार्थ्यांची एक क्रांतिसेनाही त्या वेळी संघटित होत होती. पण विद्यार्थ्यांच्या सेनेत जाणे माओला आवडले नाही. त्याला खऱ्याखुऱ्या लढाईत भाग घ्यावयाचा होता.

क्रांतीचा मार्ग स्पष्ट होता. त्यासाठी सारा देश क्रांतिकारकांच्या अंमलाखाली एकत्र आणणे जरूर होते. म्हणून उत्तरेकडील पेकिंगच्या बादशाही राज्यावर चाल करून जाण्याच्या मोठमोठ्या योजना आखल्या जाऊ लागल्या. ठिकठिकाणी

क्रांतिकारक सैन्य संघटित करण्यास प्रारंभ झाला.माओप्रमाणेच अनेक उत्साही तरुण सैन्यात भरती होऊ लागले व खऱ्याखुऱ्या क्रांतिकार्यात सहभागी होण्याची मोठ्या आशेने वाट पाहू लागले.

परंतु माओची आणि त्याच्यासारख्याच इतर तरुणांची प्रत्यक्ष लढाईत भाग घेण्याची हौस त्या वेळी तरी फिटली नाही. लवकरच त्यांची निराशा झाली. डॉ. सन् यत सेनना केवळ लढाईसाठी लढाई नको होती. चीनमधील बादशाही पदच्युत करून सारा चीन एका प्रजासत्ताक अंमलाखाली आणणे हे त्यांचे ध्येय होते व ते साध्य करण्यासाठी युद्धासकट सर्व मार्गांचा अवलंब करण्यासाठी त्यांची तयारी होती.

लवकरच युद्धाशिवाय आपले ध्येय साध्य होईल, असे त्यांना दिसू लागले. बादशहाला पाठिंबा देणारा शक्तिमान सेनाधिपती जनरल युआन शिह कै हा या बाबतीत डॉ. सन्शी बोलणी करण्यास तयार होता. चिनी बादशहाचे लष्कर त्यानेच आधुनिक पद्धतीने संघटित केले होते व त्याच्या सामर्थ्याच्या बळावर पेकिंगची गादी टिकून होती. त्याने मनात आणताच बादशाही पदभ्रष्ट करणे कठीण नव्हते,

जनरल युआन डॉ. सन्शी बोलणी करावयास तयार झाला. बादशाही पदभ्रष्ट करून प्रजासत्ताक राज्यपद्धती स्वीकारावयास तो तयार होता. त्याची फक्त एकच अट होती. प्रजासत्ताक सरकारचे अध्यक्षपद त्यालाच मिळायला हवे होते. चीनच्या ऐक्यासाठी व लोकशाहीसाठी डॉ. सन् याही गोष्टीस तयार झाला व आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा देण्याची त्याने तयारी दर्शविली.

१२ फेब्रुवारी १९१२ रोजी हजारो वर्षांपासून चालत आलेली बादशाही परंपरा अशा रीतीने नष्ट झाली. डॉ. सन्ने अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. जनरल युआनने बादशाही पदभ्रष्ट केली व स्वतःकडे अध्यक्षपद घेतले. नानकिंग येथील तात्पुरते सरकार पेकिंग सरकारमध्ये विलीन करण्यात आले. चीनची एकी घडून आली होती. उदारमतवादी लोकशाहीचा सर्वत्र विजय झाला होता. डॉ. सन्च्या युनिटी लीग या गुप्त संघटनेचे कार्य साध्य झाले होते; त्यामुळे ती बरखास्त करून तिचे कोमिंटांग या राजकीय पक्षात रूपांतर करण्यात आले होते.

आपल्या राजीनाम्याच्या भाषणात डॉ. सन् यत सेन म्हणाला, "बादशाही पदभ्रष्ट होत आहे आणि दक्षिण व उत्तर चीनमध्ये आता एकी प्रस्थापित होत आहे. नवा अध्यक्ष जनरल युआन हा प्रजातंत्र राज्याचा पुरस्कर्ता आहे. राजकारणाचा आणि शासनाचा त्याला दांडगा अनुभव आहे. त्याच्या हाती प्रजेचे भविष्य सुरक्षित राहील, याची मला खात्री आहे."

माओलाही इतरांप्रमाणेच वाटले. झाले. क्रांतीचा विजय झाला, क्रांती संपली; इतरांबरोबर त्यानेही सैन्यातील नोकरी सोडली.

परंतु क्रांतीचा अद्याप पूर्ण विजय व्हावयाचा होता. आपल्या राजीनाम्याच्या भाषणात जनरल युआनवर डॉ. सन्ने विश्वास व्यक्त केला. पण त्याला एक वर्ष पूर्ण

होण्याच्या आतच नवे सैन्य संघटित करून युआनवर पुन्हा चाल करून जाण्याचा डॉ. सन्‌ला प्रयत्न करावा लागला. कारण सत्ता हाती येताच जनरल युआनने हुकूमशाहीस सुरुवात केली आणि प्रजातंत्र सरकार धाब्यावर बसविले. पाच वर्षांनंतर तर त्याने स्वत:लाच चीनचा नवा बादशाह म्हणून अभिषेक करवून घेतला होता. क्रांती पूर्ण झाली नव्हती हेच खरे.

**नॉर्मल स्कूलमध्ये......**

सैन्याची नोकरी सोडल्यावर पुढे काय करावे हा माओपुढे प्रश्नच होता. पुढचे एक वर्ष त्याने अत्यंत अस्वस्थ मन:स्थितीत घालविले. 'क्रांती' पूर्ण झाल्याचा आभास निर्माण झाल्याने पुढे काही ध्येय नव्हते, घरची ओढ नव्हती, नेमके उद्दिष्ट त्याच्यापुढे नव्हते. त्याने एकामागून एक असे पोलीस, शाळा, साबण तयार करण्याची शाळा, कायदेशाळा, व्यापारशाळा अशा निरनिराळ्या धंदेशाळांमध्ये नाव नोंदविले. पण कुठेच त्याचे मन रमेना. एका व्यापारी शाळेत त्याने महिनाभर जाऊन ती सोडून दिली. पुढे एका माध्यमिक शाळेत त्याने सहा महिने घालविले.

शेवटी त्याने स्वत:च स्वत:चे शिक्षण करावयाचे ठरविले. पुढचे सहा महिने माओने चांगशा येथील हुनान प्रांतात वाचनालयात जी जी म्हणून महत्त्वाची पुस्तके दिसतील ती ती वाचून काढण्यात घालविले. रोज सकाळी वाचनालय उघडण्याच्या आधी तो दारासमोर उभा असे. आणि रात्री ते बंद होताना बाहेर पडे. बरोबर आणलेले अन्न तो दुपारी वाचता वाचताच खात असे.

याच वाचनालयामध्ये त्याने आयुष्यात प्रथमच सर्व जगाचा नकाशा पाहिला. त्या वेळी त्याचे वय १९ च्या आसपास होते.

आपला मुलगा शाळेत न शिकता भलतीकडेच भरकटतो आहे, हे जेव्हा माओ जेन शेंगला कळले, तेव्हा त्याने ताबडतोब मुलाला पैसे पाठविणे बंद केले. त्यामुळे पुन्हा माओ–त्से–तुंगला बापाच्या समाधानासाठी काही तरी करणे भाग होते. बापाला आवडेल असे कोणते तरी शिक्षण घेण्याचे त्याने ठरविले. त्यालाही स्वत:ला शिक्षक होणे आवडत होतेच. म्हणून त्याने चांगशा येथील 'हुनान नॉर्मल ट्रेनिंग स्कूल'मध्ये आपले नाव दाखल केले. तो अभ्यासक्रम पाच वर्षांचा होता. पण पुढे पाच वर्षांनंतर चांगले पैसे मिळतील, या आशेवर बापाने माओला खुशीने परवानगी दिली.

वयाच्या विसाव्या वर्षी 'नॉर्मल स्कूल'मध्ये माओ–त्से–तुंगने प्रवेश केला, तेव्हा त्याच्या वयाच्या त्या वेळच्या हजारो बुद्धिवादी चिनी तरुणांप्रमाणेच तो दिसत होता. त्याचा चेहरा फिकट होता व त्यावरील खेडुतांचा अडाणीपणा जाऊन शहरी तरतरीतपणा आला होता. हातांचा राठपणा जाऊन आता ते शहरी जीवनामुळे थोडे मऊ झाले होते. करड्या रंगाचा स्वस्त किंमतीचा पायघोळ अंगरखा तो घालू लागला. त्याच्या हातात सतत पुस्तकांचे आणि वर्तमानपत्रांचे गठ्ठे दिसत आणि

त्याच्या भव्य कपाळावर त्याचे काळेभोर केस अस्ताव्यस्तपणे विस्कटलेले असत.

या 'नॉर्मल स्कूल'मध्ये असतानाच माओची तेथील अध्यापक डॉ. यॉंग चांगची यांच्याशी चांगली मैत्री जडली. डॉ. यॉंग यांचे शिक्षण ब्रिटनमध्ये झाले होते आणि एडिंबरो विद्यापीठात त्यांनी तत्त्वज्ञानाची डॉक्टरेट घेतली होती. डॉ. यॉंग आपल्या आवडत्या विद्यार्थ्यांना घरी जेवायला बोलवीत व त्यांच्याशी निरनिराळ्या विषयांवर तासन् तास चर्चा करीत. त्या विद्यार्थ्यांमध्ये माओदेखील असे. या चर्चांमध्ये डॉ. यॉंग यांची तरुण सुंदर मुलगी यॉंग कुई हुई हीसुद्धा भाग घेत असे.

याच वेळी शरीराची ताकद वाढविण्यासाठी म्हणून माओने एका सुट्टीत आपल्या मित्राबरोबर हुनान प्रांतातून पायी भटकण्यास सुरुवात केली. उन्हापावसातून, कडक थंडीतून, उघड्या शरीराने अनवाणी पायांनी त्यांनी हुनानमधील सारी जंगले, दऱ्याखोरी, पर्वत तुडविले. जवळ पैसाही न घेता ते भटकत, उघड्यावर झोपत, थंडगार पाणी असलेल्या नद्यांमधून ते पोहून जाते आणि आजूबाजूचे शेतकरी आपणहून जे अन्न देतील त्यावर पोट भरीत. ठिकठिकाणी शेतकऱ्यांची, तेथील जंगली जमातींची दारिद्र्यावस्था बघून त्याला वाईट वाटे व या शेतकऱ्यांसाठी आपणास काहीच करता येणार नाही का याचाही विचार त्याच्या मनात चमकून जाई.

या त्याच्या विचित्र भ्रमंतीमुळे साऱ्या हुनान प्रांतातील शेतकरी त्याला ओळखू लागले. त्याच्याभोवती त्याच्यावर श्रद्धा बसलेल्या विद्यार्थ्यांचे वलयही आता जमू लागले होते. १९१७ साली त्याने 'नवलोक अभ्यास मंडळ' नावाची एक विद्यार्थ्यांची संघटना स्थापन केली. देशात दूरवर विखुरलेल्या आपल्या मित्रांशी पत्रव्यवहार करून त्याने या संघटनेचे सभासद वाढविण्यास सुरुवात केली. आता त्याच्या जीवनातील निर्हेतुकपणा गेला होता. शेतकऱ्यांचे आणि देशाचे दारिद्र्य त्याला दिसत होते आणि त्यासाठी झगडण्याची ईर्षा त्याच्या मनात निर्माण होत होती.

या विचित्र भ्रमंतीच्या सुमारासच माओला कविता करण्याचा छंद जडला. तो पुढे शेवटपर्यंत सुटला नाही. तेव्हापासून माओ आपल्याजवळ सतत एक छोटी वही आणि पेन्सिल ठेवतो आणि स्फूर्ती आली की लगेच कविता करून टाकतो. कष्टप्रद लाँगमार्चमधून जाताना म्हणा अगर महत्त्वाची, आणीबाणीची राजकीय बोलणी करावयास जाताना म्हणा, माओचे हे कवितेचे वेड सुटले नाही. त्याच्या काही सुप्रसिद्ध आणि सुंदर कविता अशाच विचित्र परिस्थितीत जन्मल्या आहेत.

माओने स्थापन केलेल्या अभ्यास मंडळासारख्या, उत्साही आणि मायभूमीच्या सेवेसाठी अस्वस्थ झालेल्या तरुणांच्या कितीतरी संघटना त्या वेळी चीनमध्ये स्थापन झाल्या होत्या. १९१२ ते १९१८ च्या दरम्यान माओ चांगशा नॉर्मल स्कूलमध्ये शिकत असतानाच्या पाच वर्षांत चिनी भूमीवर कॉन्फ्युशसकालीन परंपरागत शक्ती व नव्या लोकशाहीचे अनुयायी यांचे आपसांत परोपरीचे युद्धच माजले होते.

## अराजकाकडे वाटचाल

क्रांती यशस्वी होताच एकदम सुराज्य येणे शक्य नव्हते. परंतु संसदीय प्रजासत्ताक सरकार तरी स्थिर राहील अशी चिनी जनतेची अपेक्षा होती. परंतु राज्याची सुरक्षितता व्यवस्थित राखण्याच्या मिषाने नवा अध्यक्ष जनरल युआन याने हाती सत्ता केंद्रित करण्यास सुरुवात केली. लवकरच सबंध देशभर ठिकठिकाणी नवे सरंजामी सरदार पुन्हा निर्माण झाले व काही जुने सरदार पुन्हा उठले. त्यांनी आपापल्या प्रांतांत स्वतंत्रपणे कारभार करावयास प्रारंभ केला. आपापसात त्यांची युद्धेही होत. या सर्वांचा पराभव करण्याएवढी जबरदस्त सेना युआनजवळ नव्हती. त्या सर्व सरदारांना पैसे चारून त्यांना मध्यवर्ती सत्ता मान्य करण्यासाठी आमिष दाखविण्याएवढे पैसेही पेकिंगच्या खजिन्यात नव्हते. अध्यक्ष युआनला दुसरा मार्ग

## • चटईवरील नेतृत्व

१९११ सालच्या क्रांतीतील क्रांतिकारक सैन्याचा सुप्रसिद्ध नेता ली-युआन-हुंग याच्याविषयी एक विचित्र हकीकत आहे. मांचू सैन्याचा तो एक प्रामाणिक अधिकारी होता आणि क्रांतिमध्ये भाग घेण्याची त्याची मुळीच इच्छा नव्हती. क्रांतिकारक सैन्याचे नेतेपद आपणांस मिळेल हे तर त्याच्या स्वप्नातही येणे शक्य नव्हते.

हँकोवमध्ये स्फोट होऊन क्रांतीला सुरुवात झाली, त्या रात्री काही क्रांतिकारक त्याच्या बंगल्यात घुसले, तेव्हा तो आपल्या अंथरुणाखाली लपून बसलेला त्यांना सापडला. सर्व देशाने मांचूविरुद्ध उठाव करावा, अशा एका आवाहन-पत्रकावर त्याला स्वाक्षरी करण्यास सांगण्यात आले. तशी सही करण्याचा आपल्याला अधिकार नाही असे त्याने सांगितले. क्रांतिकारकांना आपल्या संघटनेसाठी कुणी नेता लवकर हवा होता. डॉ. सन् यत सेन अमेरिकेत होता आणि त्याचा उजवा हात हुवांग हसिंग हाही जवळ नव्हता. वेळ फार भराभर जात होता. तेव्हा क्रांतिकारकांना लवकर काही तरी करणे भाग होते.

त्या अधिकाऱ्याला गोळी घालण्याऐवजी त्याने जर सही केली नाही तर आम्ही स्वतःच स्वतःला गोळ्या घालून घेऊ अशी क्रांतिकारकांनी धमकी दिली. ली-युआन-हुंग म्हणाला, " इथे माझ्या झोपण्याच्या खोलीत हा प्रकार करू नका. तुमच्या रक्ताने येथील माझी आवडती चटई खराब होऊन जाईल." क्रांतिकारक म्हणाले, " आम्ही येथेच गोळ्या घालून घेऊ."

शेवटी आपली आवडती चटई खराब होऊ नये म्हणून नाइलाजाने लीने क्रांतिकारक सैन्याचे नेतृत्व पत्करले. पुढे तो चांगलाच नावारूपाला आला. एकदा पत्करलेले काम त्याने चोख आणि प्रामाणिकपणे पार पाडण्याचा प्रयत्न केला.

•



कवी माओ...

उरला नाही. जेथे जेथे सरंजामी सरदार उठले त्यांना त्या त्या प्रांतांत जनरल युआनने सरकारी गव्हर्नर म्हणून अधिकृतपणे नेमून टाकले व हा प्रश्न सोडविला.

परंतु एवढ्याने खरे प्रश्न सुटणारे नव्हते. जनरल युआनने जरी या सरदारांना केंद्रीय सत्तेचे प्रतिनिधी म्हणून नेमले असले तरी ते फारच थोडे केंद्रीय कायदे आणि आज्ञा मानीत. आपल्या मनाला वाटेल त्याप्रमाणे ते कारभार चालवीत आणि जमीनदार पूर्ववत शेतकऱ्यांची पिळवणूक करू लागले होते, सरकारी अधिकाऱ्यांमध्ये भ्रष्टाचार पुन्हा बोकाळू लागला होता. अफूचा बेकायदेशीर व्यापार फोफावू लागला होता.

जनरल युआनचेही मत फिरले. त्याने आपले मंत्रिमंडळ अशा रीतीने बनवले की ते तो म्हणेल ती पूर्वदिशा ओळखू लागले. लोकशाहीवादी, क्रांतिवादी उदारमतवाद्यांना पुन्हा वाईट दिवस आले. जनरल युआनच्या हुकमतीतील मंत्रिमंडळाने डॉ. सन् यत सेनच्या कोमिन्टांग पक्षावर बंदी घातली. शेवटी १९१५ मध्ये जनरल युआनने स्वतःलाच बादशहा म्हणून अभिषेक करवून घेतला. त्यानंतर तो जास्त दिवस जगला नाही पण त्याने स्थापलेली पेकिंगची सरदारी राजवट पुढे बरीच वर्षे टिकून राहिली.

१९१३ मध्ये जनरल युआनने डॉ. सन् यत सेनच्या कोमिन्टांग पक्षावर बंदी घातल्याने डॉ. सन्ला आणि त्याच्या सहकाऱ्यांना जपानमध्ये पळून जावे लागले. जेव्हा जेव्हा एखादा सरदार त्यांना मदतीचे आश्वासन देई तेव्हा तेव्हा डॉ. सन् आणि त्याचे सहकारी चिनी किनाऱ्यावरील एखाद्या शहरात येऊन आपले प्रजासत्ताक सरकार स्थापीत. परंतु पुन्हा पुन्हा त्यांना परत जपानमध्ये पळून जावे लागे.

लोकशाहीवादी पाश्चात्त्य राष्ट्रे आपणाला मदत करतील, कमीत कमी सरंजामी सरदारांना मदत तरी करणार नाहीत अशी डॉ. सन् यत सेनला आशा वाटत होती व त्याप्रमाणे त्याने त्या देशांना अनेक आवाहने केली. पण ती सारी फोल ठरली.

पाश्चात्य लोकशाहीप्रेमी राष्ट्रांना डॉ. सन् यत सेनला मदत करण्याने काहीच फायदा नव्हता. त्यांना ज्या आर्थिक आणि व्यापारी सवलती मिळाल्या होत्या, त्या या सरदारांच्या पाठिंब्याने. त्यांनाच पाठिंबा देणे या राष्ट्रांना अधिक फायद्याचे होते.

१९१८ साली माओ-त्से-तुंगने नॉर्मल स्कूलमधून शिक्षणक्रम पूर्ण करून पदवी घेतली तेव्हा देशाची परिस्थिती अशी सर्वच बाजूंनी निराशा आणि विफलता आणणारी होती. स्कूलच्या शेवटच्या वर्षात असतानाच माओची आई वारली. त्यामुळे घरी जाण्याची त्याला उत्सुकता उरली नाही. काही नव्या संधी, नवी क्षेत्रे दिसतात का, हे तो पाहू लागला. नोकरी करून फ्रान्समध्ये शिकण्याची एक योजना त्या वेळी चीनमध्ये विद्यार्थ्यांसाठी पुरस्कारली जात होती. या योजनेचा फायदा घ्यावा या हेतूने माओ चांगशा सोडून पेकिंगच्या दिशेने वयाच्या पंचविसाव्या वर्षी निघाला.

आपल्या आयुष्याची अत्यंत संस्कारक्षम अशी दहा वर्षे माओने चांगशा येथे घालविली. पुढे सात वर्षांनंतर एक शेतकरी पुढारी म्हणून माओ चांगशा येथे परत आला. तेव्हा आपल्या या जुन्या आयुष्याची आठवण होऊन त्याच हूसियांग नदीच्या किनारी उभे राहून माओने एक कविता लिहिली. कवितेचे नावच आहे.

**" चांगशा "**

**हिवाळ्याच्या थंडीमध्ये, उत्तर प्रवाही सरिते काठी ।**
**एकटाच मी उभा आहे, उंच शिखरांच्या रांगांमधून ।।**
**रक्तवर्णी वृक्षांच्या गर्द राईतून, संत्र्यांच्या बेटांजवळून ।**
**वाहणाऱ्या सरितेकाठी, एकटाच मी उभा आहे ।।**
**या हिरव्याशार पाण्याच्या रुंद पात्रातून शेकडो गलबते प्रवाहाशी स्पर्धा करतात ।**
**मुक्त आकाशात गरुड झेप घेतात आणि असंख्य मासे नदीमध्ये पोहतात ।।**
**या हवेत मुक्त स्वातंत्र्य ते उपभोगतात. स्वातंत्र्याच्या या प्रचंड जाणीवेने गोंधळून ।**
**महान धरणीमातेला मी विचारतो, मानवाचे भवितव्य घडवितो कोण ?**
**त्या खळबळजनक दिवसांमध्ये माझ्या कितीतरी मित्रांना मी इथे आणले ।**
**आम्ही मित्र होतो, विद्यार्थी होतो, तरुण होतो. रागालोभाची पर्वा न करता**
**खऱ्या बुद्धिवाद्यांप्रमाणे आम्ही एकमेकांशी भांडलो, परस्परांना निंदले ।**
**या या नद्या-पर्वतांपासून आम्ही स्फूर्ति घेतली आणि धनवंतांना-कुलवंतांना तुच्छ लेखीत**
**आम्ही आमच्या शब्दांत चैतन्य ओतले. पण तुम्हांला आठवत नाही काय ?**
**पात्राच्या मध्यभागी आमच्या नावा प्रवाहाला लागल्या असताना,**
**एकाएकी आलेल्या वादळाने त्यांचा वेग कसा मंदावला !**
**ते आठवत नाही काय ?**

[ अपूर्ण ]



पुस्तके

# जागृतीची हाक देणारे थोर विचार

[ **'समाज प्रबोधन'**—न्यायमूर्ती प्र. बा. गजेंद्रगडकर यांची भाषणे व लेख : सुविचार प्रकाशन : संपादक : श्यामकांत श्रीनिवास बनहट्टी: मूल्य वीस रुपये: पृष्ठे ३८८. ]

'न्यायमूर्ती' या शब्दाने सर्वसामान्य जनतेच्या मनात निर्माण होणारे चित्र काहीसे ठराविक असते. न्यायाधीश हा माणसांपासून दूर राहणारा, सतत रुक्षतेनेच विचार करणारा आणि मुख्य म्हणजे कोणत्याही गोष्टीवर विचारल्या-खेरीज स्पष्ट मत न देणारा असा, सदैव गंभीर, अलिप्त असाच असला पाहिजे, असे प्रत्येकाला वाटते. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश म्हणजे तर केवळ चष्मा, हातोडा आणि समतोल तराजू यांखेरीज काहीच डोळ्यांपुढे येत नाही.

परंतु खुद्द न्यायमूर्ती डॉ. गजेंद्रगडकरांना न्यायाधीशाचे हे चित्र मान्य नाही. न्यायाधीशांनी 'हस्तिदंती मनोऱ्या'त राहून जनतेकडे अलिप्तपणे पाहणे हे त्यांना अयोग्य वाटते. न्यायाधीश हाही प्रथम माणूस आहे, समाजाचा घटक असलेला माणूस आहे, यावर त्यांचा दृढ विश्वास आहे. सर्वसाधारणपणे ज्या प्रश्नांवर आणि समस्यांवर आपल्याला न्यायालयीन अधिकृत निवाडा द्यावा लागेल, अशा प्रश्नांविषयी न्यायाधीशाने जाहीर मतप्रदर्शन करू नये; परंतु सामाजिक व सांस्कृतिक घडामोडींमध्ये भाग घेऊन समाजाचे प्रबोधन करणाऱ्या महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा करण्यास काही हरकत नाही. किंबहुना समाजाचा मान्यवर घटक म्हणून ते त्याचे आद्य कर्तव्य आहे, अशी डॉ. गजेंद्रगडकरांची ठाम भूमिका आहे.

या त्यांच्या भूमिकेवरून त्यांनी मांडलेले विचार, त्यांनी केलेल्या चर्चा आणि त्यांनी स्थापिलेले सिद्धांत यांचा समावेश या ग्रंथात करण्यात आला आहे. न्यायाधीशाचे निष्क्रिय स्वरूप न्यायमूर्तींना रुचत नाही. आपल्या विचारांचा, आपल्या चिंतनरूप ज्ञानाचा, आपल्या अनुभवाचा फायदा न्यायाधीशाने समाजाला वारंवार करून दिला पाहिजे, समाजाला धडे दिले पाहिजेत, स्वतःहून त्याचे प्रबोधन केले पाहिजे, अशा आंतरिक तळमळीने हे विचार मांडलेले आहेत. तर्काचा भक्कम पाया

लाभलेला पुरोगामी बुद्धिवाद हे साऱ्या विचारांचे दृश्य स्वरूप आहे. लोकशाहीवरील दृढ निष्ठेचे पाठबळ या विचारांना लाभलेले आहे. सामाजिक आणि आर्थिक न्यायाची प्रस्थापना करणे व शाश्वत नैतिक मूल्यांची जोपासना करणे या ध्येयाकडे सर्व विवेचनाचा रोख आहे.

या ग्रंथाचे एकंदर सहा खंड पाडण्यात आले आहेत. 'धारणा आणि सुधारणा', 'लोकसत्ताक भारताची वाटचाल', 'न्यायतत्त्वाचे अधिराज्य', 'साहित्य आणि कला', 'व्यक्तिदर्शन' आणि 'संकीर्ण' अशी नावे या खंडांना दिलेली आहेत. न्यायमूर्तींच्या विचारधनाचे हे ढोबळ वर्गीकरण. त्यातही पहिले तीन खंड न्यायमूर्तींच्या प्रवृत्तीच्या दृष्टीने विशेष महत्त्वाचे आहेत. समाज हितचिंतक आणि न्यायतत्त्वचिकित्सक हे न्यायमूर्तींच्या व्यक्तित्वाचे दोन प्रमुख पैलू आहेत. या दोन अक्षांवर काढलेला त्यांच्या मूलगामी विचारांचा आलेख पहिल्या तीन खंडांतच आढळतो.

**श्रेष्ठ मोक्षधर्म, निकृष्ट आचार**

प्रखर पुरोगामी बुद्धिवादाची प्रतिज्ञा केल्यावाचून भारतीय समाजाची प्रगती अशक्य आहे, असे न्यायमूर्तींनी ठामपणे सांगितले आहे. आपल्या समाजाच्या धारणेसाठी सुधारणा हवी आहे. आपल्याला पुढे पाऊल टाकावयाचे आहे, काळाच्या बरोबर जावयाचे आहे, याचा पुरता निश्चय झाल्यानंतर केवळ पुरोगामी बुद्धिवाद हाच आपल्या सर्व विचारांचा आणि आचरणाचा पाया ठरला पाहिजे. जुनाट धर्मगत रूढींकडे या पुरोगामी बुद्धिवादाच्या चष्म्यातूनच आपण पाहिले पाहिजे. केवळ शास्त्रशुद्ध तर्कावरच विसंबून त्यातील फोलपणा सिद्ध केला पाहिजे.

हिंदुधर्माचे विश्लेषण करताना लोकमान्यांनी केलेले मोक्षधर्म व रूढीरूप आचार (ज्याला सामान्य लोक भ्रमाने धर्म समजतात) हे वर्गीकरण न्यायमूर्तींनी स्वीकारले आहे. आपला मोक्षधर्म फार उच्च आहे, अनेक तत्त्वे आणि तत्त्वज्ञाने सामावून घेऊन विश्वाचे रहस्य उकलणारा आहे याचा त्यांना अभिमान वाटतो. परंतु रूढिग्रस्त आचारविचारांचे मात्र पुरोगामी तर्काने विच्छेदन केले पाहिजे, असा त्यांचा आग्रह आहे; किंबहुना हा आचारधर्म साचेबंद नसून मनूपासून कौटिल्यापर्यंत अनेक भारतीय तत्त्वज्ञांनी व पंडितांनी त्यात वेळोवेळी समाजानुकूल सुधारणा घडवून आणलेली आहे, हे त्यांनी सप्रमाण दाखविले आहे. पुढच्या पंडितांत मात्र अभिजात चिकित्सेचे तेज नसल्याने ही सुधारणा परंपरेची साखळी खंडित झाली आणि तिची जाचक पोलादी चौकट निर्माण झाली. बुद्धिवादाची कसोटी वापरूनच ही चौकट मोडली पाहिजे. हे करण्यासाठी लागणारी तळमळ, दाखवावी लागणारी जिद्द आणि अंगीकारावे लागणारे धैर्य दुर्दैवाने आज समाजामध्ये नाही. म्हणूनच हिंदू कोड बिल संमत होऊ शकले नाही. या गोष्टीची तीव्र खंत न्यायमूर्तींनी प्रकट केली आहे. त्यांना ती खोलवर जाणवली आहे.

आपल्या समाजाला क्षते पाडणारी जातीयता, अस्पृश्यता, आळस, दारिद्र्य, अस्वच्छता, रोगराई आणि अज्ञान यांनी न्यायमूर्तींच्या वाणीला धार आली आहे. या विषयावर बोलताना त्यांची तळमळ शब्दाशब्दांतून उसळून येते. स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षे झाली तरी भारताला अजून जातीयता, अस्पृश्यता आणि अज्ञान या लांच्छनांपासून सुटका करून घेता आली नाही. अस्पृश्यतेचे मूळ शोधून काढताना न्यायमूर्तींनी आंबेडकरांपासून ऋग्वेदापर्यंत सर्वांची सूक्ष्म छाननी केली आहे आणि शेवटी असे स्पष्ट केले आहे की, अस्पृश्यता ही गोष्ट सर्वस्वी उपरी, धर्मबाह्य आणि रूढिमूलक असून आजच्या बुद्धिवादी समाजाने तर ती घृणास्पदच मानली पाहिजे. समाजात सुधारणा घडवण्यासाठी कायद्याची आवश्यकता आहे. पण कायदा सुधारणा यशस्वी करू शकत नाही. ती समाजाच्या अंतरंगातून उमलून आली पाहिजे. हेच नेमके घडत नाही आणि म्हणूनच आजवरच्या सर्व समाजसुधारकांना छळ, निदान उपेक्षा सहन करावी लागली. याचसाठी समाजाचे प्रबोधन होणे आवश्यक आहे. डॉ. गजेंद्रगडकरांच्या आवेशपूर्ण कळकळीच्या शब्दांनी तरी हे प्रबोधन त्वरित व्हावे.

न्यायतत्त्व आणि मूलभूत हक्क यांविषयी शास्त्रशुद्ध विवेचन करतानाही न्यायमूर्तींच्या शब्दांत हीच कळकळ दिसून येते. शासनसंस्था आणि न्यायव्यवस्था यांचे संपूर्ण विलगीकरण करण्यावर त्यांचा कटाक्ष आहे. दक्षिण भारतात हे विलगीकरण कित्येक वर्षांपूर्वी झाले, याचा त्यांना अभिमान वाटतो. असे विलगीकरण झाल्याखेरीज न्यायासनाचे कार्य चोख आणि निर्भय होऊ शकणार नाही. शासन आणि न्याय यांचे परस्परांवर दडपण न राहता परस्परांच्या सहकार्याने प्रगती झाली पाहिजे.

## हक्कांची ओरड, कर्तव्यांचे विस्मरण

लोकनियुक्त शासनाच्या कर्तव्याविषयी आणि कार्यक्षमतेविषयी न्यायमूर्तींनी मूलगामी विवेचन केले आहे. व्यक्तिस्वातंत्र्य आणि प्रगतिपर कल्याण यांच्या कचाट्यात लोकशाही सरकार नेहमीच सापडलेले असते. लोकशाहीच्या प्राथमिक अवस्थेत तर केवळ संपूर्ण ताटस्थ्य स्वीकारून परचक्रापासून संरक्षण व अंतर्गत सुव्यवस्था या दोनच उद्दिष्टांवर सरकारची नजर असे. बाकीच्या सर्व गोष्टींत जनतेला अनिर्बंध स्वातंत्र्य असे. पुढे साम्यवादाच्या उदयामुळे आणि जलद प्रसारामुळे या समजुतीला जोराचा धक्का बसला आणि लोकशाही जर दृढ व्हावयाची असेल तर तिने ताटस्थ्याची निष्क्रिय भूमिका टाकून दिली पाहिजे हे सर्वांना कळून चुकले. भारतीय शासनाने पुरस्कारिलेले कल्याणकारी लोकशाही शासन हे याचाच परिपाक होय. या शासनाला अनिर्बंध बाजारस्पर्धा वाढू देऊन केवळ तटस्थता राखावयाची नाही. परिणामकारक नियोजनाच्या साहाय्याने जनतेची प्रगती घडवून आणून समाजवादाचे उद्दिष्ट त्याला साकार करावयाचे आहे. हे करताना

अर्थातच व्यक्तिस्वातंत्र्याच्या अनिर्बंध क्षेत्राला मर्यादा पडणे स्वाभाविक आहे. नेमकी याच ठिकाणी न्यायसंस्थेची करामत कसोटीला लागते. जनतेचे मूलभूत हक्क आणि कल्याणकारी राज्याने समाजवादी सुस्थितीच्या प्राप्तीसाठी आखलेल्या योजना यांचा संघर्ष येऊ न देता त्यात मेळ घालण्याचे महत्त्वाचे कार्य न्यायसंस्थेने करावयाचे आहे. लोकशाहीतील न्यायाची दृष्टी ही अशी आहे. भारतीय संविधानाच्या छत्राखाली कायदा व न्याय या तऱ्हेने नांदत आहे. या सर्व पद्धतीवर न्या. गजेंद्रगडकरांची असीम निष्ठा आहे, आणि म्हणूनच त्यांनी या ठिकाणी न्यायालयाचे कर्तव्य, त्याच्या कार्यपद्धतीचे स्वरूप आणि त्याच्या मर्यादा यांचे सुस्पष्ट, रेखीव आणि सडेतोड विवेचन केले आहे.

कल्याणकारी राज्याच्या आधिपत्याखाली राष्ट्राची प्रगती व्हावयाची असेल, तर कायद्यानेही आपली स्थितिशीलता सोडून देऊन गतिशील स्वरूपाचा स्वीकार केला पाहिजे, अशी न्यायमूर्तींची श्रद्धा आहे. कायद्याचा अर्थ लावताना शब्दांपेक्षा अर्थाला, परिस्थितीला सापेक्ष महत्त्व दिले पाहिजे असे ते म्हणतात. असे झाले तरच न्यायतत्त्वाचे अधिराज्य (Rule of Law) यशस्वी होऊ शकेल. न्यायालयाविषयी आणि न्यायसंस्थेविषयी जनतेच्या मनात विश्वास निर्माण होऊ शकेल. भारतीय संविधान आणि भारतीय न्यायव्यवस्था यांचे अपेक्षित संबंध हे अशा प्रकारचे आहेत. या सर्वांना उच्च नीतितत्त्वांची अपेक्षा आहे. म्हणूनच मूलभूत हक्कांविषयी मांडताना मूलभूत कर्तव्यांचीही योग्य जाणीव नागरिकांनी ठेवली पाहिजे, असे आवाहन न्यायमूर्तींनी केले आहे. ' आजकाल हक्कांचीच ओरड चाललेली दिसते; कर्तव्यांची आठवण कोणालाच नाही ' अशी त्यांची रास्त तक्रार आहे.

' भारतीय कलेचे पुनरुज्जीवन ' या भाषणात कला, तिचा जीवनाशी असणारा संबंध यांची अतिशय उद्‌बोधक चर्चा न्यायमूर्तींनी केली आहे. 'आज' हा 'काल'चे अपत्य असून 'उद्या'चे पितृत्व त्याच्याकडे असल्याने, इतर प्रगतीबरोबरच आपला कलाविषयक वारसा आपण सांभाळून त्याची जाणीव ठेवली पाहिजे, त्यात भर घातली पाहिजे, असे मार्मिक विवेचन त्यांनी केले आहे. त्यांच्या व्यासंगाचा वेगळा पैलू येथे दिसून येतो.

न्यायमूर्तींचे हे बहुमोल विचार पहिल्या ४ खंडांत विस्तृतपणे व समर्थपणे व्यक्त झाले आहेत. पाचव्या खंडात काही व्यक्तींच्या कार्याचा न्यायमूर्तींनी केलेला गौरव आहे. सर नारायण चंदावरकर, कै. आगरकर, कर्वे, काणे, डॉ. आंबेडकर, भाऊराव पाटील, पंडित नेहरू, शास्त्री इत्यादी विविध क्षेत्रांतल्या विभूतींच्या जीवनकार्यावर न्यायमूर्तींनी उचित भाष्य केले आहे. बसवेश्वराला तर ते समाजसुधारणांचा आद्य प्रणेता मानतात. त्याच्या लोककार्याचे अचूक विश्लेषण व माहात्म्यदर्शन त्यांनी घडविले आहे.

अशा तऱ्हेने न्या. गजेंद्रगडकरांची एकूण २७ भाषणे व ६ लेख 'समाजप्रबोधन'

करण्यासाठी येथे एकत्रित केलेले आहेत. निरनिराळ्या परिषदांतून, समारंभांतून परदेशच्या दौऱ्यातून लोकांपुढे प्रकटलेली ही विचारसंपदा येथे एकवटली आहे. न्यायमूर्तींचा प्रगाढ व्यासंग, प्रखर बुद्धिमत्ता आणि सखोल चिंतन यांमुळे ती परिणामकारक बनली आहे. कोणत्याही समस्येचे शास्त्रशुद्ध विश्लेषण, शास्त्रीय दृष्टिकोन आणि मूलगामी सिद्धान्त यांमुळे ती भरीव आणि वजनदार झाली आहे. प्रत्येक वाचकाला अंतर्मुख बनवून त्याच्या विचारांचे प्रबोधन करण्याचे सामर्थ्य तिच्यात आले आहे.

### कुशल संपादन

ग्रंथाच्या संपादनाविषयी दोन शब्द लिहिणे आवश्यक ठरते. न्यायमूर्तींच्या बहुतेक लेखभाषणांची वैचारिक बैठक समान असून प्रतिपादित आशय, मते व सिद्धांत यांत पुष्कळ सारखेपणा आहे. त्यामुळे त्याचे संपादन करताना पुनरुक्तीचा दोष त्यात् उद्भवणार नाही याची काळजी घेणे आणि त्याच वेळी ग्रंथाच्या आशयाला धक्का न लावणे हे कौशल्याचे काम आहे. प्रस्तुत ग्रंथाच्या संपादकांनी ते उत्तम प्रकारे पार पाडले आहे. ग्रंथ नेटका, सुघड आणि सुरचित बनण्याचे कारण हे कुशल संपादन आहे. श्री. श्री. ना. बनहट्टी यांनी न्यायमूर्तींच्या चरित्राची माहिती देणारा लिहिलेला लेख हे ग्रंथाचे आणखी एक वैशिष्टच ठरावे.

फक्त एकच गोष्ट खटकते. पारिभाषिक संज्ञांच्या बाबतीत ग्रंथात एकच धोरण पाळले गेलेले नाही. एकच शब्द भिन्न भिन्न स्वरूपांनी अनुवादित केला गेला आहे. संपादकांनाही हा दोष मान्य आहे. अशा शब्दांची एक यादी त्यांनी स्वतःच प्रस्तावनेत दिली आहे, आणखीही काही शब्द सापडतील. "तथापि या भिन्नत्वामुळे उद्दिष्ट अर्थ कळण्याच्या बाबतीत काही अडचण येईल असे वाटत नाही," असे संपादक म्हणतात. पण कोणतातरी एक शब्द निश्चित करून तोच सर्वत्र वापरणे अर्थसौकर्याच्या व सुबकतेच्या दृष्टीने अधिक चांगले झाले असते. संपादनाचाच तो एक भाग आहे.

— निशिकांत मिरजकर


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सहा साहसे — दा. सी. देसाई

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.

# जे नव्हते ध्यानी मनी

We never meant to go so far

या माविस रॉन्सनकृत पुस्तकाचा परिचय

लेखांक नववा



माविस

[ माविस–बार्बारांना घेऊन डच जहाज सुटले.जहाजाचे नाव होते 'कालवाही' ]

'कालवाही' जहाजावर गंभीर वातावरण पसरलेले होते. इंडोनेशिया सोडून सर्व परकीय लोक बाहेर पडले होते. पण कुठे जात होते? कुणालाच त्याची कल्पना नव्हती. बोटीवर सर्वांनी आपल्याजवळचे खाद्यपदार्थ बोटीच्या अधिकाऱ्यां-जवळ दिले व अन्नाचे स्वयंस्फूर्त रेशनिंग सुरू झाले. पाऊस पडला तर डेकवर निसर्गस्नान, प्यायला रोज माणशी तीन कप पाणी, अशी पाणी-व्यवस्था ठरली.

पहिले बंदर बोटीने केले ते सोरोंग. न्यू गिनीचे एक बंदर. डचांनी इंडोनेशिया-तून पोबारा केला असला तरी न्यू गिनी त्यांनी सोडले नव्हते. तिथल्या डच गव्हर्नरने बार्बारा व माविस यांना इंडोनेशियाच्या हस्तक म्हणून बोटीवरून उतरण्यास मनाई केली. दोघी बोटीवर कैदेत पडल्या. कारण बंदरावर डच सैनि-कांचा पहारा सुरू झाला होता.

बार्बारा व माविस सोडून सर्वजण बोटीवरून उतरून शहरात फेरफटका मारण्यास गेले. माविस चांगलीच खवळली. त्यातच त्यांच्यावर पहारा करण्यासाठी आलेला डच अधिकारी दर दोन–तीन मिनिटांनी माविसला "माझे तुझ्यावर प्रेम बसले आहे," असे सांगू लागला. माविस कातावून गेली. डचांचा तिला इतका संताप आला की, बोटीतल्या जेवणाच्या खोलीतल्या भिंतीवर तिने ठळक अक्षरांत

पेन्सिलीने, "न्यू गिनी इंडोनेशियाचा आहे," असे लिहून ठेवले. तिच्याही अंगात आता हौतात्म्य संचारले होते.

दोन दिवस सोरोंग येथे थांबून बोट "मानकोवारी" या पुढल्या मोठ्या बंदरात आली. येथे माविस-वार्वारांना खाली उतरण्यास मिळाले. कारण येथील डच अधिकाऱ्यांना काही कसला हुकूम नव्हता. दोघी खाली उतरल्या—त्या बोटीवर पुन्हा जायचे नाही, असे ठरवूनच !

दोघींनी ऑस्ट्रेलियाकडून आलेल्या व सिंगापूरच्या दिशेने निघालेल्या दुसऱ्या एका बोटीवर जागा मिळवली. कप्तानाने दोघींना सनदकन् या ब्रिटिश बोर्नियोतील बंदरापर्यंत नेण्याचे कबूल केले. अट फक्त घातली की पुनः सोरोंग बंदर लागेल, तेव्हा खाली उतरायचे नाही.

या बोटीवर एक न्यूझीलंडर पठ्ठ्या माविसच्या इतका मागे लागला, की सनदकन् येईपर्यंत जिवावर उदार झाला. "तू मिळाली नाहीस तर जीवनात राम नाही," असे म्हणू लागला. माविसने त्याला काळवेळ ओळखून झुलवत ठेवले. या पठ्ठ्याने एक गमतीदार हकीकत म्हणून त्यांना सांगितले की, येथून काही अंतरावर एक जहाज आले आहे व त्यातला माल जवळच्या बेटावर उतरण्याचे काम चालू आहे. या जहाजासंबंधी आंतरराष्ट्रीय वृत्तपत्रांत खळबळ माजली आहे.

सनदकन्‌ला उतरताच दोघींनी एक लाँच ठरवली व त्या जहाजाच्या शोधार्थ दोघी निघाल्या. दूरवर समुद्रात दोन बोटी होत्या. एक जहाज करड्या रंगाचे होते व त्याच्या शेजारी एक ब्रिटिश बोट उभी होती. लाँचवाल्याने लाँच त्या करड्या रंगाच्या जहाजाशेजारी नेली. दोघींनी विनंती करून त्या त्या जहाजावर प्रवेश मिळवला. लाँचवाला पैसे घेऊन निघून गेला.

ते जहाज ग्रीक होते. दोघी जाऊन कप्तानाला भेटल्या. जहाजाचा कप्तान म्हणाला, "इतकी वर्षं झाली मी खलाशी आहे. परंतु असा प्रसंग कधी आला नव्हता. हे जहाज लंडनमधल्या एका कंपनीचे आहे. या कंपनीची या जहाजाव्यतिरिक्त आणखी तीन जहाजे आहेत. पाच महिन्यांपूर्वी या जहाजाचे ग्रीक संचालक कंपनीचे दिवाळे काढून परागंदा झाले आहेत. माझा व बोटीवर काम करणाऱ्यांचा पगार कोण देणार ? हे जहाज आता मोडीच्या भावात विकावे लागणार आहे. कारण दोन महिन्यांपूर्वी या जहाजावर आग लागली. २६ तास आम्ही आगीशी झगडत होतो. जहाजात पाणी शिरू लागले. ते पाणी बाहेर काढणे एवढेच काम आम्ही करत होतो. संदेश धाडले. तेव्हा शेजारी उभ्या असलेल्या या ब्रिटिश बोटीने आम्हांला ओढीत येथवर आणले. नांगरून पडलो आहोत. बोटीवर माल प्रचंड आहे."

"कसला माल आहे ?" माविसने विचारले,

"सल्फेटस् आहेत." कप्तानाने सांगितले.

मॉविस इकडे कप्तानाशी बोलत असताना बार्बारा सटकली. तिने एका बावळट अधिकाऱ्याशी दोस्ती केली. त्याने सांगितले –

"या जहाजावर ८५०० टन कॅल्शियम अमोनियम नायट्रेट आहे. खतासाठी व दारूगोळ्यामध्ये हे वापरतात. या जहाजाच्या कधी ठिकऱ्या उडतील ते सांगवत नाही. त्या हरामखोर ग्रीक संचालकांनी आम्हांला बनवून हा माल भरला आहे."

एकातून एक माहिती बाहेर आली. हे जहाज लाल चीन सरकारसाठी ग्रीक कंपनीने भाड्याने दिले होते. याचा अर्थ अमेरिकेचे सर्व निर्बंध धाब्यावर बसवून इंग्लंडमधून इंग्लिश निशाण फडकवीत या जहाजातून दारूगोळा लाल चीनकडे चालला होता.

या जहाजावर दोघी तीन दिवस राहिल्या. मग एक ऑस्ट्रेलियन जहाज तेथे आले व सर्व नायट्रेट त्या जहाजावर भरण्यास सुरुवात झाली. मॉविसने त्या जहाजाच्या कप्तानाला विचारले,

"हा सर्व माल कुठे नेणार ?"

तो म्हणाला, "कन्टॉनजवळील लाल चीनमध्ये उतरवणार."

दोघींनी फोटो घेतले. नायट्रेटच्या गोण्यांच्या थडी लागलेले फोटोही त्यात होते. दोघींना आनंद झाला की आंतरराष्ट्रीय क्षेत्रात चाललेला हा भयानक काळाबाजार वृत्तपत्रांतून जाहीर होताच, सर्वत्र एकच खबबळ उडणार. पैसेही बरेच सुटतील.

मजकूर व फोटो लंडनला रवाना झाले. आठवला गेला, यातील एक ओळ-सुद्धा एकाही ब्रिटिश वृत्तपत्राने प्रसिद्ध केली नाही. लंडनहून एजन्सीने त्यांना कळविले, "या गोष्टी प्रसिद्ध करता येत नाहीत."

इंडोनेशियात आता युद्ध पेटत आले होते. सुकार्नोच्या फौजा बंडखोरांशी लढत होत्या. सुमात्रा बेटावर नुकतेच जाकार्ताहून सैन्य उतरले होते. सुमात्रात मुसलमान धर्मीयांची संख्या अधिक. त्यामुळे बायका आपापल्या नवऱ्यांनाच मुखासहित दिसायच्या. बाकी सगळा काळा गोषा. मॉविस व बार्बारा सिंगापुरात भटकत होत्या. पण त्यांना आता जकार्ता व विशेषतः, सुमात्राला जाण्याची घाई झाली होती.

दोघींना मेनोडीझ लोकांनी इंडोनेशियाबाहेर पिटाळले आहे, ही गोष्ट सिंगापुरातील चिन्यांपर्यंत पोहोचली होती. या दोघी सुकार्नो सरकारच्या बाजूच्या आहेत, या कल्पनेने सिंगापूरातील चिनी–जे सर्व लाल चीनबद्दल आस्था बाळगणार होते– दोघींशी फार प्रेमळपणाने वागले. रोझ–शिन नावाखाली तेथील चिनी वृत्तपत्रांत दोघींचा छब्यांसह सविस्तर परिचय छापून आला.

### ● सुमात्रा प्रवेश

'तिळा उघड' म्हणताच दार उघडले. सुमात्राला जाण्याचा व्हिसा कुणाला मिळत नव्हता, तो या दोघींना तेथल्या इंडोनेशियन वकिलातीने मिळवून दिला.

सुमात्रा व मेनाडोवर बॉंबफेक होत होती. मेनोडीझ बंडखोरांनी काही विमाने पैदा केली होती. खाजगी अमेरिकन धाडसी वैमानिक इंडोनेशियन सरकारच्या ताब्यातील प्रदेशावर बॉंबफेक करण्याची भाडोत्री कामे पत्करीत होते.

एका मालवाहू बोटीतून माविस व बार्बारा मध्य सुमात्रात दाखल झाल्या. आपण येत असल्याचे वृत्त त्या दोघींनी तिथला लष्करी अधिकारी कर्नल जानी याला कळवले. त्याने त्यांच्या स्वागताची तारही जातीने पाठवली.

जानीच्या वशिल्याने लेफ्ट. कर्नल साबिरीन यांचे घरी दोघी पाहुण्या म्हणून उतरल्या. साबिरीनने सांगितले, "मला कधी रात्री अपरात्री लढाईसाठी बाहेर पडावे लागेल, याचा नेम नाही."

माविसने सांगितले, "आम्हांला पण त्या वेळी उठव. आम्हांलाही लढाई पाहायची आहे."

साबिरीन खूष झाला. इंडोनेशियात दोन चांदबिंब्या पाहून त्याची तबियत खूष झाली.

आठवडाभरातच एका पहाटे ४ वाजता साबिरीनने दोघींना जागे केले. त्याच्या बंगल्यासमोर शेकडो सैनिक तयार झालेले होते. मोहिमेवर निघायचे होते. बंडखोर पुढे घुसू लागल्याची बातमी कळली होती. दोघींनी जीपमध्ये उड्या मारल्या.

सूर्योदय होण्यापूर्वी साबिरीन आपल्या फौजेसह गावाबाहेर दूरवर पोचला. तेथे खाली उतरून माविस व बार्बारा रस्त्याकडील गटारात उतरल्या. समोरच्या टेकडीच्या दिशेने गोळीबार सुरू झाला.

इतक्यात साबिरीनने लढाई थांबवली. सैनिकांना मागे ठवून साबिरीन माविस-बार्बारासह पुन्हा घरी आला. दिवसभर बंगल्यात राहून रात्री पुन्हा तो जेव्हा लढाईला निघाला तेव्हा माविस–बार्बारा पुन्हा त्याचेबरोबर निघाल्या. साबिरीनने सांगितले, "रात्रीची वेळ आहे, येऊ नका."

दोघींनी ऐकले नाही. त्यांचे कॅमेरे त्यांना घरी बसू देत नव्हते. पुनः पूर्वीच्या ठिकाणी रात्रीच्या काळोखात दोघी दाखल झाल्या.

इतक्यात अगदी जवळून गोळ्या सुटल्या, पेट्रोमॅक्सच्या बत्त्या भराभर विझवून साबिरीनने जीपमध्ये उडी मारली. जीप मागे परतवून निघून गेली.

इतर सैनिकांबरोबर माविस व बार्बारा दोघी मागे राहिल्या. दोघींच्या पोटात धडकी भरली. दोघींनी धीर सोडला नाही. काळोखा रस्त्याच्या कडेकडेने दोघी गावात आल्या. खेडेगाव सगळे उजाड झाले होते. एका झोपडीवजा घरात दोघी शिरल्या. आदल्या दिवशी घाईघाईने बंडखोरांनी जेथून जागा सोडून पोबारा केला त्यातीलच ती एक झोपडी होती. झोपडीत कॉट होती: अंथरुणे पांघरुणे होती. मच्छरदाण्या होत्या. दोघींनी रात्र तेथेच काढण्याचे ठरविले. काही दुय्यम अधिकारीही पाठोपाठ गावात आले होते. त्यांनी व्हरांड्यात मुक्काम ठोकला.

दुसऱ्या दिवशीची सकाळ झाली. तो कर्नल जानी स्वत:च तिथे दाखल झालेला. कर्नल जानीने दोघींना स्वागताची तार पाठवली होती खरी. परंतु या दोघी पोरी प्रत्यक्ष गोळाबारीत स्वस्थ निजलेल्या पाहून त्याचा डोळ्यांवरचा विश्वासच उडाला.

तावडतोब दोघींना संरक्षणासाठी काही सैनिक देऊन कर्नल जानीने माविस व बार्बाराला परत धाडले. साबिरीनच्या घरी, बुकित–ठिंगी या गावात दोघी परत आल्या.

कर्नल जानीला निरोप देऊन साबिरीन परतला. तो माविस व बार्बाराला म्हणाला,–

"बंडखोर पळत आहेत. आता त्यांचा पाठलाग करून त्यांना ठेचून काढण्याचे काम (Mopping–up) सुरू होणार आहे. तुम्ही येणार काय ?"

हा पुन: आपल्याला संकटात टाकून पळून जाईल, अशी शंका मनात असता-नाही, त्या दोघी पुन: त्याचेबरोबर निघाल्या ! सहा दिवस, सहा रात्री या खेड्यांतून त्या खेड्यात सैनिकांसह साबिरीन फिरत होता. गावात लपून बसलेल्या बंडखोरांना खलास करावे, किंवा पळवून लावावे अशी ही कामगिरी चालू होती.

बंडखोरांनी एका बाबतीत सरकारी सैन्यावर मात केलेली होती. प्रत्येक गावातील कुणीही माणूस, हा सरकारी सैन्याला मदत न देता असहकार पुकारीत असे. एका गावकऱ्याला माविसने विचारले, "तुम्ही कुणाच्या बाजूचे आहात ?" तो गावकरी खेडुत म्हणाला, "हे सरकार आम्हांला दिवाळखोर करून टाकावयाचे आहे. प्रत्येक खेड्यापाड्यात सैन्य अडकवून ठेवण्याची व्यवस्था आम्ही करू, रबराची पैदास थांबवू. हजारो पौंड–डॉलर्स सरकार गमावील."

पाठलाग संपवून साबिरीनबरोबर माविस–बार्बारा बुकित–ठिंगीला परतल्या. गावात बातमी होती की, १७ ऑगस्टला स्वातंत्र्यदिनापूर्वी गावावर बंडखोर चालून येणार आहेत. बंडखोरांनी गनिमी कावासुरू केला होता. कारण, त्यांच्या सैन्याचा बीमोड झाला होता.

आणि खरोखरच १७ ऑगस्टपूर्वीच एका रात्री चोहोबाजूंनी बंडखोर बुकित्–ठिंगी गावात घुसले. रात्रभर गोळाबारी चालू होती. बंडखोरांत बरेच विद्यार्थी होते. त्यांनी सुकार्नो सरकारविरुद्ध धर्मयुद्ध–जिहाद्–पुकारला होता.

पहाटे बंडखोर पळाले. बरेच मारले गेले. माविस–बार्बारा सकाळी ९ वाजता घराबाहेर पडल्या. बुकित्–ठिंगी गावाच्या मध्यभागी ४९ बंडखोरांच्या प्रेतांचा एकत्र ढीग केलेला होता. सुमारे दीडशे बंडखोर जखमी झाले होते. हल्ला मोठा होता. माविसने या प्रेतांच्या रक्तबंबाळ ढिगाचा फोटो घेण्यासाठी कॅमेरा लावला. कॅमेराच्या छिद्रातून तिने तो ढीग जेव्हा अगदी जवळून पाहिला, तेव्हा मात्र तिने गपकन् डोळे मिटून घेतले व क्लिप् दाबली. [ अपूर्ण ]

रा. म. शास्त्री

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## ☐ कबूतरस्य चक्षुर्वै सत्यम् !

"कबूतर कबूऽऽतर," असे काही तरी फिल्मी गाणे हल्ली रेडियोवर बरेच ऐकू येते. म्हणजे 'रॉयटर' ची बातमी एके काळी इकडून तिकडे नेण्यापासून मराठी सिने-दिग्दर्शकांना प्रेम प्रसंगांचे प्रतीक अन् हिंदी सिने-कवींना गाण्याचा विषय पुरविण्यापर्यंत यच्चयावत् कामे कबूतरांनी केली आहेत अन् आता खरोखरीच काही शिल्लक उरले नाही, अशी माझी समजूत होती. पण नाही ! मॉस्कोच्या एका यंत्रे तयार करण्याऱ्या कारखान्यात तयार झालेली यंत्रे फिरत्या पट्ट्यावर सरकू लागली की त्यांच्या चाचणीचे काम करण्यासाठी कबुतरे नेमली आहेत, असे नुकतेच वाचले. कबूतरांची दृष्टी म्हणे इतकी तीक्ष्ण असते की समोरच्या यंत्राच्या घडणीत अगदी सूक्ष्म दोष असला तरी तो त्यांना दिसतो.

घ्या ! आता हवेत कशाला ते 'क्वालिटी कन्ट्रोल' करणारे अमेरिकन इलेक्ट्रॉनिक कॉम्प्यूटर ? हिंदुस्थानातल्या प्रत्येक घराच्या प्रत्येक सांदी-कोपऱ्यांत कबूतर सापडते. ही सगळी कबूतरे पकडून हायर ट्रेनिंसाठी मॉस्कोच्या कबूतर-कॉलेजांत पाठवली की प्रश्न मिटला.

रशिया हा कामगारांचा स्वर्ग आहे म्हणतात. तेव्हा या कामगार कबूतरांच्या 'सर्व्हिस कंडिशन्स' बद्दल विचारायलाच नको. प्रत्येक कबूतराला भरपूर दाण्यांचा पगार, एअर-कंडिशन्ड खुराडे, कबूतरीणबाईंना मोफत प्रसूतीची सोय आणि चि. कबूतर कुमार याला उडायला शिकविण्यासाठी फुकट सरकारी शाळा या सोयी ओघानेच आल्या. शिवाय रशियात उत्पादन उच्चांकाला महत्त्व फार, तेव्हा एखादे महत्त्वाकांक्षी कबूतर 'सोव्हिएट उत्पादनवीर' म्हणून कीर्ती मिळविण्याचाही प्रयत्न करू शकेल.

आता प्रश्न एवढाच की या कामगारांच्या राजकीय शिक्षणाची सोय काय ? कारण, प्रत्येक सोव्हिएट कामगार मग तो माणूस असो की कबूतर; एकनिष्ठ साम्यवादी असायला हवा हे सांगायला नकोच. तेव्हा मार्क्सच्या 'कॅपिटल' कबूतर भाषेत भाषांतर करणे आवश्यक आहे. आजच्या गरजेपेक्षा अधिक दाणे खुराड्यांत ठेवणे गृहिणीय भांडवलवादाचे लक्षण आहे, हे प्रत्येक साम्यवादी कबूतराच्या मनात नीट ठसले पाहिजे. एकदा एवढे झाले की शांतीच्या कबूतराला तोडीला तोड म्हणून क्रांतीचे कबूतर तयार होईल.

## □ मरीन ड्राइव्हच्या जंगलातला वाघ

काही दिवसांपूर्वी न्यूयॉर्कच्या एका भारतप्रेमी धनिकानें 'इव्हिनिंग इन बाँबे' नावाची पार्टी दिली, तेव्हा बागेत कृत्रिम ताडा-माडाची झाडे लावली होती अन् झूमधून हत्ती आणले होते. निमंत्रित पाहुण्यांतल्या एका स्त्रीची कल्पना याच्याही पुढे धावली. तिने काळ्या-पिवळ्या पट्ट्यांच्या घट्ट पोषाख घातला अन् शेपटी लावली! "हिंदुस्थानात वाघ आहेत" म्हणून आपण असे कपडे केल्याचा तिने खुलासा केला. पण हे हिंदुस्थानी वाघ संध्याकाळी मुंबईला चौपाटीवर नाही तर मरीन ड्राइव्हला फिरायला जातात, -हे या बाईला कोणी सांगितले? मुंबईला संध्याकाळी ऑफिसातून येणारी गर्दी पाहिली म्हणजे मुंबईत शेळ्या भरपूर आहेत हे पटते; पण हिंदुस्थानातली माणसे कितीही शेळपट असली तरी हिंदुस्थानी वाघांना चौपाटीची भेळ नाहीतर मरीन ड्राइव्हचे आईस्क्रीम खाऊन गुजराण करता येईल असे वाटत नाही.

## □ आंतरराष्ट्रीय मुडदे

हल्लीचे आंतरराष्ट्रीय जग आंतरराष्ट्रीय परिषदेवाचून चालू शकत नाही. पंतप्रधानांपासून विद्यार्थ्यांपर्यंत जो तो आंतरराष्ट्रीय परिषदा भरवीत असतो. त्यांतून आता मुडदेफरासांची भर पडली आहे. पश्चिम युरोपांतल्या आठ हजार मुडदेफरासांच्या प्रतिनिधींनी नुकतीच एक आंतरराष्ट्रीय परिषद भरवली आणि तीत ठराव केला की पश्चिम युरोपच्या देशांतल्या मुड्यांना पुरेसे 'हालचाल-स्वातंत्र्य' मिळत नाही, ते मिळून एका देशातून दुसऱ्या देशात मुड्यांची वाहतूक अधिक सुकर झाली पाहिजे. शाबास! मला आपले वाटत होते की फक्त जिवंत भारतीयांनाच बी– फॉर्मसारखे हालचाल निर्बंध लागू आहेत. पण हिंदुस्थानातल्या जिवंत माणसाची अन् युरोपातल्या मेलेल्या माणसाची एकच गत दिसते.

## □ 'हरणां'चा देश

हिंदुस्थान हा हरणांचा देश आहे. म्हणजे आपल्याकडे सीता–हरण, रुक्मिणी–हरण, सुभद्रा–हरण अशी नाना प्रकारची हरणे होऊन गेली आहेत. पण नामुष्कीची गोष्ट अशी की, हरणाचा पद्धतशीर व्यवसाय करावा अशी कल्पना आजच्या औद्योगिक युगातदेखील आपल्यापैकी कुणाला सुचली नाही. युरोपात सिसिलीमध्ये मात्र हा व्यवसाय करणारी टोळी (की बोर्ड ऑफ डायरेक्टर्स?) पोलिसांना आढळली आहे. एखाद्या उपवधू माणसाने गुपचुप या कंपनीला ऑर्डर द्यायची एक बायको पाहिजे, की, ऑर्डरीतल्या तपशिलाला जुळेलशी पोरगी पळवून आणून त्याच्या हवाली करण्यात येई. लग्नाच्री 'डायरेक्ट मेथड' म्हणतात ही. एवढी सोपी सरळ सोय सिसिलीतल्या पोलिसांना नकोशी झाली याचा अर्थ एकच होऊ शकेल, अन् तो म्हणजे एकाही सिसिलीयन पोलिसाला लग्नाची मुलगी नसावी.

## राशी भविष्य : श्री. बी. डी. घाणेकर : भृगुसंहितातज्ज्ञ

दिनांक २७ ऑगस्ट ते ३ सप्टेंबर १९६६

**मेष :** आपला राश्याधिपती सुखस्थानात नीच आहे. तसेच चंद्रावरून राहूचे परिभ्रमण चालू आहे. त्यामुळे कुटुंबात अस्वस्थता निर्माण होईल व मानसिक स्वास्थ्य बिघडेल. प्रवास शक्यतो टाळावा. ज्यांना तुम्ही आपले म्हणता, तेच लोक आपल्या मनाविरुद्ध वागतील. ज्यांचे कृत्तिका नक्षत्र प्रथम चरण असेल, त्यांना हा सप्ताह जास्त त्रासदायक जाईल. कोणतेही नवीन आर्थिक व्यवहार करू नयेत. अकारण शत्रुत्व व वादविवाद निर्माण होतील. रवी स्वगृही पंचमात असल्याने विद्यार्थ्यांस हा सप्ताह बरा जाईल. स्त्रियांचे बाबतीत पतीशी मतभेदांचे प्रसंग येतील. 'ठेविले अनंते तैसेचि रहावे। चित्ति असो द्यावे समाधान।' ग्रहांची सर्व दृष्टीने प्रतिकूलता आहे त्यामुळे शारीरिक व मानसिक स्वास्थ्याकरिता ईश्वरी उपासना करणे आवश्यक आहे. दि. १ ते ३ या तारखा आपणांस फारच प्रतिकूल आहेत. कोर्टाची कामे लांबणीवर टाकावीत. निदान १ ऑक्टोबरपर्यंत तरी त्रास सहन करावा लागेल.

**वृषभ :** आपला राश्याधिपती पराक्रमात असून पुष्कळशा ग्रहांची आपणांस बरीच अनुकूलता आहे. यत्न तो देव जाणावा. प्रयत्नाने पुढे येण्यास चांगलाच वाव आहे. भावांचे व मित्रांचे सहकार्य मिळेल. प्रियकराचे प्रेमसंबंध सुखावह होऊन त्यांत यशप्राप्ती मिळेल. फक्त व्ययातील राहू सोडल्यास सर्व ग्रहांची आपणांस अनुकूलता आहे. नवीन कार्य सुरू करण्यास काल अनुकूल आहे. वैवाहिक जीवन सुखावह होऊन पत्नी मनाप्रमाणे वागेल. आता आपला अनिष्ट काल संपला असून स्वास्थ्याचे दिवस दिसू लागतील. पराक्रमात गुरू व लाभात शनी या दोन ग्रहांची अनुकूलता असल्याने आपणांस काय कमी आहे? कोर्टकामांत यशप्राप्ती मिळेल. येणे असल्यास वसूल होईल. दि. १, २, ३ शुभ व आकस्मिक लाभ. स्त्रियांचे बाबतीत त्यांचे पतिराज त्यांच्या सर्व मनोकामना पूर्ण करतील. एकंदरीत 'आनंदी आनंद गडे इकडे तिकडे चोहीकडे,' असे वातावरण निर्माण होईल. ज्यांचे वृषभ लग्न व वृषभ रास असून कृत्तिका द्वितीय चरण असेल त्यांना विशेष फायदेशीर जाईल. विद्यार्थ्यांसही विद्याभ्यासदृष्टया हा काल अनुकूल आहे.

**मिथुन :** धनात गुरू व लाभात राहू व पराक्रमात रवी अशी ग्रहांची बैठक असताना आपल्याला कसली चिंता? आर्थिक स्थितीत चांगलीच सुधारणा होईल. व्यापारात उत्तम फायदा. किरकोळ वस्तूंपासूनही अर्थप्राप्ती चांगली होईल. आपल्या कलेची प्रसिद्धी होऊन समाजात मानमान्यता मिळेल. नोकरीत बढती मिळेल. बरेच दिवस मनात योजलेल्या कार्यांत यशप्राप्ती होईल. मामाचे सहकार्य मिळेल.

श्वशुरगृही आपला उदो उदो होईल व त्यांचेकडे शुभकार्य घडेल. ' सुख येता माझ्या दारीं मज काय कमी या संसारी ' असे स्त्रियांना वाटेल. घरात आनंदी वातावरण राहील व उत्साहाला उधाण येईल. मात्र दि. २८, २९ या तारखा प्रतिकूल जातील व मानसिक स्वास्थ्य तात्पुरते बिघडेल. ता. ३ जास्त शुभ. कोणत्याही कार्यांत यश येईल. मृग नक्षत्र प्रथम चरण असल्यास फारच शुभ. विद्यार्थ्यांस हा काल साधारण बरा आहे.

**कर्क :** आपल्या चंद्राजवळ गुरू महाराज आले आहेत. गेले वर्ष–दीड वर्ष जो त्रास आपण सहन करीत होतात तो त्रास संपुष्टाते येऊन आनंदी वातावरण निर्माण होईल. जे लोक आजपर्यंत तुम्हांस नावे ठेवीत होते, तेच आपल्या भजनी लागतील. अविवाहितांचे विवाह जमून येतील. तीर्थयात्रा घडेल. शारीरिक स्वास्थ्य उत्तम लाभेल. मन उल्हसित होऊन उत्साह वाढेल. बरेच दिवस मनात योजलेल्या कार्यांत यश लाभेल. पुनर्वसू नक्षत्र चतुर्थ चरण असल्यास दुधात साखर. दि. २ व ३ फारच शुभ. मनाजोगत्या घडणाऱ्या गोष्टी प्रियजनांना कधी सांगेन, असे होईल. स्त्रियांस पुत्रप्राप्ती व विद्यार्थ्यांस भरघोस यश येईल.

**सिंह :** आपल्या राशीचा विचार करता सर्वच ग्रह प्रतिकूल आहेत. कुटुंबात अस्वस्थाता निर्माण होईल. तसेच अकारण द्रव्यखर्च होईल. मनात नसतानाही मनाविरुद्ध गोष्टी कराव्या लागतील. मुलांच्याकडून अपमान सहन करावा लागेल. संततीप्रीत्यर्थ द्रव्यखर्च करावा लागेल. पैसे मिळताहेत असे वाटून ते मिळणार नाहीत. आश्वासने पोकळ ठरतील. पतीशी वादविवाद होतील. विद्यार्थ्यांनी डोळ्यांत तेल घालून अभ्यासात लक्ष दिल्यास यश लाभेल. समर्थांच्या उक्तीप्रमाणे ' जयासि वाटे सुखचि असावे । तेणे रघुनाथ भजावे ' । सर्व संकटांतून तरून जाण्याकरिता रघुनाथाचे स्मरण करावे. त्याखेरीज गत्यंतर नाही. अष्टमात शनी व बारावा मंगळ हे दोन जबरदस्त ग्रह प्रतिकूल आहेत. त्यामुळे आर्थिक व आरोग्यविषयक त्रास अधूनमधून होईल. १ ऑक्टोबरपर्यंत आपणांस बराच त्रास आहे. दि. २ व ३ प्रतिकूल.

**कन्या :** आपल्या राशीस लाभस्थानात गुरू उच्च आहे व त्याच्या जोडीला चार ग्रह आणखी अनुकूल आहेत. त्यामुळे या सप्ताहात आपल्या अडचणी दूर होऊन नवीन मार्ग दिसेल. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. मनातील मनोरथ पूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत. आता आपल्याला काळजीचे कारण नाही. नेटाने प्रयत्न केल्यास कोणत्याही कार्यात यश आहे. स्त्रियांचे बाबतीत त्यांचे पतिराज मनाप्रमाणे वागून त्यांच्या इच्छा पूर्ण करतील. बढतीचे व बदलीचे योग आहे. ' समर्थाचिया सेवकावक्र पाहे-असा सर्व भूमंडळी कोण आहे ? ' अशी स्थिती आहे. [ समर्थ–गुरू ] आणि तोच आपला प्रमुख असल्यामुळे आपले कोणी वाकडे करू शकणार नाही. राहू प्रतिकूल असल्यामुळे तब्येतीस किरकोळ त्रास. दि. १ व ३ शुभ.

तूल : दशमान चार ग्रहांची बैठक व लाभस्थानात उच्च गुरू असल्यामुळे सर्व गोष्टी मनाजोगत्या घडून येतील. सर्वत्र उत्साहाचे वातावरण राहील. प्रवास व तीर्थयात्रेचा योग. नोकरी करणारांस वरिष्ठांची मर्जी संपादन होईल. अधिकार व बढती मिळेल. आता कसल्याच तऱ्हेची चिंता न राहता आर्थिक स्थिती सुधारेल. व्यापारात उत्तम फायदा. नवीन करार होऊन अर्थप्राप्तीचा योग. कोर्टकामात यश. विद्यार्थ्यांस विद्येत उत्तम प्रगती होऊन समाधान प्राप्त होईल. स्त्रियांचे बाबतीत पतिराजांची मर्जी राहून नवीन वस्तूंची प्राप्ती होईल. दि. ३०—३१ जास्ती शुभ. ज्यांचे स्वाती नक्षत्र प्रथम चरण असेल त्यांस हा सप्ताह फारच अनुकूल आहे. 'पुढति, पुढति, पुढति म्या अभिवंदिला श्रीगुरू सकल मनोरथ पुरविना जो।' अशा तऱ्हेची गुरूकृपा असल्याने आपणांस कशाचीही कमतरता भासणार नाही. धैर्याने, नेटाने प्रयत्न होत असल्यास यश निश्चित आहे. प्रेमिकांचे मनोरथ पूर्ण होतील.

वृश्चिक : गेले वर्ष-दीड वर्ष आपण फारच अडचणीत आहात. मानसिक नैराश्य, प्रापंचिक अडीअडचणी याने आपण वैतागून गेलात, खरे ना ? परंतु वाइटानंतरही चांगले दिवस येतातच. भाग्यस्थानात गुरूचे परिभ्रमण सुरू आहे. त्यामुळे काळजीचे कारण नाही. अनिष्ट छायाग्रहांचे परिभ्रमण संपले. बेकारांस नोकरी लागेल, व्यापाऱ्यांना उत्तम यश. विद्यार्थ्यांना विद्येत प्रगती, अविवाहितांचे विवाह घडतील. विशाखा नक्षत्र प्रथम चरण असल्यास हा सप्ताह फारच उत्तम आहे. स्त्रियांना पुत्रप्राप्ती होईल. अकस्मात लाभाचा योग आहे. दि. १ व ३ ह्या तारखा फार शुभ आहेत. बरेच दिवस हालअपेष्टा आपण सहन केल्या त्या हळूहळू दूर होऊन उत्साही व आनंदी वातावरण राहील. प्रयत्नांची पराकाष्ठा करा. दैव अनुकूल आहे.
'पुढचे पाऊल पुढेच टाका' आता माघार नाही—अशी स्थिती आहे.

धनू : आपला राश्याधिपती अष्टम स्थानातून परिभ्रमण करणार आहे. तो उच्च स्थितीत असल्यामुळे आपणांस काहीतरी उचित फल देईलच. आठवा गुरू आहे म्हणून घाबरून जाण्याचे कारण नाही. अष्टमातून जवळजवळ ४ ग्रहांचे परिभ्रमण होत आहे. त्यामुळे अर्थप्राप्तीत अनुकूल घटना घडतील. प्रापंचिक अडीअडचणी निर्माण होतील.

'जाणतेने गुरू भजी जे-तेणे कृतकार्य होईल जे ॥'— ज्ञानेश्वर. आपण या सप्ताहात गुरू दत्तात्रयाची उपासना केल्यास आपणांस निश्चित यशप्राप्ती मिळेल. पंचमस्थानांतून केतूचे परिभ्रमण होत आहे व त्या स्थानाचा अधिपती बिघडला आहे त्यामुळे संततीच्या प्रकृतीची काळजी घ्यावी. स्थावरासंबंधीची कोर्टकामे लांबणीवर टाकावीत. १ ऑक्टोबरपर्यंत तरी आपणांस अधून-मधून त्रास सहन करावा लागेल. विद्यार्थ्यांस विद्येत त्रास सहन करावा लागेल. अभ्यासाबद्दल फार दक्षता घ्यावी लागेल. दि. २ प्रतिकूल. स्त्रियांचे पतीशी वादविवाद होतील.

**मकर :** आपण साडेसातीतून मुक्त झालात. सप्तमस्थानातून गुरूचे परिभ्रमण सुरू आहे. आपला राशिस्वामी गुरुने रुष्ट झाला असल्याने शरीरसौख्य व मानसिक समाधान चांगले लाभेल. लांबचा प्रवास व बदलीचा योग आहे. नोकरीत बऱ्याच अडचणी निर्माण होत होत्या. त्या दूर होऊन नोकरीत बढती मिळेल. बेकारांस नोकरी लागेल. विद्यार्थ्यांस चांगले यशप्राप्त होईल. अविवाहितांचे विवाह ठरण्याचे बेतात आहेत. दि. १ व २ शुभ नवीन कार्यारंभास अनुकूल. स्त्रियांचे किंवा प्रेमिकांचे बाबतीत – 'कितीतरी आतुर प्रेम आपुले वानती सारे '

सगळ्यांकडून आपली प्रशंसा, उत्साहाचे वातावरण राहील. नवीन वस्तूंची खरेदी कराल. फक्त सुखस्थानात राहू असल्याने आपल्या सुखास तेवढेच गालबोट आहे.

**कुंभ :** साडेसातीतील शेवटचे २॥ वर्षांचे पर्व चालू आहे. आपण बरेच दिवस काळजीत व चिंतेत काढलेत ना ? तो काळ आता संपला. शनी व गुरूचे परिभ्रमण आपणांस अनुकूल आहे. नवीन व्यवसायास सुरुवात होईल. मनाजोगत्या घटना अकस्मात घडून येतील. विरोधकांचे विरोध संपतील. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. मातुल घराण्याकडून सहकार्य मिळून तेथे शुभकार्य घडेल. अडीअडचणी दूर होऊन सुधारण्याच्या दृष्टीने आपली वाटचाल होईल. ३०, ३१ प्रवासाचा योग आहे. विद्यार्थ्यांस अडीअडचणी निर्माण होतील. १०० टक्के जरी मनाजोगत्या गोष्टी झाल्या नाहीत, तरी अनुकूलतेचा दीप दिसेल. कोर्टकामांत यश. आता आपले जीवन सुधारण्याच्या मार्गावर आहे, असे वाटून आपणांस मानसिक शांती लाभेल. 'केल्याने होत आहे, आधी केलेच पाहिजे', अशी स्थिती आहे.

**मीन :** आपणांस जरी साडेसाती चालू आहे तरी गुरूचे उत्तम रीतीने पाठबळ असल्यामुळे मनाजोगत्या गोष्टी घडू लागतील. अकस्मात लाभाचा योग. विद्यार्थ्यांस उत्तम यश. मुले मनाजोगती वागू लागतील.

'धन्य आनंद दिन, पूर्ण मनकामना ' अशी स्थिती होईल. ज्यांचे पूर्वाभाद्रपदा तृतीय चरण असेल त्यांस हा काल फारच शुभ आहे. हाती धराल ते तडीस न्याल, अशी स्थिती आहे. ता. ३०–३१ मानसिक अस्वस्थता वाढेल. विरुद्ध घटना घडतील. १ व ३ अत्यंत शुभ. आता कसलीच काळजी न करता सतत नेटाने प्रयत्न करा, म्हणजे आपले मनोरथ पूर्ण होतील. आर्थिक स्थिती निश्चित सुधारेल. आपल्या प्रयत्नांस दैवाची साक्ष आहे. दि. १६ सप्टेंबरपासून आपणांस याची विशेष प्रचीती येईल. मानसिक समाधान व आर्थिक प्राप्ती चांगली होईल–हा ग्रहमानाचाच परिणाम आहे बरं ! आपल्या इच्छित गोष्टी सिद्ध झालेल्या प्रियजनांना कधी सांगेन, अशी स्थिती होईल.

● ● ●




# ही कलोपासकांची

सादरकर्ते

शरद गोखले

पु. ल. देशपांडे यांना नाटककार व नट म्हणून नाव मिळण्यापूर्वीची गोष्ट. त्यांचे 'अंमलदार' महाराष्ट्रीय कलोपासक या संस्थेने बसवण्याचे ठरवले. नाटकाच्या तालमी सुरू झाल्या. आणि पहिल्याच दिवशी कै. अप्पासाहेब वझे यांनी कलावंतांच्या हजेरीपत्रावर सह्या घेतल्या. पु. लं. नी या 'हजेरी' प्रकरणाबद्दल आश्चर्य व्यक्त केले. त्यावर अप्पासाहेबांनी खुलासा केला : आपण कलेचे उपासक. उपासनेचे पावित्र्य सांभाळण्यासाठी तालमींना शिस्त पाहिजेच. आणि कलाकारांना या शिस्तीची जाणीव राहावी म्हणून हजेरीची योजना. तालमीची ही शिस्त खर्चालाही लागू. संस्थेचा प्रत्येक पैसा सकारण खर्च झाला पाहिजे, यावर त्यांचा भर. आज खरे वाटणार नाही कदाचित, पण 'अंमलदार'चा तालीमखर्च फक्त चौदा रुपये झाला.

उत्कृष्ट निर्मिती, नेटका प्रयोग ही 'महाराष्ट्रीय कलोपासक' या संस्थेची वैशिष्टये आज सतत तीस वर्षे टिकून आहेत. या यशामागे विशिष्ट ध्येयधोरणांनी वाटचाल करणारे संस्थेचे कलावंत आहेत. तीस वर्षांपूर्वी म्हणजेच १ ऑगस्ट १९३६ रोजी संस्थेची स्थापना झाली ती जुन्यांना न दुखवता नवीन रंगभूमीचा मागोवा घेण्याच्या उद्देशानेच. श्री. भगवानराव पंडित, प्राध्यापक मुपटकर, श्री. केशवराव दाते, म. म. द. वा. पोतदार, यांसारखी विविध क्षेत्रांतील नाटचप्रेमी मंडळी एकत्र जमली. चर्चा सुरू झाल्या व प्रत्यक्ष कार्य करण्याच्या हेतूने संस्था स्थापण्याचा निर्णय घेण्यात आला. संस्थेच्या नावासंबंधी खलबते सुरू झाली. 'महाराष्ट्र' हे नाव संस्थेच्या नावात असले पाहिजे, असा सगळ्यांचा आग्रह. महाराष्ट्र विद्यापीठाची कल्पना त्या वेळी आकार घेऊ लागली होती. आणि या मंडळींना त्यासंबंधी आत्मीयता होती. 'महाराष्ट्र' शब्दाचा स्वीकार झाला, तरी गाडी पुढे सरकेना. 'कलामंडळी' 'कला-केंद्र' असे शब्द सुचवले गेले. परंतु हे सर्व बाजूस पडून श्री. सांगवीकर यांनी सुचवलेले 'महाराष्ट्रीय कलोपासक' हे नाव सर्वांच्या पसंतीने निश्चित करण्यात आले.

## आग्रही भूमिका

संस्थेची वाटचाल सुरू झाली. दि. १-१०-३७ रोजी विजयानंद नाटचगृहामध्ये एक विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम संस्थेचा पहिला कार्यक्रम म्हणून सादर करण्यात आला. या प्रसंगी केलेल्या 'कारकून' नावाच्या एकांकिकेमध्ये सौ. सुधा सांगवीकर यांनी काम केले. कलोपासकांच्या रंगभूमीवरील त्या पहिल्या स्त्री-कलावंत. आज व्यावसायिक रंगभूमीवर स्त्रिया सरसकट काम करताना दिसत असल्या तरी आजही हौशी रंगभूमीसाठी स्त्रिया सहजतेने पुढे येत नाहीत. अशा परिस्थितीत ३७ साली हौशी रंगभूमीवर कलोपासकांनी स्त्री-कलावंत उभी केली, ही संस्मरणीय कामगिरी होय. स्त्रियांची कामे स्त्रियांनी करावीत, असा कलोपासकांचा पहिल्यापासूनचा आग्रह. भूमिकांसाठी स्त्री-कलावंत मिळावेत म्हणून संस्थेचे तेव्हाचे पदाधिकारी जंग जंग पछाडीत. ही आग्रही भूमिका हे त्यांचे खास वैशिष्टच आजही कायम आहे.

दुसरा पेशवासारखे ऐतिहासिक नाटक असो, अथवा 'धन्य मी' सारखे प्रयोगक्षम नाटक असो, निर्मिती उत्तमच झाली पाहिजे असा आग्रह. दुसरा 'पेशवा'च्या वेळची गोष्ट. बाजीरावाचे ऐश्वर्य नाटकात दाखवावे, म्हणून चांदीच्या तांब्याभांड्याचा वापर करण्याचे ठरवण्यात आले. पण द. वा. पोतदारांनी या कल्पनेस विरोध केला. मराठे लढाईवर असताना नवीन मुलूख मिळवण्यासाठी जात असल्याने किमती चीजवस्तू जवळ बाळगीत नसत. जर पराभव पदरी आला तरी आर्थिक झळ लागू नये, असाही एक हेतू त्यामागे असेच.

द. वा. पोतदार पडले इतिहासकार. त्यांच्या या सबळ स्पष्टीकरणामुळे ती सूचना मागे पडली.

या नाटकातील ' मस्तानी 'ची मातृभाषा मराठी नाही. तिचे लावण्य अप्रतिम. मनाजोगती स्त्री-कलावंत मिळवण्यासाठी संस्थेने भगीरथ प्रयत्न केले व सुमन किर्लोस्करांची निवड केली.

' अपूर्व-बंगाल 'मध्ये बंगाली वातावरण निर्माण करण्यासाठी एका बंगाली इसमाचे सहकार्य घेण्यात आले. वास्तवतेसाठी जे करणे आवश्यक, ते सर्व झालेच पाहिजे अशी संस्थेची भूमिका असल्याने नाट्यनिर्मिती चांगली होते, कलावंतांची कामेही चांगली होतात. परंतु कोणाचा काही दोष नसूनही असे काही प्रसंग निर्माण होतात, की संबंधितांच्या ते कायम लक्षात राहतात.

## पुण्याचा ट्रक

राज्य नाट्यस्पर्धांच्या अंतिम फेरीमध्ये ' अपूर्व बंगाल'चा प्रयोग होणार होता. कलाकार मंडळी सकाळीच मुंबईत दाखल झाली होती. सेट व अन्य सामान घेऊन येण्यासाठी ट्रक ठरवण्यात आला होता.

पण संध्याकाळचे सहा वाजले तरी ट्रकचा पत्ता नाही. मंडळी काळजीत पडली. मुंबईहून तातडीने दुसरा ट्रक रवाना करण्यात आला. ८ वाजले तरी याही ट्रकचा पत्ता नाही हे पाहिल्यावर तातडीचा उपाय म्हणून साहित्यसंघाकडे धाव घेण्यात आली. त्यातल्या त्यात योग्य वाटले ते सामान निवडून सेट लावण्यास सुरुवात होते न होते तोच आरोळी आली. ' पुण्याचा ट्रक आला ' पण बेटा आला तो नेमका गैरसोयीच्या बाजूस. पोलिसांच्या हातापाया पडून साहित्यसंघात सामान नेण्यास सोयीस्कर असलेल्या चर्चगेटच्या बाजूस ट्रक आणण्यात आला. घड्याळात ८।। झालेले. स्पर्धेच्या नियमाप्रमाणे नाटक सुरू होणे जरूर. डोळ्यांसमोर आलेल्या सेटचा मोह तर सोडवेना. शेवटी परीक्षकांना सर्व परिस्थिती सांगून व प्रयोग सुरू केल्यापासून तीन तासांत संपवण्याचे आश्वासन देऊन अर्धा पाऊण तास जादा वेळ मागून घेण्यात आला. आणि मग जी धावपळीला सुरुवात झाली म्हणता की उपस्थित प्रेक्षकांना तेही एक नाटकच पाहावयास मिळाले. काम करणारे कलावंत, तंत्रज्ञ व अन्य सहकारी ' ट्रक ते साहित्य संघ ' अशा फेऱ्या मारत होते. सेट उभा होत होता. अखेरीस ९।। च्या सुमारास प्रयोग सुरू झाला. आणि चांगलाच रंगला. विशेष म्हणजे अंतीम फेरीसही [दुसऱ्या क्रमांकाचे यश कलोपासकांना मिळाले. लेखनाचे सरकारी पारितोषिक या नाटकाने पटकावल्याने कलोपासकांनी हे नाटक घेतले. व्यावसायिक रंगभूमीवर ' अपूर्व बंगाल ' उभे करण्याचा रांगणेकरांचा प्रयत्न फसला असूनही संस्थेने या नाटकाची निवड केली. इतकेच नव्हे तर खुद्द रांगणेकरांशी चर्चा करून त्यांनी न वापरलेल्या Tape Recording चा वापर करून नाटकाची रंगत वाढवली.



माणिक नाचते आहे! धुंद होऊन बेहोष होऊन!!

स्वप्नीचे हे धेन – डावी कडून – दादा (वसंत गुडे) माणिकनीला (इंदू मेहेंदळे), (शामला आगाशे), शेखर (मनोहर नातू)

## उघडचा माळावरचा प्रयोग

सर्वसाधारणपणे बाहेरगावची आमंत्रणे आल्यास् यजमानास नाराज न करण्याचा संस्थेचा परिपाठ. 'कथा कुणाची' त्या प्रयोगांची चलती असताना लोणावळचास एक प्रयोग घेण्यात आला. प्रयोगाच्या दिवशी दिग्दर्शक जाऊन पाहतात तो स. प. महाविद्यालयाच्या क्रीडांगणाइतक्या विस्तृत प्रांगणाच्या मध्यभागी कामगार मंडळी रंगमंच उभा करण्यासाठी खोदकाम करीत आहेत. चारी बाजूंस चार खांब, तीन बाजूंना पडदे. पायाखाली फळचा व फळचांखाली पिपे असा अभिनव रंगमंच उभा राहिला. कलाकारांना दिग्दर्शकांनी या रंगभूमीपासून दूर ठेवले, आयत्या वेळी एकंदर प्रकार पाहून कलाकार थक्क झाले. परंतु 'आलिया भोगासी' या न्यायाने प्रयोग सुरू केला. प्रयोगास गर्दी बेसुमार, त्या मानाने व्यवस्था मात्र कमी. वारा अत्यंत वेगाने सुटलेला. सेट उभा राहणेही कठीण जात होते. रंगमंचावर कलाकार व समोर प्रेक्षक दोघेही अस्वस्थ झालेले. त्यात दूरच्या प्रेक्षकांना संवाद ऐकू येईनात. प्रेक्षक काय म्हणतात ते कलावंतांना समजेना. नाटकाचे संवाद बोलण्याऐवजी कलाकार हळू आवाजात, प्रयोग करावा की नाही याविषयी चर्चा करू लागले. आतून दिग्दर्शक साहेबांचा हुकूम आला प्रयोग झालाच पाहिजे. मग मात्र जिद्दीने प्रयोगास सुरुवात झाली. पहिला अंक यथातथाच पार पडला दुसऱ्या व तिसऱ्या अंकाने मात्र जबरदस्त पकड घेतली, परतणाऱ्या प्रेक्षकांची कौतुकाची थाप कलाकारांच्या पाठीवर पडली.

" कथा कुणाची व्यथा कुणा " हे संस्थेस अपूर्व यश मिळवून देणारे नाटक. या नाटकाच्या प्रयोगांची झोड चालू असतानाची गोष्ट. मुंबईस एका संस्थेमध्यें रात्री ९।। वाजता प्रयोग होणार होता. प्रयोगाच्या आधी श्री. स. का. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली काही समारंभ आयोजित करण्यात आला होता. कलाकारांपैकी काही मंडळी पुढे रवाना झाली होती व बाकीचा संच स्वतंत्र मोटारीने पुण्याहून निघाला होता. रात्री ८ च्या सुमारास कुर्ल्याजवळ गाडी बंद पडली. शेवटी वाटेत भेटणाऱ्या प्रत्येक खाजगी मोटारींना व ट्रकसना ' लिफ्टची ' विनंती करण्यात आली. विशेष म्हणजे या प्रवाशांचे अपूर्व सहकार्य मिळाले. प्रवेशानुक्रमाने पात्रे रवाना होऊ लागली.

नऊ वाजून गेले तरी कलाकारांचा पत्ता नाही हे पाहिल्यावर दिग्दर्शक राजा नातू अस्वस्थ झाले. इतक्यात दोन कलाकारांना घेऊन एक जीप येऊन थडकली. आणि थोडचा थोडचा अंतराने अन्य मंडळी येऊन पोहोचली.


सुदैवाने थोडे पण नेटके बोलणाऱ्या सदोबांनी त्या दिवशी तासभर भाषण ठोकले. आणि ९।। ऐवजी १० वाजता पहिल्या अंकाचा पडदा उघडला.

' महाराष्ट्रीय कलोपासक ' संस्थेचे नाव आज हौशी रंगभूमीचे उपासक मोठ्या अभिमानाने घेतात. त्यात एखाद्या व्यक्तीचा गौरव नसून प्रवाहाप्रमाणे अखंड गतिमान राहणाऱ्या संस्थेचा गौरव आहे. अनेक कलावंत, तंत्रज्ञ, नाटककार, संस्थेमध्ये आले आणि गेले. आपल्याजवळील जे उत्कृष्ट होते ते संस्थेस दिल्यानंतर जी जुनी मंडळी राहिली, त्यांनी मार्गदर्शनाचे काम स्वीकारले. नवीन तरुणांच्या कला-गुणांना, महत्त्वकांक्षी प्रयोगशीलतेला त्यांनी प्रोत्साहन दिले. प्रसंगी त्यांच्या कल्पना पसंत नसूनही. विशेष प्रसंगी वादविवाद घातले. पण वादाचे वादंग संपून एकदा निर्णय घेतला म्हणजे सर्वांनी एकदिलाने कामाला लागायचे असा परिपाठ आजही चालू आहे.

## मेहनत मेहनत.....

नाटच प्रयोग परिपूर्ण करण्यासाठी कलोपासकांइतकी मेहनत घेणारा नाटचसच क्वचितच आढळतो. तंत्राच्या वर्चस्वाचे सध्याचे दिवस. परंतु कथावस्तूस तंत्र मारक न ठरता पूरक ठरण्याच्या दृष्टीने तंत्राचा वापर ही मंडळी मोठ्या कौशल्याने करतात.

' धन्य] मी कृतार्थ मी 'चा अभिनव सेट, ' वळणाचे पाणी ' मधील फ्लॅश बॅक, ' दुसरा पेशवा ' मधील वातावरण ही सर्व याची उदाहरणे म्हणून देता येतील. ' कथा कुणाची 'साठी करण्यात आलेल्या Recorded Effect च्या वापराचाही यात समावेश करावा लागेल. नाटच प्रयोग बसवण्याची संस्थेची पद्धत अभ्यासपूर्ण आहे. नाटक निवडल्यावर प्रथम पात्र-योजनेच्या दृष्टीने हालचाली सुरू होतात. त्याच वेळी सेट निश्चित करण्यात येतो. रंगमंचावर वापरण्यात यावयाच्या प्रत्येक



"या शनिवारवाड्यात, मी बांधलेल्या शनिवारवाड्यात, माझ्या इच्छेला कोण प्रतिबंध करणार ?" ..

दुसरा पेशवा– मस्तानी (सौ. सुमन किर्लोस्कर), बाजीराव (वसंत गुडे), चिमाजी (विनायक जोशी)

बाबींची तपशीलवार नोंद केली जाते. लाइटिंगच्या जागा निश्चित करण्यात येतात. रंगमंचावर खुर्ची असली तर कोणत्या प्रकारची व आकाराची असावी हे ठरवण्यात येते. एखाद्या पात्रास सिगरेट, दारू यांसारखे व्यसन असेल, तर त्याचा वापर कोणत्या पद्धतीने व्हावा याची योजना असते. थोडक्यात पात्रांच्या हातात नाटक पडण्यापूर्वी अन्य तपशीलाचा आराखडा निश्चित झालेला असतो. पात्र-योजना झाल्यानंतर कलाकारांना कथानकाची पूर्ण कल्पना देण्यात येते. नाट्य वाचनाच्या फेऱ्या सुरू होतात. साधारणपणे आठ ते दहा दिवसांनंतर नाटक हळूहळू आकार घेऊ लागते. प्रत्येक कलावंताला त्याच्याकडून काय अपेक्षित आहे, याची पूर्ण कल्पना देण्यात आलेली असते. 'कॉम्पोझिशन्स' आधी ठरवल्याप्रमाणे बसवण्यात येतात. कलाकारांच्या हालचाली ( Movements ) निश्चित करण्यात येतात. तंत्रामुळे कलाकार विचकणार नाही, अशी दक्षता घेण्यात येते. तंत्र व नाट्य यांच्या संयुक्त परिणामांची खात्री केली जाते.

तालमींचे प्रमाण वाढते राहिल्याने संवाद आपोआप पाठ होतात. नाटकाची चोपडी बाजूला कधी पडली ते कलाकारांनाही उमजत नाही.

उभे राहिलेले नाटक आता बाळसे धरू लागते.

अभिनयाचे बारकावे, रंगमंचावरील हालचाली यांना सफाई येत जाते. व्यक्ती बाजूस पडते. संघ आत्मविश्वासाने उभा राहतो. काळ झपाट्याने पुढे जात असतो. सात आठवडे होऊन गेल्याने कलाकार प्रेक्षकांसमोर जाण्यास उत्सुक असतो. यानंतर दोन-तीन परिपूर्ण रंगीत तालमी घेऊन किरकोळ दोष बाजूला काढण्यात येतात. प्रॉम्प्टिंग नाही, असा संस्थेचा दंडक. प्रयोगाच्या वेळी त्याची काटेकोर अंमलबजावणी होत असल्याने प्रेक्षकांनी भरलेल्या प्रेक्षागृहात प्रयोग उभा राहतो तो प्रेक्षागृह जिंकण्याच्या जिद्दीनेच.

इतके करूनही एखादे वेळी लक्षात राहण्याजोगे प्रसंग घडतातच.

संस्थेच्या ‘ वैदेही ’ नाटकाचा प्रयोग भानुविलासमध्ये चालू होता. प्रेक्षक तन्मयतेने नाटक पाहत होते. श्री. अनंत ओक तंबाखू पाईप ओढतात असे दृश्य चालू होते. पाईप ओढण्याचा सराव नसल्यामुळे असो, अथवा जोरदार पफ् भरल्यामुळे असो, ओकांना ठसका लागला. प्रयत्न करूनही ठसका थांबेना. बरं, कलावंत जिद्दीचा, रंगमंचावरून हलेना. पहिल्या रांगांतील प्रेक्षक अस्वस्थ झाले. रंगभूमीवर असलेल्या वसंतराव गुडे यांनी योग्य प्रसंगावधान राखून ओकांना आत नेले. सुदैवाने त्यांचे या प्रसंगाचे संवाद ‘ घोस्ट–साऊंड ’ म्हणून वापरण्यासाठी टेप केले होते. त्यांचा वापर करून वेळ निभावून नेण्यात आली. उत्कृष्ट तंत्र नाटकाचे यश द्विगुणित करते खरे, परंतु एखाद्या वेळेस रुसून बसले, म्हणजे मोक्याच्या वेळी फजीतवाडा करते.

**हॅलो ऽ ऽ, जरा मोठ्यानी बोला ! आमचा फोन बिघडलाय ”**



**कथा कुणाची व्यथा कुणा – इन्स्पेक्टर (कल्याण वर्दे), रत्ना (सौ. सेवा चोहान)**

अंतीम स्पर्धेमध्ये 'वैदेही' नाटकाचा प्रयोग चालू असताना एका डीमरने अचानक पेट घेतला. कलाकारांनी नेटाने प्रयोग चालू ठेवला तरी तंत्रज्ञ नातू हबकून गेले. क्षणाचाही विलंब न लावता त्यांनी कनेक्शन तोडून टाकले आणि सुमारे पंधरा मिनिटेपर्यंत अर्धी रंगभूमी अंधारात राहिली. प्रयोग मात्र चालूच राहिला.

## चांगली नाटके हवीत

नवीन नाटके रंगभूमीवर आणण्यावर संस्थेचा कटाक्ष आहे. पण चांगली नाटके उपलब्ध होत नाहीत, अशी संस्थेची तक्रार आहे. नाट्य-निर्मितीस उत्तेजन देण्याच्या हेतूने संस्थेने काही काळ नाट्य-लेखन स्पर्धाही चालवल्या. परंतु अपेक्षित यश मिळू शकले नाही. तरीही नवीन नाटकाचा अट्टाहास न सोडता शं. गो. साठे, श्री. विवलकर, गो. गं. पारखी, गो. नी. दांडेकर आदी नाटककारांच्या नाट्यकृती निवडून संस्थेतर्फे त्यांचे प्रथम प्रयोग सादर करण्यात आले आहेत. एखाद्या नाटक-काराचे नाटक निवडले की, प्रयोगाबाबत होणाऱ्या चर्चासत्रात नाटककारही सामील होतो. सर्वसाधारणपणे ज्या नाटककारांशी संस्थेचा संबंध आला, त्यांच्याशी संबंध इतके चांगले राहिले, की लेखी करारमदार करण्याची कधी गरजच भासली नाही.

नाटकावर भरपूर कष्ट घेतल्यावर व तितक्याच प्रमाणात पैसा खर्च केल्यावर जर एखादे नाटक यशस्वी ठरले तर अशा नाटकाचे आपण जास्तीत जास्त प्रयोग करावे, असे संस्थेस वाटणे अत्यंत स्वाभाविक आहे. सरकारी स्पर्धेत संस्थेच्या एक नाटकावर पारितोषिकांचा वर्षाव झाला. नाटक चांगल्या प्रकारे चालू लागले. परंतु संस्थेच्या कष्टाची व भांडवलाची पर्वा न करता नाटककाराने ते नाटक दुसऱ्या

"अग, हे तुला तू लहान असल्यापासून ओळखता हेत !"



'कथा कुणाची' मध्ये – मुकुंद प्रधान ( सुभाष गोडबोले ) अरविंद साने ( माधव वझे ), मुग्धा ( सुनिल गुणे )

व्यावसायिक संस्थेस दिल्याचा अनुभवही संस्थेच्या पदरी आहे.

नाटककारांनी रंगभूमीच्या मर्यादांची जाणीव ठेवली पाहिजे, अशी कलोपासकांची अपेक्षा आहे. कित्येक वेळा नाटककार अशा कल्पना कागदावर उतरवतात की, रंगमंचावर त्या साकार करणे जवळजवळ अशक्य असते.

अर्थात अशा कित्येक कल्पनांचाही संस्था आव्हान म्हणून स्वीकार करते. ' वळणाचे पाणी ' या नाटकात सुरुवातीस बरेच जुने घर दाखवले होते व फ्लॅश बॅक पद्धतीने काही क्षणातच तेच घर वापरात असल्याचे दाखवण्यात कलोपासक यशस्वी ठरले आहेत.

## मर्यादित प्रयोग

संस्थेचे एखादे नाटक आर्थिकदृष्टया चांगले चालू लागले तरी कलावंत व्यावसायिक नसल्याने प्रयोग संख्यांवर स्वाभाविकपणे मर्यादा पडते. सर्वसाधारणपणे पुण्या-मुंबईच्या परिसराबाहेर नाटक नेता येत नाही. शनिवारी रात्री एक व रविवारी दोन असे दोन दिवसांत तीन प्रयोग मुंबईस करून कलाकारांना सोमवारी सकाळी आपापल्या व्यवसायासाठी पुण्यात हजर राहावे लागते.. एकाच नाटकाचे प्रयोग सतत चालू ठेवल्याने नाटकाची मूळ लज्जत कमी होत जाऊन कलाकारांमध्येही शैथिल्य येते, असा संस्थेचा अनुभव आहे. ' कथा कुणाची ' या नाटकाचे प्रयोग जोरात चालू असतानाची गोष्ट. मुंबईच्या शिवाजी मंदीरमधील प्रयोग ऐन रंगात आला होता. नाटकातील अरविंद साने (माधव वझे) आपले कपडे बदलून पॅन्ट व मॅनिला घालून रंगमंचावर येतो, असे एक दृष्य नाटकात आहे. परंतु कपडे बदलण्यास वेळ जेमतेम दोन मिनिटांचा. नेहमीप्रमाणे माधवराव आत आले. घाईने कपडे बदलून पॅन्ट–मॅनिला चढवला आणि आता रंगभूमीवर प्रवेश करणार, इतक्यात पॅन्टचे बक्कल तुटले. एंट्री तर आलेली. काय करणार ? आत असलेल्या कलाकारांपैकी एकाने चटकन आपला टाय काढून माधवच्या पॅन्टला बांधला. वरती मॅनिला होताच – अरविंद साने रंगभूमीवर रवाना झाले. आला प्रसंग साजरा झाला.

एकाच नाटकाचे प्रयोग काही मर्यादेपलीकडे ' ठोकत ' बसण्यापेक्षा नवीन नाटके रंगभूमीवर आणणे संस्थेस अधिक पसंत आहे. त्यासाठी आवश्यक खर्च करण्याची नेहमीच तयारी. मात्र स्थापनेपासून ते आजतागायत संस्थेची आर्थिक स्थिती भरभक्कम कधीच नव्हती आणि नाही.

एकाच वाक्यात परिस्थिती सांगावयाची झाल्यास पैशावाचून कलोपासकांचे अडले नाही आणि बॅंकेत कधी शिल्लक पडली नाही. एखादे नाटक चालून पैसा जमला तर नवीन नाटकात तो खर्ची पडायचा हे ठरलेले. आपुलकीच्या नात्याने व कलाप्रेमाने उभे राहिलेले व्यक्ती–संघटन हेच संस्थेचे खरे भांडवल. यातही काही



"अलीकडे काय होतं. नावाचं जरा इकडचं तिकडे होतं–पण चेहरा काही विसरत नाही हं..."

'धन्य मी कृतार्थ मी'–डावीकडून शांता ( उत्तरा बिडये ) फोटोग्राफर मधू (सुरेश गरसोळे), नीला ( जया जोगळेकर )

मंडळी तर अशी भक्कम, की प्रसंगी पदरचे चार पैसे घालूनही संस्थेच्या इच्छा-आकांक्षा पुऱ्या करतील. मात्र आर्थिक गरजा पूर्ण करणारी सर्वांत महत्त्वाची साधने म्हणजे सरकारी अनुदान व सदस्यांची वर्गणी.

## मंगळवार मंडळ

कलोपासकांचा सुरुवातीचा कालखंड संथ असला तरी मनोरंजक आहे. १९३७ ते १९४० च्या दरम्यान प्रत्यक्ष नाटचप्रयोग होऊ शकले नाहीत. परंतु याच काळात केशवराव दाते यांच्या प्रेरणेने 'मंगळवार मंडळ' सुरू होऊन दर मंगळवारी नाटच-विषयक चर्चा सुरू झाल्या. संस्थेच्या कार्याचे स्वरूप व्यापक होण्यास या चर्चा-सत्रांची अतोनात मदत झाली. नाटच वाङ्मयाचा अभ्यास, वाचनालयाची योजना १९४५ साली सुरू करण्यात आलेल्या आंतर शालेय नाटच स्पर्धा आदी उपक्रमांचे मूळ मंगळवार चर्चा सत्रांमध्ये आहे. विशेषतः, आंतर शालेय स्पर्धा सुरू करण्या-मागील हेतू विशेष स्पृहणीय होता. चांगल्या कलाकारांची उणीव भरून काढण्या-साठी 'पायाभूत' शिक्षण मिळून मुलांना नाटच विषयात गोडी लागण्याच्या दृष्टीने

या योजनेची आखणी करण्यात आली होती. व्ही. शांताराम यांनी सुरुवातीस तीन वर्षे या योजनेस प्रतिसाल १,२०० रुपयांची देणगी देऊन सक्रीय उत्तेजन दिल्याने या स्पर्धांनी चांगला वेग घेतला. अरविंद देशपांडे, सौ. सेवा चौहान, श्री. सुभाष गोडबोले या कलावंतांनी नाटचाचे प्राथमिक धडे याच स्पर्धांतून गिरविले आहेत.

मंगळवार मंडळाची दुसरी देणगी म्हणजे वाचनालय. या मंडळात पुढे आलेली वाचनालयाची कल्पना साकार होऊन आज संस्थेजवळ सुमारे २ हजार नाटचविषयक पुस्तके जमली आहेत. त्याखेरीज जुने फोटो, वृत्तपत्र-कात्रणे, स्केचेस आदी वस्तूंचाही मोठा संग्रह आहे. हे साहित्य वर वर चाळले तरी कलोपासकांचा इतिहास डोळचांसमोर उभा राहतो.

संस्थेच्या कार्यास नाटच प्रयोगाच्या रूपाने सुरुवात झाल्यानंतर चर्चा मंडळ मागे पडले. १९४३ साली माधव–मनोहर यांनी अनुवादित केलेल्या 'आई' नाटकाच्या तालमी सुरू झाल्या. नलिनी ढेरे प्रमुख भूमिका करीत होत्या. खेरीज प्रभाकर मुजुमदार, भगवान पंडित आदी कलावंत होते. मर्क्युरी लाइटचा वापर करून व रंगभूमीचे दोन भाग कल्पून या नाटकातील मृत आत्मे रंगभूमीवर जिवंत स्वरूपात आणण्यात येणार होते. केशवराव दात्यांचे मार्गदर्शन प्रयोगास होत होते. चितोबा गुरवांसारखी मंडळी प्रयोगाबद्दल उत्सुकता दाखवत होती. १९४३ मध्ये मराठी रंगभूमीस शंभर वर्षे पूर्ण होत असल्याने ५ नोव्हेंबर रोजी सांगलीस जो मोठा कार्यक्रम आयोजित केला होता, त्या कार्यक्रमात या नाटकाचा प्रयोग होणार होता. परंतु ऐनवेळी 'नलिनी ढेरे' आजारी पडल्याने प्रयोग रद्द करण्यात आला. कलावंतांची व रसिकांची मोठी निराशा झाली.

### ठेकेदारीची झळ

१९४५ नंतर कलोपासकांनी नाटचप्रेमींची संमेलने, नाटचविषयक व्याख्याने व अधूनमधून नवीन नाटकांचे प्रयोग असा उपक्रम हाती घेतला. त्या वेळी प्रयोग करणे तुलनेने सोपे होते. परंतु कालान्तराने ठेकेदारी पद्धत हौशी रंगभूमीपर्यंत आली. हौशी संस्थांचीही ठेकेदारी पद्धतीत सोय होऊ लागल्याने ही पद्धत रूढ झाली. विशेषत: सरकारी स्पर्धांतून यशस्वी ठरलेली नाटके ठेकेदारांकरवी लावण्यात येऊ लागली. आणि या पद्धतीचे गुण-दोष मान्य करून हौशी रंगभूमीने कालप्रवाहातील हा बदल मान्य केला. कलोपासकही त्यात आलेच. ठेकेदार पद्धतीचे गुण दोष मुंबई-प्रयोगात प्रकर्षाने जाणवतात. मुंबईला ठेकेदारांखेरीज नाटचगृह मिळूच शकत नाही. अगदी सरकारी रंगभवन व रवींद्र नाटच मंदिरांवरही ठेकेदारांचा ताबा. अर्थात या ठेकेदारी पद्धतीचे फायदेही संस्थेस मिळतात. निश्चित रक्कम पदरी पडते, जाहिरात, बुकिंग व्यवस्था आदी बाबींकडेही लक्ष पुरवावे लागत नाही. या निश्चितपणामुळे प्रयोगांचा दर्जा उंचावतो. पण ठेकेदार मंडळी फक्त 'चालणारी नाटके' लावत असल्याने प्रयोगशील नाटकांना रंगभूमी उपलब्ध होणे



डिक्टेटरमध्ये डावीकडून–
सेनापती (शरच्चंद्र कलावंत),
माधव वझे (प्रा. माल्झिअस).

महाकर्म कठीण. या परिस्थितीतही कलोपासकांनी 'धन्य मी कृतार्थ मी' चा एक प्रयोग स्वतःच्या ताकदीवर मुंबईस केला.

## सरकारी नाटच स्पर्धा

सरकारी नाटच स्पर्धांना १९५५ पासून सुरुवात झाली. या स्पर्धेतील अंतिम फेरीसाठी कलोपासकांची निवड व्हावयाची असा परिपाठच. १९५५ ते ६५ पर्यन्त संस्थेने सादर केलेल्या नाटकांची सातत्याने अंतिम फेरीसाठी निवड झाली आहे. कलोपासकांचे नाटक असले म्हणजे प्रेक्षागृह तुडुंब भरलेले आणि प्रेक्षकांचा व परीक्षकांचा योग्य कौल मिळून कोणते ना कोणते पारितोषिक मिळावयाचे हेही ठरलेले. 'अपूर्व बंगाल'पासून 'कथा कुणाची 'पर्यन्त ही विजयपरंपरा म्हणजे या कलेच्या उपासकांच्या सेवेची पावती आहे.

स्पर्धेमधील बक्षिसांचे नावीन्य नाहीसे झाल्याने व इतरांना न्याय्य संधी मिळण्याच्या उद्देशाने या स्पर्धा 'वरिष्ठ' व 'कनिष्ठ' गटांत घ्याव्यात, अशी योजना कलोपासकाने सुचवली. परंतु सरकारने व कनिष्ठ गटानेही (ग्रामीण भागांतील नाटचसंस्था) या योजनेस नकार दिला. कलोपासकांचे नाटक म्हणजे स्पर्धेचे एक भूषण. त्यामुळे या स्पर्धांतून भाग न घेण्याबाबतचा विचार कलोपासकांनी शासनापुढे मांडला. त्या वेळीही सरकारने याबाबत नाराजी व्यक्त केली. परिणामी कलोपासक अजूनही स्पर्धेत आहेत.

सरकारी पैशाने स्पर्धेतील नाटके सादर करण्यात येतात हा काही समीक्षकांचा आक्षेप निराधार आहे. बाहेरगावाहून येणाऱ्या संस्थांतील कलावंतांना सरकार प्रवासखर्च व प्रत्यकी तीन दिवसांचे १०॥ रुपये देते. या उलट स्पर्धेत भाग घेणारी प्रत्येक संस्था नाटकावर १॥ ते ५ हजारपर्यन्त रक्कम खर्च करते. महाराष्ट्रातून शंभरपेक्षा जास्त संस्था या स्पर्धेत उतरतात. संस्थांच्या खर्चाचे प्रमाण व सरकारी अनुदानाचे प्रमाण यांतील तफावत पाहिली म्हणजे वरील असत्यता दिसून येते.

'धन्य मी कृतार्थ मी' हे त्यांचे स्पर्धेतील गेल्या वर्षीचे नाटक. नाटक प्रयोगशील, कथा विषयातही नावीन्य, तंत्रामध्ये अत्याधुनिकता, परंतु प्रयोगशीलतेस व नावीन्यास उत्तेजन देण्यासाठी सुरू केलेल्या सरकारी स्पर्धेतील पहिल्या फेरीतही नाटकास पारितोषिक नसावे याची व्यथा कलोपासकांना आहे. परीक्षकांचा निर्णय खिलाडू वृत्तीने स्वीकारूनही.


स्पर्धेसाठी नेमल्या जाणाऱ्या परीक्षकांचा नाटकाचा अभ्यास हवा आणि चालू रंगभूमीशी व या संदर्भातील ताज्या वाङ्मयाशी त्यांचा निकटचा संबंध असावा, एवढीच परीक्षकांबाबत त्यांची अपेक्षा आहे.

नाटय समीक्षकांनी, विशेषतः, वृत्तपत्रीय समीक्षकांनी प्रामाणिक व निःपक्षपाती असावे. आणि कलम चालवण्यापूर्वी शक्यतो त्यांनी संबंधित नाटकाच्या दिग्दर्शकाची भेट घेऊन शंकानिरसन करून घ्यावे. टीकाकारांनी 'असे का ?' असा प्रश्न विचारण्यापेक्षा 'असे' म्हणून जे सादर करण्यात आले असेल त्याच्याशी नाटयसंस्था प्रामाणिक आहे की नाही हे पाहावे. आणि 'हेच' का सादर केले याची चौकशी करण्यापेक्षा जे केले ते निर्दोष आहे की नाही, याची खात्री करून त्यात जर दोष आढळतील, तर त्यांचा जरूर समाचार घ्यावा.

## नावीन्याचा शोध

प्रचलित व्यावसायिक रंगभूमी संपन्न करणाऱ्या कितीतरी गोष्टी हौशी रंगभूमीवर प्रथम आलेल्या आहेत. 'बेबी व डीमर्स' पुण्याला पूर्ण अपरिचित असताना कलोपासकांनी सर्वप्रथम त्यांचा वापर केला. कित्येक संस्था अशा आहेत, की १९५५ पासून या संस्थेतर्फे उतरणारे स्पर्धक अनेक पारितोषिके मिळवून आजही स्पर्धेच्या क्षेत्रात वावरत आहेत. या उलट कलोपासकांनी अन्य कोणत्याही संस्थेपेक्षा नवीन कलावंत स्पर्धेच्या रंगभूमीवर आणले आहेत. या नवीन कलावंतांचा शोध घेण्यासाठी 'पुरुषोत्तम करंडका' सारख्या आंतर महाविद्यालयीन स्पर्धा संस्था चालवत आहे. नवीन लेखकांची नाटके रंगभूमीवर आणण्यासाठी कलोपासक सतत प्रयत्नशील आहेत.

कलावंतांची आपल्या संस्थेवरील प्रभावी निष्ठा व प्रेम हे हौशी रंगभूमीचे खरे भांडवल. परंतु दुर्दैवाने आज हेच भांडवल धोक्यात आले आहे. विशेषतः, मुंबईतील हौशी कलावंत संस्थेचे बंधन तोडून अन्य संस्थांतून उजळ माथ्याने वावरताना आढळतात. संधिसाधू राजकारणाची ही लाट पुण्यासही येऊ पाहत आहे. ही अनिष्ट प्रथा थांबवण्यासाठी कलावंतांनी एकदा एका संस्थेचे सदस्यत्व स्वीकारले की अन्य संस्थांकडे काम मागण्यासाठी जाऊ नये. संस्था चालकांनीही या संदर्भात अंतर्मुख होऊन पाहणी केली पाहिजे. कलावंतांवर वेगळीच बंधने न आल्यास हौशी नाटयसंस्थांचे अस्तित्वच धोक्यात आल्यावाचून राहणार नाही, अशी कलोपासकांची धारणा असल्याने आपल्या कलावंतांकडून ते एकनिष्ठेची अपेक्षा करतात. ●



ॉगस्टच्या आठ तारखेस
ाही गुजराथी नाटककारबंधूंनी
हाराष्ट्रीय कलोपासक-कार्यालयास भेट दिली.
नमोकळ्या चर्चेत गुर्जरबंधूंनी
ापली व्यथा सांगितली–
मराठी नाटकांना जसा
रपूर प्रेक्षकवर्ग लाभतो
सा गुजराथी नाटकांना लाभत नाही.'



श्री. सुभाष गोडबोले

सौ. प्रमिला वेडेकर


सौ. सेवा चौहान

# वैयक्तिक पारितोषिकांचे काही मानकरी





MANOOS (Weekly): 27 Aug. 66 : 40 Paise : Regd. No. M H–649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर.**